# माणूस

१८ जुलै १९७०

चालीस पैसे



" तुम्ही अजूनही मला राजीनामा परत घेण्याची विनंती करत नाही याचा अर्थ काय ? काही लोकशाही मूल्यांची चाड ?...

१८ जुलै १९७०

# माणूस

| | | |
|---|---|---|
| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : सातवा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर<br>सौ. निर्मला पुरंदरे |

| | | |
|---|---|---|
| किंमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| चाळीस पैसे | वीस रुपये | चाळीस रुपये |


## सप्रेम नमस्कार...

□ दि. २७–६–७० च्या माणूसमधील सौ. माणिक वर्मा यांच्यावर लिहिलेला श्री. वा. वा. गोखले यांचा लेख खूप आवडला. श्री. वा. वा. माझ्या माहितीप्रमाणे संगीत क्षेत्रातील अनेक मंडळींना जवळचे आहेत. त्यांचे असेच लेख यावेत अशी अपेक्षा. विजय तेंडुलकर ५–७–७० च्या माणूसमध्ये लाजवाब ! त्याच्या लेखामुळे माझ्यासारख्या अनेकांना ते 'भुवन सोम' चित्रपट पहायला लावणार.

६ जुलै, ७० जयराम करंबेळकर, डोंबिवली

□ 'माणूस'च्या दि. ४ जुलैच्या अंकातील विजय तेंडुलकर याचे 'भुवन सोम' या चित्रपटाचे रसज्ञ आणि म्हणून देखणे परीक्षण वाचले. 'भुवन सोम' या चित्रपटा-इतकीच तेंडुलकरांची संवेदनाक्षमता, कलासमज लक्षणीय ! सूक्ष्मलक्षी ! मर्मग्राही ! 'तरीही 'भुवन सोम'ने स्वतःच्या मुलालाच लाच खाण्यावरून नोकरी-वरून काढून बाजूला केले होते,' हे चित्रपटातील निवेदन तेंडुलकरांच्या अवधानातून सुटले कसे ते कळत नाही ! तसे सुटले नसते तर त्यांना 'भुवन सोम' ही व्यक्तीही अधिक कळली असती व 'भुवन सोम' ह्या चित्रपटाची अर्थवत्ताही अधिक तीव्रतेने (intense), गहिरेपणाने लक्षात आली असती. भुवन सोमला



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

तेंडुलकरांनीं अविवाहित का बनवलंय् काही कळत नाही !
दुसरे, गोरी जेव्हा भुवन सोमला स्वतलाच 'तूं सोमबाबूला ओळखतोस का ?' असे विचारते तेव्हा 'खरं तर भुवन सोम माझ्या नवऱ्यावर जळत असावा... त्याला स्वतःला पैसे खायला मिळत नाहीत ना ? म्हणून ! ! !'...असे म्हणते. —हे तेंडुलकर सांगायचे विसरतात. असे का व्हावे ?
— तसेच स्वतःच्या गोळीने नव्हे तर त्याच्या आवाजाने भयभीत होऊन खाली पडलेला पक्षी 'आपली शिकार' म्हणून नेऊ बघणारा सोमसाहेब गोरीलाच परत आणून देऊन टाकतो व माघारी जातो. ह्या घटनेला — ज्या घटनेत साऱ्या अनुभवाचा कस आहे, साऱ्या अनुभवाची खरी ताकद आहे — तेंडुलकरांनी अधिक बोलके करायला हवे होते. तेंडुलकर ते करीत नाहीत.

आणि सरते शेवटी 'आज'शी 'भुवन सोम'चे नाते काय ?—हे सांगण्याची गरज होतीच का ? तेंडुलकरांसारख्यानी ?

८ जुलै, ७० — प्रा. सुशीला अय्यर, घाटकोपर

¤ 'माणूस'च्या ४ जुलैच्या ललित समीक्षणाच्या निमित्ताने—
श्री. विजय तेंडूलकराचे 'रातराणी' हे सदर 'माणूस' बरोबरच वाचकांच्याही प्रतिष्ठेचा विषय सिद्ध झाला आहे. 'भुवन सोम' ह्या बहुचर्चित चित्रपटाच्या संदर्भातील त्याचे लेखन मात्र अतिशय घाईगर्दीत उरकल्यासारखेच वाटते. एवढे की त्यात नेहमीचा सराईतपणा, मनोज्ञ विचार तर सोडाच, महत्त्वाच्या तपशिलाविषयीदेखिल काळजी घेतलेली दिसत नाही.
'भुवन सोम'चे झालेले लग्न नाकारून आणि 'गोरी'चे लाच खाणाऱ्या 'हरामखोराशी' न झालेले लग्न लावून ते सदर भावकथेला सोम-गोरी यांच्या अशरीरी, तरल, गूढ अशा संबंधाना आणि पर्यायानं चित्रपटालाच तडा देतात.

'गौना' हा 'साखरपुड्या'चा पर्यायवाची शब्द कमीत कमी चारवेळा आलेला आहे. या लेखनातील विचार, वाक्प्रचार आणि शब्दाना तेंडूलकरांच्या लेखनाचे वजन तर नाहीच, परतु प्रायोगिकतेविषयीही थोडीशी पोरकट, तर्कट, असंगत विधानेही आहेत.
या उलट 'बाकी इतिहास'चे श्री. विलास परकीचे समीक्षण—त्यांची वैचारिक परिपक्वता आम्हा वाचकांबरोबरच प्रत्यक्ष नाट्यप्रयोग सादर करणारांनाही नवे नवे अर्थबोध देण्याच्या पातळीचे आहे.

४ जुलै, ७० मकरंद देसाई, मुंबई

¤ अंकांची वाचनीयता दिवसेदिवस वाढती आहे हे कौतुकास्पद. 'भुवन सोम' चित्रापेक्षाही श्री. तेंडुलकर लिखित परीक्षण अधिक सुदर.
पण काहो, भविष्याचे सदर बद केल्याने 'माणूस'चेच भविष्य साशंक होत नाही

का ? किरकोळ विक्रीवालेच याबद्दल अधिकृत आकडे देऊ शकतील. वर्गणीदार 'बिचारे' काय करणार ?

६ जुलै, ७० श्री. कुलकर्णी, दिल्ली

□ आपल्या दि. २७ जून १९७० च्या अंकामध्ये श्री. वरुण भिडे यांनी लिहिलेला 'तर कलकत्ता दूर नाही' हा लेख प्रसिद्ध झालेला आहे. या लेखामध्ये एका वैद्यकीय विद्यार्थ्याने सर्वात समतोल व अभ्यासपूर्ण विधाने केली असा उल्लेख आहे. या सर्व विधानांबद्दल मी आक्षेप घेऊ इच्छितो.

शिवाजी विद्यापीठाच्या कक्षेमध्ये एकच सरकारी म्हणजे मिरज वैद्यकीय महाविद्यालय येते. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय महाविद्यालया-साठी उपलब्ध असलेल्या जागांची संख्या १७४ नसून यावर्षी ११९ आहे. यामध्ये ३५ टक्के जागा मागासलेल्या जमाती व ट्रायबल जमातींच्या लोकांसाठी आहेत. शिवाय हे महाविद्यालय मिशन हॉस्पिटलला जोडलेले असल्यामुळे मिशन-साठी तीन जागा राखून ठेवलेल्या आहेत. म्हणजे या सर्व जागा वजा जाता गुणानुक्रमे येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी फक्त ७४ जागाच उरतात. ३५ टक्के जागांपैकी ज्या जागा उरतात त्या सर्व जागा गुणानुक्रमे भरल्या जातात. ११९ मध्ये ६० इथे राहतात व ५९ पुण्याला जातात.

आता ५५% व ७०% मधील चमत्कार पाहू. मी स्वतः या वैद्यकीय महाविद्यालया-मध्ये १९६७ च्या जुलैमध्ये प्रवेश घेतलेला आहे. त्यावर्षी गुणानुक्रमे घेतलेला शेवटचा विद्यार्थी ६१% गुण मिळविणारा होता, व जे ४५ विद्यार्थी पुण्याच्या महाविद्यालयात पाठविण्यात आले त्यांमधील शेवटचा विद्यार्थी ६७% गुण मिळविणारा होता. त्यानंतरच्या प्रत्येक वर्षी इथे प्रवेशपात्र गुण वाढतच गेले आहेत. यावर्षी ६८% पर्यंत गुणसंख्या येईल. जिथे ६८% गुण असल्याशिवाय प्रवेशच मिळू शकत नाही तेथे ५५% गुण असणारे आमचे विद्यार्थी तिकडे येणार कोठून ?

शिवाजी विद्यापीठाच्या जागा कमी करून त्या त्या विद्यापीठांच्या विद्यार्थ्यांना त्या जागा मिळाव्या ही रास्त मागणी आहे. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना पुण्यामध्ये ज्या जागा दिल्या जातात त्या या भागात इंटर-सायन्स परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येच्या प्रमाणात. असो.

मी वर केलेल्या स्पष्टीकरणामुळे असे ठामपणे म्हणू शकतो की 'त्या' लेखामध्ये यासंबधी केलेली विधाने निराधार आणि म्हणून निखालस असत्य आहेत. एका वैद्यकीय विद्यार्थ्याने पुरेशा माहिती अभावी ही विधाने करावीत याचे वैषम्य वाटते. चुकीची माहिती गैरसमजुतीस जबाबदार ठरते म्हणून हा खटाटोप.

२९ जून, ७० श्री. जी. व्ही. ताथे, मिरज

□ २७ जून ७० चा अंक वाचला. त्यातील 'तर कलकत्ता दूर नाही' हा श्री. वरुण भिडे यांचा लेख वाचला.

पुणे विद्यापीठातील विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी चाललेल्या धडपडी-तील हा एक प्रयत्न आहे.

परंतु भिडे यांच्या लेखात काही परिस्थितीचा विपर्यास करणारी माहिती आहे.

शिवाजी विद्यापीठाला मिळणाऱ्या एकूण जागा खाली निर्देश केल्याप्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १ : बी. जे. मेडिकल | पुणे | ६० | राखीव २० |
| २ : मिरज मेडिकल | मिरज | ६० | राखीव ११ |
| ३ : बी. एस्. मेडिकल सोलापूर | | १०० | ,, — |

सोलापूरच्या १०० जागाचे वाटप हे असे :

५७ जागा १० हजार कॅपिटेशन.

३० जागा २५ हजार डोनेशन

०३ जागा जिल्हाधिकारी सोलापूर यांच्याकडे..

५७ जागांपैकी १० जागा सोलापूर महानगरपालिकेकडे आहेत.

त्या १० जागांपैकी ८ जागा राखीव आहेत. या १० विद्यार्थ्यांची कॅपिटेशन फी १ लाख रुपये महापालिका भरणार आहे.

जिल्हाधिकाऱ्यांकडे असलेल्या ३ जागांपैकी २ राखीव असून १ सोलापूर जिल्ह्यात प्रथम येणाऱ्यांसाठी आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या सोलापूरच्या रहिवाशांनाच महापालिकेच्या १० जागा उपलब्ध आहेत.

शिवाजी विद्यापीठाला कॅपिटेशन फी न भरता मिळणाऱ्या जागा १३३ आहेत. तरीपण राखीव जागा (३१) वगळता ६४ जागा मेरिटप्रमाणे मिळतात.

शिवाजी विद्यापीठात यावर्षी ५३ जणांना ७०% च्या वर मार्कस् आहेत. त्यामुळे पुणे विद्यापीठाचा ७२% आणि शिवाजी विद्यापीठाचा ५५% हा १७% चा फरक हे विधान पूर्णपणे चुकीचे आहे.

शिवाजीचा ५५% गुण मिळवणारा विद्यार्थी बी. जे. ला प्रवेश तर तो राखीव जागांमधील आहे. पुण्याच्या २०० पैकी ६० शिवाजीच्या सोडल्या तर १४० जागा पुण्यासाठी आहेत.

पुणे विद्यापीठ शिवाजी विद्यापीठाला बी. जे. ला जागा उपलब्ध करून देते हा काही शिवाजी विद्यापीठावर उपकार नव्हे.

पुण्याच्या इंजिनियरिंगच्या विद्यार्थ्यांना सांगलीच्या वालचंद कॉलेजमध्ये प्रवेश मिळतो.

या सर्व प्रश्नावर तोडगा म्हणजे महाराष्ट्र शासनाने सोलापूरचे मेडिकल कॉलेज ताब्यात घेऊन कॅपिटेशन व डोनेशनची प्रथा तावडतोब बंद करावी.

२१ जून, ७० — श्री. रा. देशपांडे, सोलापूर

□ □ □




सु. ल. सोमण

# आघाड्यांचं राजकारण

सार्वत्रिक निवडणुकांचे वेध लागले आहेत. बहुतेक १९७२ पूर्वी ह्या निवडणुका होणार नाहीत आणि तरीसुद्धा निवडणुकांना अवघं दीड वर्षं उरलं आहे. सध्याच्या अस्थिर वातावरणात दीड वर्षाचा कालावधी तसा लहानसाच आहे. त्यातच निवडणुका ७२ पूर्वीच श्रीमती गांधी घडवून आणतील अशा वावड्या मधनं मधनं उठत आहेत. साहजिकच निवडणुकांचे वारे जोराने वाहू लागले आहेत. बहुतेक सर्वच राजकीय पक्षांनी ह्या दृष्टीनं तयारीदेखील चालू केली आहे. सत्तारूढ कॉंग्रेसही ह्याला अपवाद नाही. सध्याच्या कमालीच्या राजकीय अस्थिरतेमुळे तर ह्या निवडणुकांना अधिकच महत्त्व येणार आहे. ह्या अस्थिरतेमुळेच आज कुठलाही पक्ष खऱ्या अर्थानं ताकदवान नाही; आणि निवडणुकांनंतरही कुठल्याही एका पक्षाला स्वतःच्या जोरावर सरकार बनवता येणार नाही, ह्याही परिस्थितीची जाणीव सर्वच पक्षांना आहे. अर्थात कुणाशी तरी तडजोड केल्याशिवाय, कुणाबरोबर तरी भागिदारी स्वीकारल्याशिवाय आपली धडगत नाही हे सर्वच पक्षांनी ताडले आहे. नि त्याच दृष्टिकोणातून त्यांच्या हालचालीही चालू आहेत. काही श्रीमती गांधी सरकार विरोधी आघाडी बांधू पाहत आहेत. तर काही कम्युनिस्टेतर राष्ट्रवादी–लोकशाही–समाजवादी शक्तींना एकत्रित आणू पाहत आहे. काहींनी उजव्या प्रतिगाम्यांविरुद्ध, कम्युनिस्टांसह सर्वांची युती उभारण्याचा संकल्प सोडला आहे. एकेकाळी, कुठल्याही प्रश्नांवर आघाड्या उभारून सरकारविरोधी वातावरण तयार करायचं हे खास कम्युनिस्टी राजकारण होतं. आघाड्या बनवण्याची त्यांची ही मक्तेदारी आता संपली आहे. आज, दोन्ही कॉंग्रेससह सर्वच पक्षांची अशा आघाड्यांसाठी धडपड सुरू आहे. काही अनपेक्षितच घडलं तर गोष्ट वेगळी; पण ह्या नंतर केंद्रस्थानी येणारं सरकार आघाडी–सरकार राहील हे आता जवळ जवळ निश्चित आहे. थोडक्यात इथून पुढे, निदान काही काळ ह्या देशात आघाडीचंच राजकारण चालू राहणार आहे !

दोन्ही कॉंग्रेसच्या महासमित्यांची राजधानीतली अधिवेशनं, जॉर्ज फर्नांडिस,

व ठराव मशोक, मिनू मसानी, द्विवेदी प्रभृतींची वक्तव्यं, वगैरे गोष्टी ह्या आघाडीच्या राजकारणाची नांदी भासतात. जुन्या कॉंग्रेसने, कम्यूनिस्टस व त्यांच्या धाकाने वागतात म्हणून श्रीमती गांधी (अर्थात त्यांचा पक्ष त्यात आलाच!) ह्यांना वगळून इतर राष्ट्रीय पक्षांनी एकत्रित येऊन सध्याचं सरकार खाली खेचावं असं सुचवलं. त्यांच्या ह्या राजकीय ठरावावर देशभर बरीच वादळी चर्चा चालू आहे. होत आहे. जुन्या कॉंग्रेसने जनसंघ-स्वतंत्र ह्यांचेबरोबरच, प्रसोपा, ससोपा आदि पक्षांचीही नावं सुचवली आहेत, त्यांच्याशी चर्चाही सुरू केली आहे. हे खरं असलं तरी, जनसंघ-स्वतंत्रानीच केवळ त्यांच्या ठरावाचं ताबडतोब व उत्स्फूर्त स्वागत केलं. अर्थात संघटना कॉंग्रेस-जनसंघ-स्वतंत्र अशी उजवी आघाडीच केवळ त्यांना अभिप्रेत आहे असा प्रचार सर्वत्र झाला. आणि ह्या उजव्या आघाडीच्या विरोधात सर्व डाव्या पक्षाची (कम्युनिस्टासह) आघाडी नवकॉंग्रेसने बनवावी असा सूर फंगटर्कस्, मालवीय, सुब्रह्मण्यम् आदीनी लावला आहे. श्रीमती गांधींचे विचार अद्याप प्रसिद्ध झालेले नाहीत. त्या बहुधा परिस्थितीची चाचपणी करीत असाव्यात. ठिकठिकाणच्या प्रांतिक पक्षांशी तिथल्या पुरते समझोते करावेत, व केंद्रात सध्याप्रमाणेच, डाव्यांच्या "बाहेरून" पाठिंब्यावर सरकार स्थापावे असे कदाचित त्यांचे मनसुबे असावेत; कारण एका विशिष्ट पक्षाच्या पंतप्रधान म्हणून हातात येणारी निरंकुश सत्ता आणि आघाडी सरकारच्या प्रमुख म्हणून येणारी सत्ता ह्यांत निश्चितच महदंतर आहे! अर्थात सध्या त्यांनी मौन बाळगणं हे ओघानंच आहे. जा. फर्नांडीस ह्यानाही आघाडी हवी आहे, पण ती इंदिरा-विरोधी हवी आहे! त्यात त्यांना जनसघीय व नक्षलवादी दोन्ही चालतील! (डॉ. लोहियाचे हे खरे अनुयायी!) कॉ. श्री. अ. डांगे ह्यांना सुद्धा एक आघाडी हवी आहे. सरंजामशाही, भांडवलशाही विरोधी, व सरकारविरोधीही! ह्या साऱ्यात भाक्रांदचे चरणसिंग मोठे हुशार! त्यानी जुन्या कॉंग्रेसच्या "ग्रॅंड अलायन्स" चंही स्वागत केलं, आणि नव्या कॉंग्रेसलाही यू यू केलं. जिकडचं वारं तिकडचे चरण-सिंग हा अर्थातच, त्यांच्या कवितेतला दुसरा चरण असणार। थोडक्यांत सर्वत्र जरी निवडणुकांचे वारे वाहू लागले असले व आघाड्यांची बोलणी सुरू असली, तरी त्यांचं स्पष्ट चित्र मात्र अद्याप कुणाच्याच डोळ्यांसमोर नाही!

महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या नेत्यानी ह्या संदर्भात केलेली सूचना ह्या पार्श्वभूमीवर, म्हणूनच वास्तव वाटते. संघटना कॉंग्रेस, जनसंघ, स्वतंत्र (व कदाचित भाक्रांद) ह्यांच्या काहीशा उजव्या आघाडीचं स्वागत करताना, त्यांनी कम्युनिस्टेतर डाव्या पक्षाची आघाडी बनवावी असं मत प्रगट केलं आहे. त्यामुळे लोकशाहीवर निष्ठा असलेल्या परंतु भिन्न मतप्रणाली असणाऱ्या दोन बलिष्ठ राष्ट्रीय पक्षांच्या उभारणीच्या प्रक्रियेला सुरुवात होईल. ह्यातुन राष्ट्राबाहेर निष्ठा ठेवणारे व लोकशाही वा घटनेचं राज्य न मानणारे कम्यूनिस्टस् आपोआपच

वगळले जातील, व भारतीय लोकशाहीला वजन प्राप्त होईल. दोन तुल्यबळ पक्ष निर्माण झाल्याने अर्थातच सत्तेची मिरासदारी संपून कल्याणकारी शासन देणं, दोन्ही पक्षांना प्राप्तच होईल; आघाड्यांच्या संदर्भात, रिपब्लीकन सारख्या छोट्या पक्षानं केलेल्या ह्या मोठ्या सूचनेचा अवश्यमेव विचार झाला पाहिजे.

## आवाहन

यूनोचे अध्यक्ष ऊ थांट परवा यूनो सदस्य राष्ट्रांच्या प्रतिनिधींपुढे बोलताना म्हणाले, 'मानवाचं सार्वभौमत्व आपण प्रथम मानून, संपूर्ण जग एक आहे ही भावना वाढीस लावली पाहिजे. सहजीवनाचा अंगिकार केला पाहिजे. दुसऱ्या मानवालाही जगण्याचा अधिकार आहे हे लक्षात घेतलं पाहिजे आणि मानवाच्या उन्नतीसाठी झटलं पाहिजे. कंबोडिया व विएतनामच्या प्रश्नांचा आढावा घेऊन, त्यासंबंधातही त्यांनी वरील आशयाचेच विचार व्यक्त केले. यूनोचा प्रमुख अशा तऱ्हेचे विचार व्यक्त करीत असताना जगभर मात्र वारे नेमक्या उलट्या दिशेने वाहत असताना दिसताहेत "सीटो" राष्ट्रांची 'मनिला' येथे भरलेली बैठक आणि पेकिंग व प्योंगयांग (उ. कोरिया) येथे एकाच वेळी साजरा केलेला, कोरियन युद्धाचा विसावा वार्षिकोत्सव–ह्या दोन्ही प्रसंगानी वरील वाक्यच पुन्हा एकदा सिद्ध केलं.

कंबोडियातून अगदी अलीकडेच अमेरिकेनं आपलं सैन्य बाहेर काढून घेतलं असलं तरी, अमेरिकन विमानदळ तिथे शाबूत आहेच. त्याद्वारे बॉबहल्ले करणं अमेरिकेला शक्य आहेच. द विएतनाम व थायलँडची सैन्य तिथे आहेतच. सीटो परिषदेत ह्याचाच प्रामुख्याने विचार झाला, आणि द. पू. आशियातल्या चिनी वर्चस्वाला तोंड देण्याच्या प्रश्नाचा विचार झाला. आशियातल्या छोट्या छोट्या राष्ट्रांचं सार्वभौमत्व धोक्यात असता, कम्युनिझमला पायबंद घालण्यासाठी सीटो राष्ट्रांनी एकत्रित आलं पाहिजे ह्याचा पुनरुच्चार केला गेला तर अदमासे त्याच सुमारास चीन व उ. कोरियाच्या राजधान्यांमधील समारंभातून अमेरिकन साम्राज्य-शाहीविरुद्ध आशियाई राष्ट्रानी एकत्रित येऊन लढा दिला पाहिजे, हेच सूत्र आळवलं गेलं. "कंबोडिया, लाओस, विएतनाम, चीन, कोरियासह सर्व आशियाई राष्ट्रांनी जर संयुक्त आघाडी उभारली आणि एकत्रितपणे अमेरिकन साम्राज्य-शाहीला धक्के दिले, तर अमेरिकन साम्राज्यशाही कोसळून पडेल आणि सामान्य जनांचा विजय होईल." ह्या श्री. किम-इल्-सुंग ह्यांच्या सूत्राचाच पुनरुच्चार पेकिंग व प्योंगयांग ह्या दोन्ही ठिकाणी केला गेला. तैवानच्या मुक्तीचा घोष केला गेला, तर अमेरिकेचा सहप्रवासी म्हणून जपानचा धिक्कार केला गेला. तैवान, स्वतंत्र ठेवून त्याचं मुख्य चिनी भूमीपासून अलगत्व राखण्याचा अमेरिकेचा प्रयत्न आहे। तर जपान आज चीनचा आशियातला प्रमुख राजकीय व आर्थिक प्रतिस्पर्धी

बनू पाहत आहे. तैवान प्रश्नावरून तर श्री. चौ एन लाय ह्यांनी अमेरिकेला उघड उघड धमकीच दिली आहे. तर कंबोडिया प्रश्नावरून 'सीटो' राष्ट्रांना आवाहन करून, अमेरिकेनं आशियाई राष्ट्रांच्या स्वातंत्र्य रक्षणार्थ जागतिक लोकमताला साद घातली आहे.

एवंच, यूनोचे अध्यक्ष, आंतरराष्ट्रीय व्यासपीठावरून मानवी सार्वभौमत्वाचे, सहजीवनाचे पाठ देत असतानाच, अमेरिका आणि चीन दक्षिणपूर्व आशियात एकमेकांचा घास घेण्यासाठी टपून बसली आहेत. त्यांच्या वादात नाहक ओढल्यामुळे, सामान्य 'माणूस' म्हणून जगू इच्छिणाऱ्या कंबोडियन, विएतनामी जनतेला मात्र निष्कारण हाल सोसावे लागत आहेत! आणि अशा वेळी "तिथली परिस्थिती तूर्त तरी आशादायक नाही; परंतु ती लौकरच सुधारेल" असा फालतू आशावाद बाळगण्यापलीकडे ऊ थांट साहेब काहीच करू शकत नाहीत! ▫ ▫ ▫

## नंबर एक जातीयवादी—कम्युनिस्टस्!

"जातीयवाद म्हणजे एखाद्याचं स्वजातीविषयीचं किंवा संस्कृतीविषयीचं प्रेम नव्हे तर जातीयवाद म्हणजे 'मी–तू' ही विद्वेषी भावना. तीतून उद्भवणारा उच्चत्वाचा गंड, स्वतःचं वा स्वतःच्या चालीरितीचं दुसऱ्यावर स्वामित्व लादण्याची प्रवृत्ति. त्यासाठी आध्यात्मिक वा शारिरीक अत्याचार म्हणजे जातीयवाद.

"जातीयवादाची ही व्याख्या मान्य केली तर कम्युनिस्ट सर्वात प्रखर जातीयवादी ठरतात. हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन, शीख, पारशी, जैन, ह्या सर्वच व्यक्तित्ववादी संस्कृतीचं उच्चाटण करायला ते निघाले आहेत.... मुसलमान हे त्यांच्यापेक्षा कमी प्रतीचे जातीयवादी आहेत. कारण त्यांनी कितीही मनात आणलं तरी ते हिंदू-ख्रिश्चन संस्कृत्या नाहीशा करू शकत नाहीत...ख्रिचन हे त्याहून कमी जातीयवादी आहेत...हिंदू-सर्वात कमी जातीयवादी आहेत, कारण त्यांच्याजवळ इतरांना नाहीसं करण्याची ताकद नाही, इच्छा त्याहूनही नाही. त्यांचं अस्तित्व शाबूत राहावं व इतरांचंही राहावं ही त्यांची इच्छा...

"...जातीयवाद्यांचा हा क्रम कॉंग्रेसने लक्षात घेतला तर, हिंदूंना उपदेश करण्यापेक्षा कम्यूनिस्टाना आवरणं किती आवश्यक आहे ते त्यांच्या लक्षात येईल....सर्व बिगर कम्युनिस्टांनी कम्युनिस्टाविरुद्ध एकत्रित व्हावं. म्हणजे मग, जातीयवाद आपोआपच समूळ उखडला जाईल..."

श्री. आर. संन्याल.

[टाईम्स ऑफ इंडिया; "वाचकांची मते" दि. १६-६-७०.]

# मित्र हो ! जातो मी !

बाळासाहेब एकाएकी निघून गेले ! परवा भल्या पहाटे त्यानी राजीनाम्याचे एका ओळीचे पत्र आपल्या शिपायाकरवी सचिवालयातल्या मुख्यमंत्र्याच्या रिकाम्या खोलीत पाठवले. तेथून त्यानी आपल्या एका मित्राला फोन करून त्याची गाडी मागवून घेतली. मलबारहिलवरील आपल्या बंगल्यात गेले. लगेच सामान आवरायला सुरुवातही केली.

बातमीदाराना कुणकुण लागून तेही श्री. देसाई याच्या मागोमाग त्याच्या बंगल्यावर गेले. बाळासाहेब राजीनामा देतात म्हणजे काय ! एकदम सनसनाटी ! काही वेळ बाळासाहेब बाहेरच आले नाहीत. मग त्याचे व्याही नानासाहेब देशमुख यानी बातमीदारांच्या वतीनं रदबदली केली. ' प्रेसचे लोक आहेत. जरा भेटून घ्या. '

मग बाळासाहेब डुलत डुलत धीर-गंभीर मुद्रेने बाहेर आले कोचावर बसले. बराच वेळ बोललेच नाहीत, आपल्या नेहमीच्या पद्धतीनं गालावरच्या वळीवरून बोटही फिरवलं नाही. डोळयात दोन अश्रू- " मित्र हो, जातो मी. "

आणि खरोखरच सध्याकाळी लगेच बाडबिस्तरा गुंडाळून बाळासाहेबानी पुण्याच्या दिशेने प्रयाणही केले. खाजगी गाडीतून. राजीनामा अधिकच परिणामकारक आणि सनसनी खेच झाला.

बाळासाहेब गेले ? एकाएकी त्यानी राजकारण-सन्यास घेतला ? सतरा वर्षे ज्यानी मुबईत राजकारण केले, सतरा वर्षे त्यानी मंत्रिपद उपभोगले, ते बाळासाहेब एकाएकी सर्वसंगपरित्याग करून वानप्रस्थाश्रमी कसे गेले ? मुख्यमंत्रिपदासाठी जीव टाकणारे, हाता-तोंडाशी आलेली ती गादी दोनदा गमावल्यामुळे तळमळणारे, आणि ती आयुष्यात एकदा तरी मिळवण्याची महत्त्वाकाक्षा धरणारे बाळासाहेब राजकारणाची एकाएकी उपरती होऊन निघून कसे गेले ?

हा गहिरा प्रश्न बऱ्याच जणांना सध्या सतावीत आहे. बाळासाहेबानी का बरे जावे ? त्याच्यासारखा धूर्त राजकारणी आणि महत्त्वाकाक्षी माणूस तसेच काही मोठे कारण असल्याशिवाय, रिंगणातून पाय मागे घेणार नाही. मुख्यमंत्रिपदाची बाळासाहेबाची जुनी महत्त्वाकाक्षा. १९६२ साली महाराष्ट्राचा सह्याद्री दिल्लीच्या मदतीला धावला तेव्हा मुबईची गादी रिकामी पडली. पहिला क्लेम होता बाळासाहेबाचा. त्यानी जग जंग प्रयत्न केला. पण जोर साहेबाचा होता. साहेब बाळासाहेबाना गादीवर येऊ देण्यास राजी नव्हते. त्याना बाळासाहेबाचे पोटेन्शियल

माहित होते गादीवर आले तर बाळासाहेब किल्ल्या आपल्याच हाती ठेवतील आणि महाराष्ट्रात आपल्या तोंडाला कुणी पानही पुसणार नाही याची साहेबांना खात्री होती. म्हणून कन्नमवार आले. बाळासाहेब गप्प बसून राहिले. ते अंक मोजीत होते. वर्ष-दीडवर्षात कन्नमवार गेले. पुन्हा जोराची फाईट. याही वेळेस बाळासाहेबांना माघार घ्यावी लागली. वसंतराव नाईक आले. सदुसष्टच्या सार्वत्रिक निवडणुका आल्या. जोर धरून बाळासाहेब पुन्हा एकदा आखाड्यात उतरले. पण याही वेळेस सपशेल उताणे पडले. मुख्यमंत्रिपद तर सोडाच, त्यांच्या हातचे गृहखातेही हिसकावून घेण्यात आले.

पण परवा बाळासाहेब एकाएकी गेले. सर्वांनाच धक्का बसला. कुणाला न सांगता सवरता निघूनही गेले. चव्हाणाचा सल्ला ऐकला नाही, नाईकाची विनंती ऐकली नाही. ते आपले सरळ निघून गेले. मंत्रिपदाच्या वगल्याचा आणि इंपोर्टेड गाडीचा त्याग करून खाजगी गाडीतून निघून गेले.

बाळासाहेब एकाएकी का गेले बरे? परवाच्या महाराष्ट्र काँग्रेस कमिटीच्या वादळाला घाबरून? की अपमान सहन न होऊन? त्या बैठकीत म्हणे खूप जोराची भांडणे झाली. वसंतराव नाईकाच्याविरुद्ध काही मंत्रीच प्रचार करताहेत असे आरोप झाले बाळासाहेबाचे नाव न घेता त्यांच्यावर टीकेचा भडिमार झाला. गृहखात्याला दोषी धरणारे त्यांचे भिवंडीचे वक्तव्य ताजे होते. त्याचा आधार घेण्यात आला. रंगराव पाटील प्रकरणही निघाले. कोल्हापूरचे एक आमदार शि. शं. बोंद्रे यांनी तक्रार केली : काही मंत्री म्हणे आमदाराना सर्किट हाऊसवर बोलावून दम देतात. सारा रोख बाळासाहेबांविरुद्धच होता. पक्षशिस्तीबद्दल बोलले गेले तेही बाळासाहेबांविरुद्ध आणि त्यावर खास म्हणजे साहेबानी; वसंतरावाना कोरा चेक दिला, "पक्ष शिस्तीच्या आणि हिताच्या जे कोणी आड येत असतील मग ते मंत्रीही असेनात–त्याची मुळीच गय करू नका" अफवा अशी आहे की ही धमकी बाळासाहेबानाच होती.

पण बाळासाहेब एवढ्या धमकीला आणि आकांडतांडवाना घाबरणार होते? की एवढ्यावर अपमान वाटून त्यानी राजीनामा दिला? एवढ्याशा गोष्टीवर रुसून राजीनामा देण्याची बाळासाहेबाची प्रकृती नाही. दुसऱ्या एका गोटातील बातमीनुसार याच बैठकीत बाळासाहेबांनी जवळजवळ सपशेल माफी मागितली म्हणे. चूक भूल दिली गेली झाले आणि हे प्रकरण मिटविण्यात आले. पण दुसरेच दिवशी बाळासाहेबाचा राजीनामा!

आणखी काही अफवा आहेत. महाराष्ट्र विधानसभेत शे. का. पक्ष सोडून सर्व विरोधी पक्ष नाईक मंत्रिमंडळाच्या राजीनाम्याची मागणी करतात. शे. का. पक्ष मात्र नाईकांनी गृहखाते सोडावे हीच मागणी गेल्या अधिवेशनात करीत होता. हे जरा विचित्र होते. म्हणून पक्षाने चौकशी सुरू केली. वदंता अशी आहे की शे. का. पक्षाच्या या मागणीमागे महसूल मंत्र्याचा हात होता.

दिल्लीला ए. आय. सी. सी. बैठक झाली तेव्हा महाराष्ट्रातल्या काही काँग्रेस-जनानी नाईकांकडून मुख्यमंत्रिपद आणि गृहमंत्रिपद काढून घ्यावे–भिवंडीच्या निमित्ताने–अशी मागणी करणारी गुप्त पत्रके वाटली. पत्रके वाटणाऱ्यांना पकडले, तेव्हा म्हणे त्यांनी कबूल केले की आपल्याला बाळासाहेबांनीच या कामगिरीवर पाठवले होते. अशी एक वंदता आहे हो. खरे खोटे कुणास ठाऊक.

पण या आणि इतर अनेक प्रकरणांच्या निमित्ताने बाळासाहेबांविरुद्ध मोठेच वातावरण तयार झाले होते. पॅन्सी दत्त प्रकरणी बाळासाहेबाविरुद्ध हवा तयार झाली होती ती पक्षाबाहेर. पण या वेळेस पक्षातच कटुता निर्माण झाली होती आणि त्याच पार्श्वभूमीवर मुंबईत महाराष्ट्र काँग्रेस कमिटीची सभा झाली.

पण एवढयावर बाळासाहेबानी निघून जावे ? जे बाळासाहेब पॅन्सी दत्त-प्रकरणाला घाबरले नाहीत ते या वादळाला भिऊन पळतील ? असे सांगतात की बाळासाहेबांकडचे महसूल खातेही काढून घेण्याचे ठरवले होते. गेल्या काही महिन्यात तर म्हणे जिल्हाधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याचे अधिकारही त्यांच्या हातून काढून घेतले होते. हा अपमान असह्य होता. पुढची चिन्हे काही नीट दिसत नव्हती. काढून टाकण्यापेक्षा आपणच गेलेले बरे असे बाळासाहेबांनी ठरवले आणि ते हिरो बनले असे म्हणतात.

महाराष्ट्राचा हा पोलादी पुरुष एकाएकी कसा निघून गेला याबद्दल आणखी काही कारणे सागितली जातात. देसाई आणि चव्हाण यांची विळया-भोपळयाची मैत्री सर्वश्रुत आहेच. चव्हाणांना पर्यायी नेतृत्व उभे करण्याविषयीच्या वक्तव्याचा त्यांनी पाटण येथून केलेला इन्कारही बराच प्रसिद्धी मिळवून गेला. त्यामुळे हे राजीनामा प्रकरण दिल्लीहून तर शिजले नाही ना अशा शंका अनेकांच्या मनात तरळून गेल्या. शंकेखोर डोक्यांना काडीचाही आधार चालतो. काय तर म्हणे इंदिराबाईंनी बाळासाहेबांना पुण्याला फोन करण्याची काय गरज होती ? खाडिल-कर त्यांना कशाला भेटले वगैरे. कुणी काहीही म्हणो. चव्हाणांकडचे गृहखाते काढून आणि रेव्हेन्यू-इंटेलिजन्स विरहित अर्थखाते त्याच्या माथी मारून इंदिरा-बाईंनी साहेबाना एकदम डिमोट करून टाकले आहे. महाराष्ट्रात चव्हणाना पर्यायी नेतृत्व शोधण्याचे बाईंचे प्रयत्न चालू आहेतच. त्यातलाच तर हा प्रकार नव्हे ना ? पण बाळासाहेबामध्ये चव्हाणांचे पर्यायी नेतृत्व उभे करण्याचे गुण आहेत ?

बाळासाहेब गेले, मोटारीने पुण्याला गेले. तिथून पाटणला आणि नंतर कोल्हा-पूरला गेले. वाटेत त्याचे जगी सत्कार झाले. कोल्हापूरात शे. का. पक्षाने तर त्याची प्रचंड मिरवणूक काढली. त्यात काँग्रेसचे लोकही होते आणि चव्हाण-विरोधी घोषणाही होत्या. हे कशाचे लक्षण आहे ? बाळासाहेब काँग्रेसच्या बाहेर जातील. ते म्हणतात, जनतेच्या अडी-अडचणी समजावून घेण्यासाठी मी महा-राष्ट्राचा दौरा काढणार आहे. बाळासाहेब तसे काँग्रेसबाहेर जाणार नाहीत.

ते सर्व जिल्ह्यांना चाचपून बघतील. तीन-चार जिल्हे हाती लागत असले तर शेतकरी कामकरी पक्ष आणि संघटना कॉंग्रेस यांच्या सहकार्याने नाईक सरकारला धोका उत्पन्न होत असेल तरच ते बाहेर जातील. सध्या तरी तसे दिसते.

आपण मोठे गरिबाचे कैवारी आहोत अशी आपली प्रतिमा निर्माम करण्याचा बाळासाहेब सतत प्रयत्न करीत आले आहेत. कमी आर्थिक उत्पन्न मिळविणाऱ्यांच्या मुलांना शैक्षणिक सवलती आपणच मिळवून दिल्या असे ते सागतात. महाराष्ट्र सरकारच्या बऱ्याचशा प्रगतिशील धोरणाचे आणि पावलाचे पितृत्व स्वत.कडे घेण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. अर्थात तो फारसा यशस्वी होतोच असे नाही. पण गरिबांचा कैवारी हे बिरुद मात्र त्यांना चिकटले आहे हे खरे. त्यामुळे विरोधी पक्ष त्याच्याशी नरमाईने वागतात. पण दुर्दैवाने त्याच्या या स्वभावामुळे ते आपल्या पक्षात आपली माणसे, आपला गट निर्माण करू शकले नाहीत उलट पक्षात त्यांनी शत्रूच जास्त निर्माण केले. प्रेम, लोभ, राग, धाकदपटशा सर्व मार्गाचा अवलंब, ते आपली कामे करून घेण्यासाठी करीत. गृहखाते त्याच्या हाती होते तेव्हा त्यांचा दरारा विलक्षण होता. मोठे मोठे अधिकारी त्याच्यासमोर जायला कापत. त्यामुळे एखादे काम करायचे त्यांनी ठरवले की काय वाटेल ते होवो. ते काम झालेच पाहिजे.

जुनी जमीनदारी वृत्ती त्यांच्यात पूर्ण भिनली आहे. रागावले की त्यांच्यासमोर उभे राहयला नको. खूष झाले की प्रेमाला सीमा नाही. मागे एकदा मुख्यमंत्री नाईक परदेशी गेले तेव्हा पंधरा दिवसासाठी बाळासाहेबाची हंगामी मुख्यमंत्री म्हणून नेमणूक झाली होती. त्याच दिवशी सकाळी ते पुण्याला गेले होते. पुण्याच्या एका बेरक्या बातमीदाराला बाळासाहेबांच्या हृदयाला हात कसा घालायचा हे माहित होते. बातमीदार त्यांना भेटले तेव्हा हा हात जोडून म्हणतो –' बाळासाहेब अभिनंदन ! पुढच्या वेळी यापेक्षा दुप्पट जोरानं अभिनदन करीन.' बाळासाहेब एवढे खूष त्यांनी त्या म्हाताऱ्या बातमीदाराला अशी कडकडून मिठी मारली की पुढे कित्येक दिवस त्याची पाठ सणकत होती !

बाळासाहेब गेले ते महाराष्ट्र कॉंग्रेसला खिंडार पाडून गेले. मंत्रिमंडळाने हसत हसत त्याचा राजीनामा स्वीकारला. पण त्याच्या राजीनाम्याचे महाराष्ट्र राजकारणावर परिणाम होतीलच. माणसाचे खाजगी जीवन कसेही असो, त्याने खरे–खोटे बोलून का होईना, वर्तमानपत्राना हाती धरून, त्यांना धाक दाखवून, त्यांच्याशी गोड बोलून–कसेही असेना–लोकांच्या मनात स्वत.विषयी एक चांगली प्रतिमा निर्माण केली आहे. पुण्या–मुबईत नसेल. पण पाटण, कोल्हापूर, इंदापूर अशा ठिकाणी काही लोक त्याना मानतात. त्याच्या राजीनाम्याचा मतपेटीवर निश्चितच परिणाम होईल. विरोधी पक्ष बाळासाहेबांच्या प्रयाणामुळे हुरळले आहेत. आता प्रत्यक्ष बाळासाहेब काय करताहेत ते बघायचे.

– अरुण गोसावी

## मुक्ताफळे

ग्यानबा

### □ ट्रेड युनियनमध्ये मारुती !

लॉर्ड रामाच्या डावीकडे, हात जोडून उभा असलेला डावा पुढारी, मारुती हा लाल का ? मारुती हा रूपाने भीमासारखा असून 'नेटका सडपातळ' देखिल होता. इंद्राने फेकलेले वज्र त्याच्या हनुवटीवर आदळून, वज्राचे दोन तुकडे झाले, यावरून हे वज्र – 'पब्लीक सेक्टर 'मधल्या पोलाद कारखान्यात बनवले असावे, असा एक तर्क करण्यासारखा असला, तरी हनुमानाच्या हनुवटीची ताकद काही कमी नव्हती. वानरी अंजनीचा पुत्र असून हा स्वत: 'वनारी' न राहता प्रभु रामचंद्राजवळ रहायला गेला होता. 'तरुन जो जाईल सिंधु महान्'–असा हा एकच श्रीहनुमान होता. प्रायव्हेट सेक्टरमध्ये या माणसाने रामांसाठी 'लंका ब्रिज' बांधला वगैरे गोष्टी सामान्यत: सर्वांना माहीत आहेत...सेतूसाठी कामगार संघटना त्याने बांधली होती ही गोष्ट तर जगजाहीर आहे. परंतु आपादमस्तक लाल झालेला हा रामसेवक डावा होता काय ?

या संशयाला पुष्टी देणारी घटना नुकतीच घडली आहे. मध्यप्रदेशाचे मजूर-मंत्री गंगाराम तिवारी व मध्यप्रदेश इंटकचे अध्यक्ष द्रवोड यांच्यात फारच मोठा बेबनाव झालेला आहे. गंगाराम तिवारी यांनी आता अशी घोषणा केली आहे की, 'हनुमान चालिसा पथ' नावाची जी नवी कामगार संघटना त्यांनी निर्माण केली आहे, त्या संघटनेचे कामगार, एकमेकांना भेटल्यानंतर 'रामराम' न म्हणता 'जय बजरंग' म्हणतील.

ट्रेड युनियन चळवळीत मारुती दाखल झालेला पाहून, ही संघटना भलतीच ताकदीची होणार याबद्दल आम्हाला मुळीच संशय नाही. श्री. गंगाराम तिवारी हे स्वत: बालब्रह्मचारी असल्यामुळे, त्यांना बजरंगप्रेम असणे स्वाभाविक आहे. परंतु कामगार चळवळीत हनुमानाला येण्याचे प्रयोजन काय, हे आम्हास प्रथम उलगडेना. मारुती चरित्राचे पुर्नमूल्यमापन आवश्यक आहे हे आमच्या ध्यानी आले. 'सोविएत देश' पत्राचे संपादक कोलोकोलव, रशियातील एक निष्णात कामगार स्चिपाचोव, साम्राज्यवादाचे डावपेच तज्ज्ञ सिदेन्को वगैरे मंडळींबरोबर आम्ही मारुती–चरित्रासंबंधी विस्तृत चर्चा केली...चर्चा झाल्यानंतर आमच्या लक्षांत आले की आम्ही किती महामूर्ख आहोत. जे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे ते आम्हास इतके दिवस दिसु नये याची आम्हाला विलक्षण खंत वाटली. मारुती

हा आद्य दावा पुढारी होता असे त्याच्या चरित्रात स्पष्ट म्हटलेले आहेच.

लोकनाथा, जगन्नाथा, प्राणनाथा पुरातना। ध्वजांगे उचली बाहो आवेशे लोटला पुढे। आंवळे दंतपंगती। नेत्राग्नी चालल्या ज्वाळा भ्रुकुटी ताठल्या बळे। —आणि मुख्य म्हणजे 'सकलां ऊठवी बळें' हा उल्लेख तर इतका स्पष्ट आहे, की कॉमरेड मारुती हा कोण होता ही शंका देखिल राहू नये. कॉमरेड डांगेच बघाना. दोन महिन्यांपूर्वी ते मुंबईला आपल्या मित्रांजवळ म्हणाले—'दोन महिन्यात चव्हाणांना गृहमंत्रिपदावरून उठवतो!' दोन महिने संपायच्या आत गृहमंत्रि-पदावरून यशवंतराव चव्हाण उठले. परवा ना. बाळासाहेब देसाई राजिनामा देऊन मुंबईहून उठले. कॉमरेड डांगे म्हणाले—'५ जूनला कॉमरेड कृष्णा देसाईचा खून झाला आणि ५ जुलैला मासिक श्राद्धापूर्वीच ना. बाळासाहेब देसाई मुंबईतून उठले!'

सकळां ऊठवी बळे। ही ताकद असलेल्या बजरंगा—तुला आम्ही इतके दिवस ओळखला नाही याबद्दल आम्हाला क्षमा कर. रामासारख्या पर्से पमावलेल्या श्रीपंतापुढे तू हात जोडून उभा राहिल्याने आमचा गैरसमज झाला. परंतु रामाला तुझा सबंध पाठिंबा असावा. शिवाय 'नमन नमन मे फरक है, बहुत नमे नादान। बेवकूफ सो बार नमे, चिजा चोर कमान।' हे आम्ही विसरलोच. गंगाराम तिवारींच्यामुळे तुझा उशिरा का होईना कामगार—संघटनेत मानाने ओढले जात आहे, हे पाहून आम्हाला आनंद होतो. लवकरच इंटकचा अध्यक्ष द्रवीड, याला अध्यक्षपदावरून उठवून तूं चांगला हिसका दाखवशील अशी आम्ही आशा करतो. जर केंद्र सरकारातील कुणाला तरी उठवून ना. गंगाराम तिवारींना दिल्लीश्वर-सहवास घडायचा मुळीच हरकत नाही.

तरून जो जाईल 'इंदू' महान्
असा हा एकच श्रीहनुमान ॥

## □ मदनाची मंजिरी

सापडले! भिवंडी, जळगाव, महाड येथील, जिथे जे कोण असतील ते बहु-संख्याक व अल्पसंख्याक यांच्यातील भीषण दंगलीमागचे गुंड सापडले!! चार महिन्याची मुदत देऊन दंगलीची चौकशी करण्यासाठी न्यायमूर्ती मदन यांचे चौकशी मंडळ नेमले गेले आहे. 'भूतकाळ उकरून काढू नका—न्या. मदन यांना सत्य शोधू द्या,' असे आवाहन मुख्यमंत्री नाईक यांनी केले आहे. परंतु मदन यांना आता काही काम राहिले आहे असे आम्हास वाटत नाही. काही दिवसातच भिवंडी व जळगाव दंगली संबंधांतील प्रमुख आरोपी म्हणून म. म. दत्तो वामन पोतदार, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, इतिहास संशोधक मंडळाचे खरे या सर्वांना अटक झाली तर आम्हास मुळीच आश्चर्य वाटणार नाही. महान ग्रंथ तुरुंगातच लिहिले

जातात. या दृष्टीने म. म. दत्तो वामन पोतदार यांना होणारी अटक स्वागतार्ह असली व शिवचरित्र लिहिले जाण्याचा संभव असला तरी कदाचित बंदिवासात शिवचरित्र लेखनावरच सरकार बंदी घालण्याचा संभव आहे.

जातीय दंगलीमागील प्रमुख गुन्हेगार शोधून काढण्याचे हे काम, सुप्रसिद्ध प्रजा समाजवादी पक्षाचे अध्यक्ष ना. ग. गोरे यांनी पार पाडले आहे. पुणे येथील फॉईल क्लबातील भाषणात ना. ग. गोरे म्हणाले –

" आमचा इतिहास म्हणून जे काही लिहिले गेले आहे व शिकवले जाते आहे त्यातच जातीय मतभेदांचे बीज पेरले जाते. यासाठी आमचा इतिहासच बदलण्याची वेळ आली आहे. शत्रूचा वाईटपणा उजेडात आणून त्याची जोपासना इतिहासकार करतात व आजच्या जातीय दंगलीस हीच वृत्ती कारणीभूत आहे. [ जाड ठसा आमचा ]

इतिहास बदलण्याचा ना. ग. गोरे यांच्या सूचनेला आमचा हार्दिक पाठिंबा आहे. परंतु नुसता इतिहास बदलून वा खोटा इतिहास निर्माण करून भागेल असे आम्हास वाटत नाही. ठिकठिकाणी मुसलमानी सत्तेविरुद्ध मराठ्यांचे रक्त सांडले आहे व त्या रक्ताचे डाग मिरवणाऱ्या वास्तु ठिकठिकाणी महाराष्ट्रात उभ्या आहेत. त्या सर्व जमीनदोस्त करणे आवश्यक आहे. पुरंदर, प्रतापगड, सिंहगड, रायगड...हे सर्व गड बुलडोझरने जमीनदोस्त करावे. शिवाजी महाराजांचे पुतळे उखडून टाकावे लागतील...हे काम जरा अडचणीचे आहे; परंतु कुणालाही न कळता पुतळे फोडता येतात, व असे ' कारागीर ' पुण्यात आहेत.

मंडळी, इतिहास घडवण्याची ताकद आपल्यात नाही–निदान आहे तो नाहीसा करण्यासाठी तरी सर्वांनी झटले पाहिजे. न्या. मदनाच्या सत्यशोधनाच्या कामाला आलेली ही किती बरे सुंदर मंजिरी ?

◻ ◻ ◻


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागावरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणाची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे, आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

वेस्टर्न इंडिया कं. (बी. एन.) पो कतरीसराय (गया)

# ।। नाचू कीर्तनाचे रंगी ।।

# ।। ज्ञानदीप लावू जगी ।।



कै. ह. भ. प. मुरलीधरबुवा निजामपूरकर

---

**दीनबंधू मुरलीधर उपासनी**

---

श्रीपांडुरंग हरि। वासुदेव हरि।

भोजनाची तयारी झाली होती. श्री-पांडुरंगमूर्तीला नैवेद्य झाला होता. नानींनी वैश्वदेवाची तयारी केली होती. नानांनी मुरलीधराला बोलावून घेतले आणि 'दक्षिणेसाठी पैसे सुटे घेऊन ये; ब्राह्मण खोळंबले आहेत. लवकर ये' म्हणून बाजारात पाठविले. मुरलीधर पळत बाजारांत गेला; पैसे सुटे घेऊन परत मदिराकडे येत होता.

पेटीवर सूर निघत होते. मीरेच्या भजनाचे शब्द सुरेल होत होते. दोन मुले राधाकृष्णाचे नृत्य तालावर नाचत होती. स्वर कानावर पडताच उत्सुकतेनं मुरलीधरानं काय चाललं आहे म्हणून जवळ जाऊन पाहिलं. आणि राधाकृष्णाच्या

सुविख्यात कीर्तनकार कै. मुरलीधरबुवा निजामपूरकर यांचे निधन होऊन या २१ जुलैस एक वर्ष पुरे होत आहे. लौकिक-दृष्ट्या अल्पशिक्षित असलेल्या या हरिभक्ताने आपल्या वाणीने महाराष्ट्रांतील अबालवृद्धांस जणु मुग्ध केले होते. अत्यंत नियम-निष्ठ असलेल्या बुवांस श्रद्धावंत श्रोत्यांच्या अतिशय आग्रहामुळे इंग्लंडमध्ये जाऊन तिथे पंधरा दिवस कीर्तने करावी लागली होती. हरिकथा सातासमुद्रापलीकडे नेणाऱ्या या हरिभक्ताचा हा परिचय ...

नृत्यानं लोभावून तो तिथंच थबकला आणि क्षणात सारं विसरला. 'नानां'नी पैसे सुटे करून आणावयास पाठविल आहे. ब्राह्मण खोळंबले आहेत, दक्षिणेवांचून भोजनास सुरुवात होणार नाही हे सारंच. अत.करण जाणिवेपलीकडं गेल. चित्त तन्मय झाल. एकतानतेन नृत्य पहात उभा राहिला.

कुणीतरी मुरलीधराला पाहिलं अन् तसंच जाऊन नानांना सांगितलं, 'गणपति-बुवा, तुमचा मुलगा तमाशा पहात बाजारात उभा आहे.' नाना संतापले.

नृत्य संपलं. मुरलीधर भानावर आला अन् लक्षात आलं की आपण कशासाठी बाहेर पडलो होतो. घरी ब्राह्मण खोळबले असतील, नाना संतापले असतील.

लगबगीनं मुरलीधर घरी आला. दक्षिणेचे पैसे नानाजवळ दिले. तेव्हा नाना काहीच बोलले नाहीत. दक्षिणा दिली. पात्रप्रोक्षण संकल्प झाला. 'अन्नपते'चा गजर झाला. ब्राह्मण भोजनाला बसले.

भोजन आटोपलं. ब्राह्मण परतले. आतापर्यंत साठविलेल्या संतापानं उचल खाल्ली. उद्रेक बाहेर पडला. अंध नानानी काठी मागितली. मुरलीधराला बोलावलं, आणि यष्टिप्रहार करण्यास सुरुवात केली. 'कुलांगार, कुलातील ज्येष्ठ पुत्र तू. जबाबदारीची जाणीव नाही तुला. तमाशा पाहण्याचं वेड ! केवढ्या अपेक्षा ठेवल्या होत्या तुझ्याकडून ! विद्वान होशील, कुलपरंपरा चालवशील, कुटुंबाचा भार उचलशील ! साऱ्या अपेक्षा धुळीत मिळविल्यास ! हे वेड तुला ! नाना मारतच होते. अंध होते, दिसत नव्हत. कुठ कुठं मार बसत होता. मुरलीधर जागचा हलला नाही. सहन करीत होता. नानाची व्यथा ऐकत होता. सुसस्कृत मन उचबळत होतं, शब्दाशब्दाचा ठसा साठवीत होतं. समाधान होईपर्यंत नानानी मारलं. क्रोध शात होईना. नानींनी मध्ये पडून मुलाला सोडवलं. शरीरावर जखमेचे व्रण उभारले.

आणि मनावर व्यथेचे; पित्याच्या व्यथेचे ! तेच शब्द सारखे घोळत राहिले. ' विद्वान होशील, कुलपरंपरा चालविशील ! कुटुंबाचा भार उचलशील !'

रात्री सारी मंडळी नित्यनियम आटोपून झोपी गेली. मुरलीधराला झोप येईना. मन व्याकुळ होत होतं. ' मी खरोखरच कुलागार निपजलो का ?' तशाच अवस्थेत मुरलीधर उठला. रात्रीच घर सोडल, गावाची हद्द ओलांडली. अपेक्षापूर्तीसाठी, विद्येच्या हव्यासानं !

प्रथम नेर गाठलं. काशिनाथशास्त्री भंडाऱ्यांकडे गेला. ओळख सांगितली. त्याच्याकडे काही दिवस अध्ययन केल. पण हव्यास मोठा होता. त्याची मुले काशीस जाण्यास निघाली होती, त्याच्याबरोबरच काशीस जाण्याचा मुरलीधरान हट्ट धरला. पण खर्चाविषयास जवळ पैसे नव्हते. शेवटी धुळ्याच्या शाळांमधून वर्गणी करून भाड्याचे पैसे मिळविले. इच्छा दुर्दम्य होती. मुरलीधराचा पंडित मुरलीधर-शास्त्री होण्याची ! वेदवेदांगाचं अध्ययन करण्याची !

वयाच्या बाराव्या वर्षी मुरलीधर काशीस आला. लक्ष्मणशास्त्री द्रविड ह्यांच्याकडे अध्ययनास सुरुवात केली. व्याकरण, काव्य, तर्क व वेदांताचे प्रकरण ग्रंथ आणि प्रस्थानत्रयीवर काशीच्या आठ वर्षांच्या वास्तव्यात असाधारण प्रभुत्व मिळविलं. आणि हे सर्व लिहिता येत नसूनही ! मौखिक परीक्षा देऊन ! विद्येच्या उपासने-बरोबरच बलोपासनाही चालली होती; आणि एका कथ्थकाकडे नृत्याचा अभ्यासही! आठ वर्षांत घरून अवघे ३५ रुपये आले होते. इलाज नव्हता, दारिद्रय होतं. भिक्षान्नावर उदरनिर्वाह आणि अध्ययनात समय व्यतीत होत होता.

अशातच बडोद्याचे कीर्तनकेसरी नानाबुवा बडोदेकर काशीस आले होते. यात्रे-साठी. त्यांची कीर्तनेही चालू होती. बराच प्रौढ विद्यार्थीवर्ग त्यांच्या कीर्तनाकडे आकृष्ट झाला होता. मुरलीधरही जात असे. त्याच्या वक्तृत्वावर आणि कीर्तन-शैलीवर तो लुब्ध झाला. एक दिवस जाऊन त्यांचे चरण धरले.

" महाराज, मी मूळचा निजामपूरचा. खानदेशातील धुळे जिल्ह्यातला. श्रीएकनाथ-महाराजाचा आमच्या मूळपुरुषावर खास अनुग्रह. त्याच्या वंशातील मी सातवा पुरुष. निजामपुरास आमचा मठ आहे. आमची कीर्तनाची परंपरा आहे; माझे वडील अंध आहेत. घरात वयाने सर्वांत मोठा मीच. मठाचे आधिपत्य माझ्याकडेच येणार. घरातील दारिद्रय ! मला अधिक अध्ययनात काशीस वेळ घालविता येणार नाही. आपण मला पदरात घ्या, कीर्तनविद्या द्या." नानामहाराज कबूल होईनात. " मी विद्वान नाही, मी एक हरिदास आहे; सागराला सोडून नदीकडे धाव घेतो आहेस मुला, आणि पुन्हा मला कुणा माणसाची गरज नाही." महाराज ऐकत नाहीत म्हणून मुरलीधराने त्यांच्या वडील बंधूची गाठ घेतली. व पुढील मुक्काम कुठे ह्याची चौकशी केली. वसई येथे रामनवमीच्या उत्सवास जाणार असे कळल्यावर मुरलीधरानं काशी सोडली. अध्ययन पूर्ण झालच होतं. पण जे राहिलं होत तेही

सोडलं. कुणालाही न सांगता ! परत उगमाकडे धांव ! आता कुलपरंपरेचा हव्यास ! मुरलीधर पंडित मुरलीधरशास्त्री म्हणून परतले. हरिदास होण्याच्या इच्छेनं ! काशी सोडली हे सहाध्यायानाही माहीत नव्हत. दररोज गंगेच्या पाण्यात उड्या टाकून घाटावरील व्यायामशाळेत दंड बैठका आणि नमस्कार घालणाऱ्या स्नेह्यांनाही ! दुसऱ्या दिवशी फक्त मुरलीधराचा लाल लंगोट व्यायामशाळेत तसाच वाळत पडलेला होता. मुरलीधराचा पत्ता नव्हता.

घरी येऊन तीर्थरूपाची भेट घेतली व मनोदय सांगितला. नानांनी अनुज्ञा दिली.

फाल्गुन वद्य चतुर्दशीला वसईस पोहोचले. आणि प्रतिपदेला महाराजांना घ्यायला मंदिरासमोर हजर. टांग्यातून सामान उतरवू लागले. महाराजांनी पाहिलं. काशीस भेटलेला तोच हा मुलगा. त्यांना आश्चर्य वाटलं. लगेच त्यांनी चौकशी केली—" कधी आलास ? " " चतुर्दशीलाच. " " कुठे जेवलास की नाही ? " " गावांत परिचय नव्हता. " महाराज गहिवरले. ध्येयाची ओढ पाहून ! त्यांनी गाढ आलिंगन दिले आणि पदरात घेतले.

दीड वर्ष सान्निध्य केलं. कीर्तनविद्या आत्मसात केली. शास्त्रीय ग्रंथांचे अध्ययन झालं होतंच. तालसुराचं ज्ञान घरांतूनच झालेलं. दररोज गुरुसेवा करावी. अध्ययन करावं, व रात्री कीर्तनात टाळ घेऊन उभं रहावं. पुढे प्रवासातच मुरलीधर आजारी पडले आणि आपला त्रास होऊ नये म्हणून घरी परतले

काही दिवसानी महाराज नाशिक येथे असताना परत मुरलीधरबुवा त्यांच्याकडे गेले. सान्निध्य झालं. कीर्तनात कबीरकमालाचे चरित्र महाराजांनी सागितले होते. घरी आल्यावर मुरलीधरबुवा रडू लागले. मला असं चरित्र केव्हा सांगता येईल ही त्यांना तळमळ लागली होती. महाराज म्हणाले " अरे रडून कुठे विद्या येत असते ? तूं तर माझ्यापेक्षाही उत्तम कीर्तन करशील ! "

पुढे नाशिकलाच भटजीबापूकडे मुरलीधरबुवानी श्रीमद्भागवताचे अध्ययन केले. प्रत्येक स्पर्धेत मुरलीधरबुवा प्रथम असत.

मुरलीधरबुवानी घरी आल्यावर वीणा उचलला. ते हरिदास झाले प्रथम गुजराणातच हिंडत ते प्रवास करीत. आत्मविश्वास वाढला लौकिक वाढला. धुळे—चाळिसगावसारख्या मोठ्या वस्तीच्या गावाची निमंत्रणे येऊ लागली.

मुरलीधरबुवा कीर्तनातून अध्यात्म बोलत ! नानामहाराजांच्या सहवासात त्याच्या आचरणाचाही मुरलीधरबुवाच्या मनावर पगडा बसला होता. महाराज बोलतात ते अनुभवीत असावेत असं मुरलीधरबुवाना वाटे आणि स्वतः बोलतानाही वृत्ति नि.संदेहीत नसे. मुरलीधरबुवानी परत नानामहाराजाचे पाय धरले. ' मला कीर्तनविद्या दिलीत, जीवन दिलत. आता मला अध्यात्मविद्या द्या, निःसंदेह करा. " महाराजाना बुवाच्या शुद्ध आचारविचाराचा परिचय होताच. त्यांनी लगेच आत्मविद्या दिली. बुवा नि.संदेह झाले.

"कानी जे पेरले तेंचि डोळां उगवले ।"

आत्मनिष्ठ ब्रह्मनिष्ठ झाले. श्रुतिस्मृति अधीत होत्याच. त्यामुळे आता श्रोत्रीय ब्रह्मनिष्ठ झाले.

देशांत अनंत विचारांचे काहूर माजले होते; पण साऱ्यांचा सूर एकच होता. परकीय सत्तेचं जू भिरकावून देण्याचा. बुवाची विचारांची बैठक आध्यात्मिक होती. आणि 'राष्ट्रीय वृत्ति आध्यात्मिक बैठकीवरच आधारित असते. कीर्तनकार हा उत्तम लोकशिक्षक असावा आणि समाजाला विचारांची आणि आचारांची दिशा देणारा असावा' ह्या 'समर्थ' बाण्याला ते ओळखीत होते. बुवांनी तेच केले. उत्तररंगातून भारतीय कथा, रूपककथा, शिवचरित्रातील आदर्श त्यांनी समाजाला दिले. आध्यात्मिक विचारांच्या बैठकीवरच असीम त्यागाची आणि राष्ट्रवृत्तीची जोपासना होते, हे मौलिक विचार ते पूर्वरंगातून देत असत.

मुरलीधरबुवांचा मुक्काम येवल्याला होता. कीर्तनांतून ते राजकारण बोलत आणि प्रच्छन्नपणे ब्रिटिशसत्तेवर कडक टीका करीत. कीचकवधासारख्या भारतीय कथांवर रूपक करीत.

ब्रिटिश सत्तेच्या एका हेरानं एवढ्या समाजासमोर हा गृहस्थ काय बोलतो म्हणून उत्सुकतेनं कीर्तन एकलं, आणि दुसऱ्या दिवशी मुक्कामी पोलिसचौकीवरचं बोलावणं आलं. बुवा गेले आणि त्यांना अटक झाली. बुवांना अटक झाल्याची बातमी हां हां म्हणतां गावात पसरली— खळबळ माजली. बुवांनी कारावासातही आपला नित्यनियम सोडला नाही. स्नान-संध्या यथोचित चालूच होतं. घरून त्यांचे बंधु श्रीरामबुवा दुधांतील दशमी आणून देत.

महिन्याभरानेच त्याना सोडून दिले. पण जनतेवर त्याचा विशेष परिणाम झाला. त्याकाळी खानदेशात राष्ट्रीय वृत्तीच्या जोपासनेत बुवांचे प्रमुख अंग होते.

बुवांचा लौकिक वाढत गेला. यशोमंदिराच्या चढत्या पायऱ्या ते चढूं लागले.

काशीस बुवा आले : जिथं मधुमक्षिका वृत्तीनं विद्यामध गोळा केलं तिथं. त्या काशीस दत्तावधूतालयात बुवांनी कीर्तनगंगा 'गंगेला' मिळविण्यासाठी आणली. 'नाना' बरोबर होते. त्यांच्या 'अंधत्वा'च्या 'दृष्टी'चं कौतुक पाहण्यासाठीं.

दत्तावधूतालयात 'जनिमसतः सतो मृतिमुतात्मनि ये च भिदां विपणमृतं स्मरन्त्युपदिशन्ति न आरुपितैः ।' ह्या वेदस्तुतीवर बुवांना बोलण्याचा आग्रह पंडितांनी धरला होता. षड्दर्शनांच्या विचारांचं यथोचित दिग्दर्शन करून 'वेदांत' दर्शनाच्या मंडनानं त्यानी काशीच्या प्रकाण्डपण्डिताना मुग्ध केलं. त्या पंडितांनी साङ्गवेद विद्यालयातर्फेच सन्मानपत्र अर्पण केल. त्यावेळी राजेश्वरशास्त्री द्रविड उठून, नानांना उद्देशून, म्हणाले, "गणपतिबुवा, तुमचे भाग्य दशरथापेक्षां थोर. आपला पुत्र कुलललामच आहे. 'पुत्र व्हावा ऐसा गुंडा ज्याचा तिही लोकीं झेंडा.'

पृष्ठ ५५ वर

# मुस्लिम समाजप्रबोधन अंगार फरिश्ता आणि हिदायतखान

**वि. शं. पारगावकर**

चार जुलैच्या ' माणूस 'मध्ये श्री. हिदायतखान यांचा, हमीद दलवाईंवर झालेल्या पुण्यातील हल्ल्याच्या निमित्ताने प्रसिद्ध झालेला लेख वाचला. नंतर लगेच त्यानंतरच्या अंकातील हिदायतखानवर त्याच्या लेखाच्या संदर्भात टीका करणारा लेख वाचण्यात आला. त्या लेखाचे नाव ' मुस्लिम समाजप्रबोधन, हिदायतखान आणि दलवाई ' असे आहे. हा लेख लिहिणारे कोण गृहस्थ आहेत हे कळू शकत नाही. कारण तो अंगार फरिश्ता ' या बुरखाधारी नावाने प्रसिद्ध झालेला आहे. अर्थात वर मी त्याला टीका लेख म्हटले, परंतु खऱ्या अर्थाने तो टीका लेख नसून हिदायतखान यांच्यावर वैयक्तिक हल्ला चढवून गालीप्रदान करणारा लेख आहे.

वास्तविक साधा संकेत असा आहे की ज्या व्यक्तीच्या विचारांविषयी आपल्याला उघड (प्रगट) मतप्रदर्शन करावयाचे आहे त्या व्यक्तीने जर आपले विचार टोपण नावाने मांडलेले नाहीत तर आपल्यालाही असा छुपा वार करण्याचा अधिकार पोचत नाही. हिदायतखानही विचार प्रदर्शनासाठी बुरखा घेत नाहीत. आणि मजा अशी आहे की या ' अंगार फरिश्ता ' वाल्यांना मात्र आपले नाव साध्या मत-प्रदर्शनासाठी खर्ची घालण्याची हिम्मत होत नाही. आणि हिदायतखान यांना मात्र हे हिमतीच्या आणि अकलेच्या गोष्टी शिकवतात. खरे म्हणजे ' माणूस 'च्या संपादकांनी या बुरखाधारी इसमास येथे वावच द्यावयास नको होते.

' अंगार फरिश्ता ' आपल्या लेखाची सुरुवातच कशी करतात ते पाहण्यासारखे आहे. ते लिहितात : ' श्री. हिदायतखान यांचे ' माणूस 'मध्ये मुस्लिम प्रश्नाबाबत जे जे लिखाण आजवर प्रसिद्ध झाले ते सर्व ऐकीव किंवा कपोलकल्पित गोष्टींवर आधारित असते. ' वास्तविक हा आरोप किती फुसका आहे हे मी विशद करून सांगण्याची काही गरज आहे काय ? पुढे ' अंगार–' म्हणतात, ' घटनास्थळी तर ते कधी नसतातच, पण त्या घटनांना कारणीभूत असणाऱ्या व्यक्तींनाही भेटण्याची फारशी तसदी घेण्याच्या फंदात न पडता ते आपल्या लेखाचा अलिशान इमला

सत्यशोधकाच्या आवेशात उभा करतात तेव्हा त्यांच्या या साहसाचे कौतुक वाटते— वगैरे.'

खुद्द हिदायतखान याचा लेख वाचला तर आपणास असे दिसून येईल की कुठल्याही घटनास्थळी असण्याचा दावा त्यानी कुठेही मांडलेला नाही. आणि कोणताही मुद्दा त्यानी सत्यशोधकाच्या आवेशात माडलेला नाही. उलट सबध लेखात मला त्याची भूमिका प्रामाणिकपणाची आणि श्री. दलवाई यांच्याविषयी आदरभावच व्यक्त करणारी दिसते. हा एक मुद्दा झाला. दुसरा, आपल्या लेखात हिदायतखान यांनी जे मुद्दे उपस्थित केले आहेत ते वैचारिक आहेत. घटनास्थळाची किंवा संबधित व्यक्तीच्या अतर्मनाची पाहणी करून निष्कर्ष काढले आहेत असा दावा ते कुठेही माडीत नाहीत. उलट घटनास्थळ अथवा तेथील वर्तनाविषयी त्यांनी जे मतप्रदर्शन केलेले आहे ते अनेक वर्तमानपत्राचे दाखले उधृत करूनच केलेले आहे. शिवाय त्या पुढेही जाऊन ते याविषयी लिहितात, '...इत्यादी वृत्तपत्र-क्षेत्रातील व्यक्तीकडून मला मिळालेली ही माहिती जर खरी असेल तर...' म्हणजे वरील माहितीविषयीही त्यानी आंधळेपणाची भूमिका पत्करलेली नाही. शिवाय त्यांच्या या भूमिकेत आढयता, हेकेखोरपणा किंवा आवेश न दिसता तळमळ आणि प्रामाणिकपणाच दिसतो हे विचारवत वाचक जाणतीलच.

त्या उलट 'अंगार–'ची भूमिका पाहा. वर मी त्यांच्या लेखाची सुरुवातच उधृत केलेली आहे. त्यानंतरचे हिदायतखान यांच्याविषयीचे त्यांचे वाक्य असे। 'त्यांनी (हिदायतखानांनी) आपले लेखन करताना अधिक नेकी (म्हणजे अंगार फरिश्ता दाखवितात तशी?) आणली तर त्याच्या गंभीर लेखनाचीही कपोल-कल्पित ललित साहित्यात गणना करण्याची पाळी येणार नाही! अथवा त्यांनी कथा-कादबऱ्या लिहिण्याचा आपला धंदा चालू ठेवावा, अन्य लेखनाच्या क्षेत्रात फुकट लुडबुड करू नये.'

वरील विधाने किती आचरटपणाची आहेत हे खुद्द हमीद दलवाईदेखील 'अंगार'बुवांना सांगतील. ज्या कथा-कादंबऱ्याचा आणि त्यांच्या धंद्याचा उल्लेख कुत्सितपणे 'अंगार फरिश्ता' करतात. त्या कथा-कादंबऱ्या दलवाई यांनीही लिहिलेल्या आहेत. इतकेच नव्हे तर त्यात त्यांनी आपली श्रेष्ठताही पटवून दिलेली आहे. श्री. दलवाई याचा पिंड कलावंताचा आहे हे मी त्यांचा मित्र असल्यामुळे मला अधिक माहीत आहे. 'अंगार फरिश्ता' यांना ते माहीत नसले तर या माहितीच्या आधारावर ते 'दलवाईने हा कथा-कादंबरीचा धदा बंद' करण्याचा उपदेश त्यांना करणार नाहीत ना? यावरून कसल्याप्रकारची विधाने करून त्यांनी सामान्य वाचकाची दिशाभूल केलेली आहे हे सहज लक्षात येईल.

तीच हिदायतखान यांची भूमिका पाहण्यासारखी आहे. आपल्या लेखात ते एके ठिकाणी म्हणतात, 'विरोधी शक्तीचा निःपात या पद्धतीने होऊ शकेल, असं

कदाचित दलवाईंना वाटत असेल आणि म्हणूनच पूर्ण विचारांनीच त्यानी जशास तसे या न्यायाने ही 'challenging poze' घेतली असेल, परंतु मला तरी हे पटत नाही. कार्यसिद्धीच्या दृष्टीने असा पवित्रा उपकारक ठरण्याऐवजी अपकारक ठरण्याचीच केवळ शक्यता आहे, असं नव्हे तर त्यामुळे निष्कारण संघर्षाला आमंत्रण दिल्यासारखे होणार आहे.'

वरील विचारात काही विसंगती किंवा फुसका आवेश अथवा दलवाईंना किंवा त्यांच्या कार्याला गालबोट लावण्याची थोडी तरी कृती दिसते काय? मला तर असे वाटते की, 'अंगार फरिश्ता' याना एक तर हिदायतखान याची भूमिकाच आकलन झाली नाही किंवा ललित लेखक, सामाजिक कार्यकर्ता आणि विचारवंत यांच्या कार्याविषयी त्याच्या मनात भलतेच भ्रम दिसतात. कार्यकर्त्याच्या कार्याकडे दोन भूमिकावरून पाहता येते. एक कार्य या भूमिकेवरून आणि दुसरे वैचारिक भूमिकेवरून. हिदायतखान दलवाईंचे कार्य जर वैचारिक भूमिकेवरून पाहात असतील तर तसा त्याना अधिकार आहे 'अंगार फरिश्ता' आपल्या लेखात एके ठिकाणी म्हणतात किंवा हिदायतखान याना प्रश्न विचारतात, 'प्रश्न विचारावासा वाटतो की दलवाईंची भूमिका व विचार बरोबर आहे असा जो आव हिदायतखान आणतात तो खरा असेल तर आपल्या पद्धतीने हिदायतखान काही या बाबतीत करतात काय?' म्हणजे प्रत्यक्ष कार्य केले तरच वैचारिक अथवा टीकात्मक भूमिका माडण्याचा अधिकार, अन्यथा नाही असा या 'अंगार फरिश्ता' याचा खाक्या दिसतो. ही भूमिका नुसती वेडेपणाची नाही तर पोरकटपणाची आहे. या संदर्भात मला एक गोष्ट आठवते. कोशकार श्री. व्यं. केतकर यांच्याकडे एका नवोदित कवीने आपल्या कविता वाचावयास आणून दिल्या व आपला अभिप्राय देण्याविषयी त्यांना विनंती करून तो गेला. दुसरे दिवशी सकाळी कवी केतकरांकडे गेला व कवितेबद्दल अभिप्राय विचारू लागला. कवितेचे बाड त्याच्या हाती देत केतकर म्हणाले, 'मला यातली एकही कविता आवडली नाही. तुम्हाला अजून खूपच प्रयत्न करावा लागेल' कविवर्यांना त्या अभिप्रायाचा राग आला. झटक्यात बाड बगलेत मारून ते वळले आणि वळताना म्हणाले, 'मला वाटलच होत तुम्हाला यातलं काही कळायच नाही. तुम्ही आयुष्यात एखादी तरी कविता केली आहे काय?' त्यावर केतकर शांतपणे म्हणाले, 'तुमचं बरोबर आहे. मी कोंबडी-सारखं अंडं देत नाही पण अंड्यांचं ऑम्लेट चागल का वाईट हे मला कळतं!'

याच न्यायाने असे म्हणता येईल की हिदायतखान अंगार फरिश्ता यांच्या अपेक्षेप्रमाणे 'मुस्लिम समाजप्रबोधना'चं कार्य करीत नसतील परंतु त्या कार्यावर आणि तेथील कार्यकर्त्यांवर वैचारिक भूमिकेवरून टीका करण्याचा त्याना जरूर अधिकार आहे. त्यानाच काय अंगार फरिश्ता स्वतः मुसलमान नसले तरीदेखील त्यांनाही हा अधिकार आहे. □□□



समीर

## ◻ परिस्थिती-शास्त्र

या पृथ्वीवर किती माणसे राहू शकतील ? पृथ्वीवरील पाणी व हवा मानवाने किती दूषित केल्यावर मानवी जीवनच धोक्यात येईल ? या व असल्या परिस्थिती–शास्त्राशी (इकॉलॉजी) संबद्ध समस्यांची चर्चा करण्यासाठी दिल्लीत नुकत्याच योजलेल्या परिसंवादात भाग घेण्यासाठी आलेले एक अमेरिकन शास्त्रज्ञ डॉ. लमॉंट कोल यांनी याबाबतीत वस्तुस्थिती किती गंभीर आहे य.ची ओझरती कल्पना दिली :

या क्षणी मानव आपल्या सभोवतालच्या नैसर्गिक परिस्थितीची भयंकर प्रमाणावर नासधूस करीत असल्याची शक्यता आहे, व ही नासधूस अखेर जागतिक दुष्काळ, प्लेग किंवा अणुयुद्धाहून अधिक विनाशकारी ठरेल. परंतु परिस्थिती दूषित करणाऱ्या द्रव्यांच्या नियमनाबरोबरच जागतिक लोकसंख्येचा विस्फोट आटोक्यात आणण्यासाठी जोरदार प्रयत्न व्हायला हवेत. कारण एकीकडे नवनवीन तांत्रिक प्रगतीमुळे वातावरणात सुमारे पाच लाख प्रकारची रसायने सोडली जात आहेत तर दुसरीकडे जगाची लोकसंख्या दर २५ वर्षांनी दुप्पट होण्याची भीती निर्माण झाली आहे.

‘लोकसंख्यचा स्फोट कशाने थांबेल हे मी सांगू शकत नाही. विचारपूर्वक उपाययोजना करून आपण तो थांबवू शकू. पण आपण तसा तो थांबवला नाही तर इतर काही गोष्टींनी तो थांबवला जाईल. त्या गोष्टी म्हणजे कदाचित दुष्काळ, रोगराई किंवा अणुयुद्ध किंवा नैसर्गिक परिस्थितीत एखादा फार मोठा हानिकारक बदल घडून येण्यानेही ही गोष्ट घडेल. उदाहरणार्थ, वातावरणातला प्राणवायु संपू लागेल, किंवा असेच काहीतरी दुसरे होईल.’ डीडीटीसारखी जंतुनाशक द्रव्ये कमी प्रमाणात वापरली तरी त्याच्यामुळे सागरी वनस्पतींची ‘फोटो सिंथेसिस’ची प्रक्रिया फारच मंदावते. या प्रक्रियेला जर कायम स्वरूपाची इजा पोचली तर आधुनिक मानव–प्राण्याच्या तांत्रिक संस्कृतीत जळण म्हणून खर्च होणाऱ्या प्राणवायूचा प्रचंड व्यय भरून काढण्यासाठी पृथ्वीवर पुरेसा नवीन प्राणवायु तयार होणे शक्य होणार नाही.

नैसर्गिक परिस्थितीतल्या या संभाव्य समरप्रसंगाची शक्यता कमी करण्यासाठी काय केले पाहिजे ? ‘तंत्रज्ञानाला लगाम घातल्याखेरीज तरणोपाय नाही.’ जगाची लोकसंख्या आत्मनाश ओढवून घेतल्याखेरीज कशी वाढेल हे समजण्यासाठी बरेच अधिक संशोधन होणे आवश्यक आहे. ते काही असले तरी वातावरणाचे दूषितीकरण अनिर्बंध चालू राहिले तर परिस्थिती आटोक्याबाहेर जाऊ शकेल. ‘आपण आपल्या हातानी पृथ्वीवर माणसाचे जीवन अशक्य करू शकू–आणि हे आपण काही नुकसान केले आहे याची जाणीवही व्हायच्या तीस वर्षे आधी घड शकेल.’

## ◻ व्हिएटनामवर अमेरिकन मताची दुसरी बाजू

व्हिएटनाम युद्धातून अमेरिकन सरकारने अंग काढून घ्यावे म्हणून अमेरिकेतील विद्यार्थ्यांनी जोरदार आंदोलन चालविले आहे. पण अमेरिकेने व्हिएटनाममधून किंवा एकंदर आशियातून अंग काढून घेण्याच्या बाबतीत दुसरी बाजू मांडणारेही काही अमेरिकन तज्ज्ञ आहेत, व त्यांचे मत आंतरराष्ट्रीय राजकारणाचे विद्यापीठ म्हणून जगप्रसिद्ध असलेले ‘वुड्रो विल्सन स्कूल ऑफ पब्लिक अँड इंटरनॅशनल अफेअर्स’ येथील प्राध्यापक विल्यम लॉकवुड यानी गेल्या आठवड्यात दिल्लीच्या भेटीत असे मांडले :

‘या बाबतीत आमचे मत मध्यममार्गी आहे. जगापासून अलग राहण्याची वृत्ती अमेरिकेत नव्याने वाढत आहे याबद्दल आम्हाला काळजी वाटते. व्हिएटनाममध्ये जो दुर्धर प्रसंग ओढवला आहे त्यामुळे आशियात इतरत्र ज्या आशादायक घटना घडत आहेत त्यांच्याकडे जनतेचे दुर्लक्ष झाले आहे. या घटनांची उदाहरणे म्हणजे भारताची परिस्थिती व जपानचे आर्थिक पुनरुत्थान. व्हिएटनाममधून अंग काढून घेण्यात घाई होऊ नये असे आम्हाला वाटते. मात्र आता परिस्थिती बदलली आहे. हे इंडोचायनाचे प्रकरण म्हणजे खरोखरीच एक घोडचूक आहे. या चुकीमुळे अमेरिकेचा पाय कशाकशात अडकेल याचा अंदाज, हे सर्व प्रकरण अध्यक्ष केनेडी यांच्या वेळी सुरू झाले तेव्हापासूनच कोणाला नीट आला नाही.’ तरीदेखील अमेरिकन सैन्य लवकर काढून घेतल्याने ही समस्या सुटणार नाही. ‘सैन्य काढून घेतल्यावरही या प्रदेशात स्थैर्य राहण्याची काहीतरी हमी कशी मिळेल हा मुख्य प्रश्न आहे.’

◻ ◻ ◻



# ओझं

मोहन जोशी

म्हातारीच्या भाकरी करून झाल्या तरी सिद्राम अंथरुणातच लोळत होता. चावडीतले पाचाचे ठोके कानावर आले, तसा आळस झाडून तो उठला. दाराशी येऊन दीर्घ जांभई दिली. जरा तरतरी आली तसं दिवसाची वेवधानं पाठीशी लागली.

पांदीकडची साडेतीन एकराची पट्टी आज

नांगरून काढायची होती. म्हातारीला रात्रीच सांगून ठेवलं होतं. तिनं एव्हाना भाकऱ्या बडवून ठेवल्या होत्या.

सिद्रामनं गडबडीनं तोंड धुतलं. मळकट टॉवेलानं हात पुसत चुलीपुढं येऊन बसकट घातलं. निखाऱ्यावर ठेवलेलं चहाचं चेबलं आणि एक बशी म्हातारीनं त्याच्यापुढं ठेवली, पाचसहा भाकरीची चवड एका फडक्यात बांधून त्याच्यापुढं सारली, नि टक लावून त्याच्याकडं बघत राहिली.

बाबा मेल्यापासून सिद्रामची आई अशी खगून गेली होती. धिप्पाड देह वर्षा-सव्वावर्षात पार हडबडून गेला होता. एकदम म्हाताऱ्यागत दिसायला लागली होती ती. बडबड, हसणं, चेष्टा—मस्करी; सारं सारं त्या क्षणी बंद होऊन गेलं होतं. अलीकडं ती नुसतं टक लावून बघत बसते. कधीतरी शब्द आलाच तोंडून तर तो ठरलेला, " सिदा, चांगली पोरगी बघुनशान लगीन करून घे ! "

सिद्राम नेहमीसारखाच दुर्लक्ष करायचा. एक दोनवेळ विचारून पाहिलं नि पुन्हा तिनं नाव काढायचं बंद केलं ह्या विषयाचं. सिद्राम पुढ्यात बसला की, दीन-वाण्या नजरेनं बघत बसते ती त्याच्याकडं !

विचाराच्या वाफेबरोबर त्यानं चहा घोटला, पुन्हा एकवार तोंड वासून जांभई दिली. आळस झटकून तो उठला.

बाहेर अंधुक अंधुक दिसायला लागलं होतं. उगवतीला गुलाबी रंग उठत होता. पाखरं घरट्यातून बाहेर पडत होती. साऱ्या गावातलं एकएक माणूस कामासाठी बाहेर पडत होतं.

भाकरीची चवड डोकीवर ठेवून सिद्राम शेताकडं जायला तयार झाला. ताजात-वाना होऊन बैलांच्या पाठीवर त्यानं थाप मारली आन् झापझाप पावलं उचलली.

दूरवर अंधुक उजेडातून गाडीच्या खडखडाटाचा नि बैलाच्या घुंगुराचा आवाज येत होता. गाडी कुणाची असावी, याचा अंदाज बांधत सिद्राम झपाझपा पावलं टाकत होता. बहुधा दत्तू पाटलाची असावी, असा विचार येतो तोच, दत्तूच्या गाण्याची लकेर शांत आवाजाला चिरत आली. त्याचा अंदाज खरा ठरला. दत्तू पाटलाची नांगरट एवढी लांबली कशी, ह्याच त्याला आश्चर्य वाटलं.

दत्तू पाटलाची आणि सिद्रामच्या बाबाची जानी जोस्ती होती. दोघांचीही शेती जवळ जवळ होती दत्तूची दोन एकराची एक पट्टी तेवढी जरा पड्यालच्या बाजूला होती. आवदा त्यानं विहीर खणायला घातली होती त्या शिवारात. बाकी दहा-अकरा एकराचं रान लागून लागूनच होतं. दत्तूला मदत करायला पोरगं नव्हतं. झाल्या त्या दोन्ही पोरीच. एकीचं लग्न करून दिलं. दुसरी आत्ताशी त्याच्या हाता-खाली आलेली ! सिद्रामचा बा त्याची चेष्टा करायचा. म्हणायचा, " दत्तूमा, पोराची तयारी कर म्हनावं वयनीला ! " दोनतीनदा त्यानं अशी चेष्टा केली आन् एक दिवस दत्तू खवळला. मिशा फेंदारून, तडकून त्याने उत्तर दिलं, " हे पग गणपा,

म्हाई पोरगा झाला तर शिद्याला माझी पोरगी घून, घरजावई करून घ्येतो नि तुला बोवलत बसायला लावतो !"

दत्तूनं फिरविलेल्या शब्दानं सिद्रामच्या बाबाला गप्प बसायची पाळी आली. एकुलतं एक पोरगं. घरजावई म्हणून दत्तूच्या शेतात राबायला लागलं तर ? नुसत्या कल्पनेने तो थरकून गेला. दत्तूनं एका वाक्यात त्याला गप्प बसविला. काय उत्तर द्यावं हे सुचलंच नाही त्याला. दत्तूबरोबर हात धरून आलेली अकरा–बारा वर्षाची परकरातली गौरा, त्यावेळी आपणाकड बघून खी खी करून हसली हे सिद्रामला आठवलं. एखाद्या हाणामारीत पराभव व्हावा तसा, आपला बाबा गप्प बसला हे बघून त्याला त्यावेळी बाबाची भलती चीड आली. हसणाऱ्या गौराकडं बघून दात ओठ खाल्ले नि शेवटी वेडवाण दाखवून गप्प बसायची पाळी आली. जुन्या आठवणीची त्याला गम्मत वाटली. स्मृती जाग्या होत होत्या. शेतातली पाउलवाट झरझर मागे पडत होती.

विचाराच्या तंद्रीत त्यानं शेत गाठलं. सूर्य हातभर वर आला होता. कडेला कुठंतरी तुटक्या ढगाचा तुकडा, काम मागायला आलेल्या मजुरागत तरंगत उभा होता. हुश्श करीत सिद्राम झाडाच्या बुध्याशी उभारला. भाकरीचं बोचकं खाली टाकलं. खांद्यावरच्या टॉवेलानं तोंडावरचा नि गळ्याभोवतालचा घाम पुसत स्वतःशीच पुटपुटला, "ची बायला, आतापासनंच धगधगायला लागलं काय !"

चुना–तंबाखू हातावर चोळून दाढेत गोळी ठेवली नी सिद्राम उठला. बैलांच्या पाठीवर थाप मारली. नांगर बांधला. देवाचे नाव घेऊन उजवा कोपरा धरला. कोयळा बाहेर काढल्यागत नांगर भुईत रुतून जमीन उसवत निघाला. निपचित पडलेल्या शिवाराला हळूहळू जाग यायला लागली. मातीचे ढेंडे निळया निळया आकाशाकडं कौतुकाने बघायला लागले.

उन्हाची तिरीप मस्तकं उठवायला लागली. अंगाभोवती घाम साचायला लागला. बैलं फेसाटायला लागली. भुई उसवता उसवता पाय अडखळायला लागले. सूर्याचा गोळा तापत तापत डोईवर आला. डोकीवर पडलेल्या उन्हानं पायाशी सावट धरलं. सिद्रामचा नांगर थकला. फुस् फुस् करणाऱ्या, फेसाळल्या तोंडांच्या बैलांच्या पाठीवर डाव्या उजव्या हाताने त्यानं थाप मारली.

नांगर तिथंच सोडून टाकला नि बैलांना सोडून दिलं. बैलं आपसुक ओढयाच्या वाटेला लागली. सिद्रामनं तंबाखूची गोळी अलगद दाढेत धरली. भाकरीचं बोचकं काखोटीला मारलं नि बैलांच्या पाठोपाठ पाऊल उचललं.

जवळजवळ अर्ध शिवार काळयाशार मातीच्या ढेकळांनी फुलून उठलं होतं. आंब्याच्या सावलीला पडलेल्या सिद्रामच्या डोळयावर झोपेचे आवरण होते, चेहरा समाधानानं भरून गेला होता.

वाऱ्याच्या सळसळीनं आंब्याची पानं गळून सिद्रामच्या अंगातोंडावर पडली

तसा तो दचकून जागा झाला. उन्हं गडप झाली होती. सकाळी क्षितीजाच्या काठा-वर दिसणाऱ्या ढगाच्या तुकड्यांनी अर्धंअधिक आकाश व्यापून टाकलं होतं. आळस देत उठून बसत तो स्वतःशीच पुटपुटला, " वळीव सुटतंय् वाटतं ! " भराभर जम-णाऱ्या ढगांकडे बघत त्यानं नांगर जोडला. आळसटलेल्या अंगाला हिसडा दिला नि नव्या जोमानं बैलांच्या पाठीवर थाप टाकली. भुईच्या पोटातली ढेकळं खळकन् बाहेर पडून ढगांकडं बघायला लागली.

एकदोन फेरे होतात न होतात तो वाऱ्याने चांगलाच फेर धरला. जमीनीवरचा पाचोळा नि कचरा गरगरा फिरत उंच उडायला लागला. काळ्या पांढऱ्या ढगांनी आकाश पुरतं व्यापून टाकलं. म्हशीच्या पाठीवर चाबूक ओढावा तशी वीज लखा-कून गेली. जोराचा गडगडाट झाला. टपकन् मोठाला थेंब त्याच्या उजव्या कानावर टपकला. त्याचे छोटे छोटे तुषार हातावर उडाले. विलक्षण उकाड्याने भगभग-णाऱ्या त्याच्या अंगावरून सुखाची लहर शहारून गेली. अजून जवळजवळ अर्धं शिवार निपचित होतं. नुसतच गडगडत वळीव पुढं सरकला तर मावळतीपर्यंत होईल तेवढं रान ओढून काढू ! तो विचार करीत होता. पुन्हा एक टपोरा थेंब टपकला. एक...दोन...चार...एकावर एक थेंब खडे मारल्यागत जोरानं येत होते. पाऊस उतरणार यात शंका नव्हती.

विजा जोराने चमकायला लागल्या. सिद्रामने चारी बाजूला नजर फिरविली. सगळी शिवारं उघडी बोडकी होती. दोन हाकेवर असलेल्या दत्तू पाटलाच्या जमिनीत बारकेसे खोपट दिसत होते. त्याच्या शोधक नजरेला तशा अवस्थेतही क्षणभर कुतुहल वाटून गेलं. ह्या दिवसात रानं बोडकी असताना, दत्तूमाने खोपट कशाला उभारलंय देव जाणे !

मोठ्या थेंबांचा वेग वाढला नि जोराची सर आली तसा सिद्राम झाडाखाली धावला. पावसानं चांगलाच जोर धरला. विजाही जोरजोरानं दात इचकायला लागल्या. पानावरून पाणी ओघळायला लागलं. झाडाखाली उभं राहायचं म्हणजे विजेची भीती वाटत होती. सिद्राम आशाळभूतपणे दत्तू पाटलाच्या खोपटावर नजर टाकून होत. पावसाचा वेग जरा कमी होईल नि आपण धावत आसऱ्याला जाऊ ही त्याची कल्पना होती.

पावसाचा रंग काही न्याराच होता. सिद्राम झाडाखाली निथळायला लागला. त्याने भोवताली एकवार नजर टाकली, खांद्यावरचा टॉवेल डोकीवर घेतला नि तशा पावसात दत्तूच्या खोपटाच्या दिशेने धूम ठोकली. नखशिखान्त भिजून गारठलेला सिद्राम धापा टाकत वेगानं खोपटात घुसला तो थेट गौरच्या अंगावर जाऊन आदळला. गौरा अंग आखडून एकटीच खोपटाच्या कोपऱ्याशी बसली होती. वाऱ्या-गत येऊन आदळलेल्या सिद्रामकडं बघून एकदम बावचळून उठली. अंगावर उडालेल्या शितोड्या पुसत ती अंग चोरून आणखीन कोपऱ्यात गेली. सिद्राम

पुरता ओशाळून गेला. तिच्या शिव्या ऐकण्याच्या तयारीत कान टवकारून, खालच्या मानेने तोंड फिरवून उभा राहिला. एकटी गौराच असेल ह्याची स्वप्नात सुद्धा कल्पना नव्हती त्याला.

क्षणभर शांतता होती. पाऊसच काय तो आवाज करीत होता.

" शिदावा भिजलासा न्हवं !"

चमकून त्यानं पाहिलं. गौराच बोलत होती. शिव्या ऐकायच्या तयारीत आखडून उभारलेला सिद्राम आणखीन ओशाळल्यागत झाला. तिच्या शब्दानं मनावरचे दडपण गेले नि त्याला हलकं हलकं वाटायला लागलं. पुन्हा असच जाऊन घडकावं असं क्षणभर वाटून गेलं. मान वर करून त्यानं तिच्यावर नजर वळविली. गौरा गौरीगत नटूनथटून उभी होती. अंजिरी रंगाचा नवा कोरा दंडिया गव्हाळ रंगाला उठावदार दिसत होता. ठेवणीतला साज अगावर चढविला होता. गौराचं उफाडणारं तारुण्य नि त्यातच नवरीगत नटल्यानं सिद्रामचं काळीज लख्खकन हाललं. अशा स्थितीत ती एकटी आपल्यापुढं उभी आहे ह्याची जाणीव होताच तो पुन्हा गोंधळल्यासारखा झाला. गौरा परकरात होती, खी खी करत हसत होती त्या वेळी; आपण तिला वेडवाण दाखवित होतो. आताचं गौराच हे रूप अनोखं होतं. इतक्या जवळून तो प्रथमच न्याहाळीत होता तिला.

डोकीवरचा चिप्प झालेला टॉवेल पिळून त्यानं हात-पाय पुसायला सुरुवात केली. गौरानं इकडे तिकडे पाहिलं; कोरड असं काहीच नव्हतं. ताटावर झाकलेला, बारीक जाळीचा विणलेला रुमाल काढला नि तिन सिद्रामकडं टाकला,

" ह्यानं कोरडं करा डोस्क !"

सिद्रामनं तो खालीवर न्याहाळला, " ह्या रुमालानं पुसू व्हय ?" सहज ताटाकडं नजर वळली. पूजेचे साहित्य बघून त्याला आश्चर्य वाटलं.

" पूजा कुणाची करायची इदुळा ?"

" हीरीला पाणी लागलय्. नव्या पाण्याची पूजा झाली. म्हेतूर काढून दिला होता !"

" म्हंजे हीरीच्या भानगडीतनं सुटला म्हणायचा दत्तुमा !"

तिनं मान डोलविली.

" मग दत्तूमा कुठाय ?"

" तिथच अडकल पावसात."

बाहेर पावसान पाणी पाणी करून सोडल होतं. आताशी कुठं धार जरा कमी आली होती. आभाळ फाटत चाललं होतं. ढग गळून नि पागून विस्कटले होते. सिद्रामने आपल्या शिवाराकड नजर टाकली. बैल पावसान निथळत झाडाजवळ स्वस्थ उभी होती. बराच वेळ तो बाहेर नजर लावून होता. मनात गौरा डोकावत होती.

"परसाद!" गौरानं सिद्रामकडं हात केला. सिद्राम आपल्याच धुंदीत होता.

"शिदाबा, परसाद घ्या!" पुन्हा गौरानं जोरानं आवाज दिला. सिद्रामनं वळून पाहिलं; खोबरं नी पेढे घेऊन गौरा हात पुढं करून उभी होती. त्यानं दोन्ही हात पुढं केले. प्रसाद देताना झालेल्या ओझरत्या स्पर्शानं सिद्रामच्या अंगातून वीज चमकून गेली. तिच्याकडं नजर टाकली. त्या वेळी गौराही त्याच्याकडं टक लावून होती. नजरानजर झाली. तोंडं बंद होती. पापण्या स्तब्ध होत्या. नजरांना जणु वाचा फुटली होती, आणि एकदम गौरा लाजली. भलतंच काहीतरी घडतंय ह्याची तिला जाणीव झाली. या अनोख्या क्षणाने तिचं अंगांग मोहरून गेलं. एक अनामिक सुखाची लहर सळसळून गेली.

सिद्राम धिटाईनं तिच्यावर नजर लावून होता.

बाहेर उन्हाची किरणं उतरत होती. तापलेल्या मातीवर पडलेल्या पाण्यानं उठलेला धुंद सुवास अजूनही घुमत होता. दत्तू पाटील घोंगडं अंगावर टाकून खोपटाकडं येत होता. चित्त हरवलेला सिद्राम अजूनही गौराकडं बघत होता.

आणि गौरा खोपटतल्या कोरड्या जमिनीला अंगठ्यानं खड्डा पाडत, त्यात सिद्रामचं चित्र नजरेपुढं आणायचा प्रयत्न करीत होती. एकदम तिला लहानपणची आठवण झाली. वेडवाण दाखविणारा सिद्राम डोळ्यापुढं आला. नकळत ती जोरानं हसली. सिद्रामलाही रहावलं नाही. तिच्या खदखदा हसण्याकडं बघून पहिल्या-सारखं दात विचकून वेडवाण दाखवित त्यानं म्हटलं, "गौरा, त्या लहानपणचा शिद्या राहिला नाय तुला घाबराय!"

"त्यो आता खराखुरा घरजावाई होणार हाय!" खोपटात येत, अर्थपूर्ण नजरेनं सिद्रामकडं बघत हसत हसत दत्तू पाटलानं सिद्रामचं वाक्य पूर्ण केलं.

सिद्रामच्या नजरेला नजर देऊन उभी असलेली गौरा लाजेनं लाल होत, पदरात तोंड दडवून बसली. ठार वर बघायलाच तयार न्हाई. गालाआड हसत आलेल्या दत्तू पाटलाच्या डोळ्यात मात्र लगोलग पाणी आलं. "सिदा, पोरा तुझा बा मात्र न्हायला नाही बघायला. निस्तो चेष्टा केली नि मरून गेला...!" भरलेल्या हाडाचं दत्तूमाचं मनगट सिद्रामच्या खांद्यावर टेकलं. उगीचंच थरथरत होतं ते. सिद्रामला दत्तूमाच्या हाताचा आधार वाटायच्या ऐवजी ओझंच जाणवून गेलं. वाटलं, कुणी-तरी डोकीवर ओझं रचतोय नि आपण भुईत रुतत चाललोय.



# पराजित – अपराजित



**वि. स. वाळिंबे**

**लेखांक सात**

युद्ध संपले, परंतु युद्धाच्या जखमा सहजासहजी भरून येण्यासारख्या मव्हत्या. जर्मनीकडून या जखमांचा हिशोब चुकता करून घेण्यासाठी, रक्तबंबाळ झालेला फ्रान्स अक्षरशः तडफडत होता.

१८ जानेवारी, १९१९ रोजी पॅरिसमधल्या 'के दोर्से' प्रासादामध्ये फ्रान्स, ब्रिटन आणि अमेरिका या विजेत्या राष्ट्रांची शांतता–परिषद सुरू झाली तेव्हा पुअँकरे यानी फ्रान्सची ही वेदना बोलून दाखविली. ते म्हणाले, " आपल्या सर्वांना शांतता हवी आहे हे खरं. पण तत्पूर्वी ज्यानं शांतता लाथाडून युद्धाचा आगडोंब निर्माण केला त्याला शासन करायला हवं. या युद्धामुळे जीवित–वित्ताची जी फार मोठ्या प्रमाणावर हानी झालेली आहे तिची भरपाई करण्याची जबाबदारी

योग्य वेळ येताच जर्मनी हे निर्बंध लायेसरशी उडवून देईल आणि पुन्हा फ्रान्सच्या रोखानं झेप घेईल. त्यावेळी इच्छा असूनही, फ्रान्सला संपूर्ण पराभवापासून वाचविणं ब्रिटन-अमेरिकेला जमणार नाही हे ध्यानात ठेवा.

---

युद्धाला प्रारंभ करणाऱ्या राष्ट्रानं स्वीकारलीच पाहिजे. दुसरी गोष्ट अशी की त्या युद्धखोर राष्ट्राकडून पुन्हा असला गुन्हा घडणार नाही- अशीही आपण चोख व्यवस्था करायला हवी."

पुअँकरे एवढ्या सतागाने का बोलत आहेत याचा, समोर बसलेल्या लॉईड जॉर्ज आणि वुड्रो विल्सन यांना बोध झाला नाही. चार वर्षांच्या रणसग्रामानतर हाती आलेली शातता चिरस्थायी कशी करायची याचाच विचार करण्यासाठी आपण येथे जमलेलो असताना 'हे पुन्हा घडता कामा नये, याचा अगोदर बंदोबस्त झाला पाहिजे' असे पुअँकरे अट्टाहासाने का सांगत आहेत याचा त्या दोघांना उलगडा न होणे एका अर्थी स्वाभाविकही होते. एक तर या युद्धामध्ये फ्रान्स जसा सर्वांगाने भाजून निघाला होता तेवढी धग इग्लड–अमेरिकेला जाणवली नव्हती. शिवाय युरोपच्या इतिहासाचे आडवे–उभे प्रवाह जाणून घ्यायची त्याना कधी गरजही पडली नव्हती.

परंतु इतिहासाचा प्रवाह फ्रान्सला विसरता येण्यासारखा नव्हता.

अगदी प्राचीन काळापासून विसाव्या शतकाला प्रारंभ होईपर्यंत, हातात तलवारी घेतलेल्या आक्रमकांच्या लाटा ऱ्हाईन ओलांडूनच फ्रान्सवर धडकल्या होत्या. एकदा नव्हे, दोनदा नव्हे–तीस वेळा! जुना कालखड डोळ्याआड केला तरी गेल्या शभर वर्षातील इतिहासाची पाने दुसरे काय सागत होती! या कालखडामध्ये पॅरिसने पाच वेळा प्रशियन तोफखान्याचा अग्निवर्षाव आपल्या डोळ्यानी पाहिला होता, अनुभवला होता. त्यापैकी तीन वेळा तर फ्रान्सचा हा परंपरागत शत्रू पॅरिसच्या रस्त्यांवर विजयोन्मादाने नाचला होता. १८७० मध्ये प्रशियाने आपली किती केविलवाणी अवस्था करून सोडली होती याची आठवण झाली की सुकुमार पॅरिसचे शरीर

अजूनही थरकत होते. एखाद्या चवताळलेल्या वाघाने गर्जना करीत आपल्या लक्ष्याच्या रोखाने झेप घ्यावी तसा आपला हा शेजारी केव्हा ना केव्हा तरी आपल्या दिशेने पुढे सरसावणार आहे या भीतीचे भूत गेली पन्नास वर्षे फ्रान्सच्या मानगुटीवर बसले होते. ही केवळ काल्पनिक भीती नव्हती तर वस्तुस्थिती होती हे चार वर्षांपूर्वीच फ्रान्सच्या प्रत्ययाला आले होते. गेली चार वर्षे हा शत्रू पॅरिसच्या वेशीवर उभा होता. फ्रान्सच्या सुदैवाने या रणसंग्रामामध्ये तो पराभूत झाला आणि पॅरिसचा नाद सोडून मागे फिरला. त्यामळे शांतता-परिषदेच्या कामकाजाला प्रारंभ होण्यापूर्वीपासून प्रत्येक फ्रेंच नागरिक ओरडून सांगत होता-"शांततेच्या रखवालदारांनो, जर्मनीला पुन्हा कधीही ही हिंमत होणार नाही याचा तुम्ही बंदोबस्त केला पाहिजे."

फ्रेंच नागरिकांची ही पोटतिडीक, पुअँकरे यांच्या भाषणाच्या रूपाने मुखर होत होती.

परंतु जर्मनीचा एवढा शक्तिपात करायला लॉईड जॉर्ज आणि वुड्रो विल्सन यांची तयारी नव्हती. त्यामुळे शांतता-परिषदेचे कामकाज रेंगाळू लागले. आपत्तीच्या वेळी एकत्र आलेले हे तीन देश राष्ट्रीय स्वार्थापायी वेगवेगळा विचार करू लागले. फ्रान्स जेवढा जर्मनीच्या जवळ होता तेवढे इंग्लंड नव्हते, मधल्या खाडीने इंग्लंडला सुरक्षित ठेवले होते आणि अमेरिका तर फारच दूर होती. परराष्ट्रीय धोरणाचे आराखडे बऱ्याच प्रमाणात भूगोलावरचे अक्षांश-रेखांश निश्चित करीत असतात. यावेळीही यापेक्षा वेगळे असे काहीही घडणार नव्हते.

आल्सेक आणि लॉरेन हे फ्रान्सचे प्रांत जर्मनीने १८७० च्या युद्धापासून आपल्या ताब्यात घेतले होते ते आता फ्रान्सला परत मिळायला हवेत याबद्दल दुमत नव्हते. तीच गोष्ट पोलंडची. जर्मनीने पोलंडचा जो प्रदेश बळकावला होता तो पोलंडला परत देऊन टाकला पाहिजे हेही लॉईड जॉर्ज आणि विल्सन यांनी मान्य केले. परंतु त्यामुळे जर्मनीच्या आजच्या स्वरूपामध्ये फारसा बदल होणार नव्हता. आल्सेक-लॉरेन आणि पोलिश प्रदेश गमावल्यानंतरही जर्मनी लोकसंख्या आणि औद्योगिक उत्पादन या दोन्ही बाबतीत फ्रान्सपेक्षा कितीतरी वरचढ ठरत होता.

युरोपच्या राजकारणामध्ये जर्मनीला ऑस्ट्रो-हंगेरियन साम्राज्य आतापर्यंत आधारभूत ठरले होते. हे साम्राज्य कोसळले तर ती जर्मनीच्या दृष्टीने फार मोठी आपत्ती ठरेल असे बिस्मार्कने म्हटले होते ते याच अर्थाने. या महायुद्धामध्ये ऑस्ट्रो-हंगेरियन साम्राज्याचा विनाश झाला होता हे खरे; पण त्यामुळे जर्मनीला व्यथित व्हायचे कारण नव्हते. कारण जर्मनीला ऑस्ट्रिया-हंगेरीची गरज होती ती मुख्यत: रशियाच्या संदर्भामध्ये. परंतु महायुद्ध आटोपण्यापूर्वीच रशियात बोल्शेव्हिक क्रांती होऊन तेथे अंतर्गत यादवी उफाळून आली होती. त्यामुळे रशिया आणखी काही वर्षे तरी युरोपच्या राजकारणामध्ये गडबड करणार नाही

हे जर्मन नेत्यांना ठाऊक होते. त्यामुळे ऑस्ट्रो–हंगेरियन साम्राज्याचा विनाश झाल्यावरही जर्मनीची पूर्व सीमा निर्वेध राहिली होती. या परिस्थितीत जर्मनीची पश्चिम सीमा निश्चित करून घेणे फ्रान्सच्या दृष्टीने अतिशय अगत्याचे झाले होते.

पुअँकरे यांच्याप्रमाणे क्लेमेन्सो आणि फॉश यानीही लाईड जॉर्ज आणि विल्सन यांना ही सारी परिस्थिती समजावून सागण्याचा खूप प्रयत्न केला. फॉश म्हणाला, "ऱ्हाईन नदी हीच जर्मनीची पश्चिम सीमा ठरली पाहिजे. ऱ्हाईनच्या डाव्या काठावर फ्रेंच सेना उभी राहील आणि या काठालगतच्या जर्मन प्रदेशाचं वेगळं राज्य निर्माण करून ते फ्रेंच लष्कराच्या नियंत्रणाखाली ठेवण्याची तरतूद करायला हवी."

फॉशच्या या तीन मागण्यांपैकी एकही मागणी मान्य करायची लॉईड जॉर्ज आणि विल्सन यांची तयारी नव्हती. विल्सन तर फॉशला म्हणाले, "म्हणजे याचा अर्थ असा की १८७० मध्ये जर्मनीनं जे आल्सेक–लॉरेनच केलं तेच तुम्ही आता ऱ्हाईनलँडचं करू इच्छिता."

जर्मनीच्या पश्चिम सीमेसंबंधी शांतता–परिषदेत एकमत होण्याचे चिन्ह दिसेना.

शेवटी लॉईड जॉर्ज यांनी तडजोड सुचविली. ते म्हणाले, "जर फ्रान्सने ऱ्हाईन-बाबतचा आपला हट्ट सोडला तर जर्मनीकडून फ्रान्सवर पुन्हा आक्रमण होणार नाही याची हमी द्यायला ब्रिटन–अमेरिकेची तयारी आहे."

विल्सन यानी लॉईड जॉर्ज याना दुजोरा दिल्यामुळे पुअँकरे याना आपला आग्रह पुढे रेटता येईना. यानतर जर्मनीबरोबर करावयाच्या तहाची कलमे निश्चित करण्याच्या दृष्टीने वाटाघाटी सुरू झाल्या. यावेळी इटलीलाही या बैठकीमध्ये सहभागी करून घेण्यात आले होते. क्लेमेन्सो, लॉईड जॉर्ज, विल्सन आणि इटलीचे प्रधानमंत्री ओर्लन्दो असे चौघेजण युद्धोत्तर युरोपचा नकाशा आखायला बसले. तरीदेखील फॉश नमते घ्यायला तयार नव्हता. या 'बड्या चौघां'च्या बैठकीपुढे आपले म्हणणे मांडण्याची आपल्याला संधी मिळाली पाहिजे अशी त्याने मागणी केली. त्याची ही मागणी मान्य करता कामा नये असे लॉईड जॉर्ज आणि विल्सन याचे मत होते. परंतु क्लेमेन्सोच्या आग्रहापुढे त्यांचे काही चालले नाही.

या 'बड्या चौघां'ना उद्देशून फॉश म्हणाला, "जर्मनीनं किती सैन्य ठेवावं, ते कुठं ठेवावं आणि कुठं ठेवू नये याचा बारिकसारिक तपशील निश्चित करण्यात तुम्ही सारेजण गढलेले आहात हे मला माहित आहे. परंतु, ऱ्हाईन हीच जर्मनीची सीमा राहील असं जर तुम्ही ठरवलं नाही तर जर्मनीवर इतर निर्बंध लादणाऱ्या तुमच्या या कागदी करारांना काहीही किंमत उरणार नाही. योग्य वेळ येताच जर्मनी हे निर्बंध लाथेसरशी उडवून देईल आणि पुन्हा फ्रान्सच्या रोखानं झेप घेईल. त्यावेळी इच्छा असूनही, फ्रान्सला संपूर्ण पराभवापासून वाचविणं ब्रिटन–अमेरिकेला जमणार नाही हे ध्यानात ठेवा."

वीस वर्षानंतर काय घडणार आहे हेच जणू फॉश यावेळी सांगत होता. परंतु त्यावेळी फॉशच्या या इशाऱ्याकडे लक्ष द्यायची कोणाला गरज वाटली नाही.

उलट क्लेमेन्सोच फॉशची समजूत घालू लागला. क्लेमेन्सो म्हणाला, " ऱ्हाईन-बाबतची आपली मागणी ब्रिटन-अमेरिका मान्य करणार नाहीत हे आता आपण ध्यानात घ्यायला हवं. म्हणून, फ्रान्सच्या सीमेचा जर्मनीकडून भंग होणार नाही याची जबाबदारी घ्यायला आम्ही तयार आहोत असे आपण लॉइड जॉर्ज आणि विल्सन यांच्याकडून वचन घेऊ.'

लॉईड जॉर्ज आणि विल्सन यांनी तशी त्यावेळी हमी दिली; परंतु ब्रिटन-अमेरिकेकडून हे वचन पाळले गेले नाही. फ्रान्सला हमी देण्याबाबतचा करार जेव्हा ब्रिटिश संसदेपुढे मंजुरीसाठी आला तेव्हा ब्रिटिश लोकप्रतिनिधींनी तो मंजूर केला, पण एका अटीवर. अमेरिकेने या कराराला मंजुरी दिली तरच आमची संमती राहील अशी ही अट होती. म्हणजे ब्रिटनने आपली जबाबदारी अमेरिकेवर ढकलली. अमेरिकन सिनेटने तो करार फेटाळून लावल्यामुळे ब्रिटनच्या दृष्टीनेही तो आपो-आपच रद्द ठरला.

हा उघडउघड विश्वासघात होता.

फ्रान्सने त्याबद्दल ब्रिटन-अमेरिकेवर झोड उठविली. ब्रिटन-अमेरिकेवर भरवसा ठेवल्याबद्दल क्लेमेन्सोलाही लोकांची दूषणे स्वीकारावी लागली. क्लेमेन्सोला खरो-खरच पहिल्यापासून ब्रिटन-अमेरिकेबद्दल आपलेपणा वाटत होता. राजकारणात पदार्पण करण्यापूर्वी त्याने अमेरिकेत काही काळ वार्ताहर म्हणून काम केलें होते.

लहान मुलांसाठीं उत्कृष्ट औषध।
डोंगरे बालामृत
के. टी. डोंगरे अँण्ड कं. प्रा. लि. मुंबई-४.

त्यामुळे त्याला इंग्रजी भाषा चांगली येत होती. शिवाय त्याची पत्नीही अमेरिकन होती. क्लेमेन्सोचा हा पूर्वेतिहास फ्रेंच लोकांना माहित असल्यामुळे युद्धाला प्रारंभ व्हायच्या अगोदरही टीकाकार त्याची 'अँग्लो–अमेरिकनांचा हस्तक' अशी संभावना करीत असत. शांतता–कराराची कलमे ठरविली जात असतानाही 'या अँग्लो अमेरिकनांच्या पक्षपात्यापासून सावध रहा' असा इशारा कट्टर राष्ट्रवादी गटातर्फे दिला जात होता. परंतु या टीकेची पर्वा न करता, विल्सन आणि लॉईड जॉर्ज जे काही सुचवतील त्याला क्लेमेन्सो मुकाटयाने मान्यता देत गेला. मात्र असे करण्यामागे, अँग्लो–अमेरिकनावरील प्रच्छन्न विश्वास एवढे एकच कारण नव्हते हेही ध्यानात घेतले पाहिजे.

एकटा फ्रान्स-जर्मनीशी मुकाबला करू शकत नाही, ब्रिटन–अमेरिकेने मदत केली म्हणूनच तो विजयाचा मानकरी ठरला या वस्तुस्थितीचे क्लेमेन्सोला भान होते. इतकेच नव्हे तर यापुढेही जेव्हा जर्मनीबरोबर लढण्याची पाळी येईल तेव्हा फ्रान्सला अँग्लो–अमेरिकनांची मदत घ्यावी लागणार आहे हेही तो जाणून होता. त्यापायीच त्याने 'ऱ्हाईनवर जर्मनीला थोपविले पाहिजे' हा आग्रह ताणून धरला नाही. लॉईड जॉर्ज आणि वुड्रो विल्सन याची हमी त्याला पुरेशी वाटली. परंतु हमीचा करार अमेरिकन सिनेटने फेटाळून लावल्यानतर क्लेमेन्सोचा भ्रमनिरास झाला. ऱ्हाईनबाबत आग्रह आणि अनाक्रमणाची हमी या दोन्ही गोष्टी त्याने गमावल्या होत्या.

अँग्लो–अमेरिकनांच्या या कचखाऊ धोरणापायी फ्रान्सला कालांतराने जबर किंमत मोजावी लागली.

आपण जर फ्रान्सवर हल्ला चढविण्याचे ठरविले तर तावडतोब ब्रिटन आणि अमेरिका आपले लष्करी सामर्थ्य फ्रेंच भूमीवर आणून उभे करतील अशी जर जर्मन सेनानींना खात्री वाटली असती तर ज्या बेगुमान रीतीने त्यानी १९४० मध्ये फ्रान्सवर धडक मारली तसे धाडस त्यांना करवले नसते. फ्रान्सच्या पश्चिम सीमेचे रक्षण करण्याबाबत विल्सन यानी वाटाघाटीच्या वेळी दिलेली हमी अमेरिकन सिनेटने फेटाळून लावली असल्यामुळे दुसऱ्या महायुद्धाच्या प्रारंभीच्या काळात पश्चिम युरोपचा जो बोजवारा उडाला त्याची काही प्रमाणात अमेरिकेवरही जबाबदारी येते.

आपल्या या नाकर्त्या धोरणामुळे अल्पावधीतच भयानक परिणाम होणार आहेत हे विल्सन यांच्यानंतरच्या अमेरिकन नेतृत्वाला उमगलेच नाही.

बरे, टाळू म्हटले तरी अमेरिकेला शेवटी आपली जबाबदारी टाळताही आली नाही. दुसऱ्या महायुद्धाचा भडका उडताच जर्मनीने अल्पावधीत सारा पश्चिम युरोप जिंकून घेतल्यानंतर तो मुक्त करण्यासाठी मुख्यतः अमेरिकेलाच आपले

सैनिकी आणि आर्थिक सामर्थ्य फार मोठ्या प्रमाणावर खर्ची घालावे लागले. त्याऐवजी अमेरिकन सिनेटने आपल्या अध्यक्षाच्या शब्दाचा वेळीच मान राखला असता तर कदाचित पुढचा हा सारा खटाटोप वाचलाही असता.

परराष्ट्रीय धोरणाच्याबाबतीत अमेरिकेचे बऱ्याच वेळा असेच घडले आहे. ज्यावेळी एखादी कृती करणे आवश्यक असते तेव्हा अमेरिका तटस्थ राहते आणि मग परिस्थिती चिघळली की तिला स्वस्थ बसून चालण्यासारखे नसते. अशा वेळी साहजिकच तिला अधिक सामर्थ्य खर्ची घालावे लागते आणि त्यामानाने अमेरिकेच्या पदरात फारसे यश पडत नाही. पहिल्या महायुद्धानंतर अमेरिकेला अलिप्ततावादाने ग्रासल्यामुळे जे काही घडले ते पाहिले की या विधानाची सत्यता पटते.

शांतता–परिषदेच्या वेळी, जर्मनीची पश्चिम सीमा हा जसा फ्रान्सच्या आग्रहाचा एक भाग होता तसाच जर्मनीकडून वसूल करावयाच्या नुकसान–भरपाईबाबतही फ्रान्स आग्रही होता. याबाबतीतही फ्रान्सची आपल्या मित्र–राष्ट्रांकडून फसवणूक झाली. ठरल्याप्रमाणे फ्रान्सला नुकसान भरपाई दिली गेलीच पाहिजे असे अँग्लो–अमेरिकनानी जर्मनीवर कधी दडपण आणलेच नाही.

पहिले महायुद्ध मुख्यत: लढले गेले ते उत्तर फ्रान्समध्ये आणि फ्रान्सचे उद्योगधंदे याच भागात एकवटलेले होते. चार वर्षांच्या धुमश्चक्रीमुळे या उद्योगधद्यांचा पूर्णपणे विनाश झालेला होता. या उद्योगधद्यांच्या उभारणीसाठी जर्मनीने फ्रान्सला जी भरपाई कबूल केली होती त्यापैकी वीस टक्केदेखील रक्कम फ्रान्सच्या तिजोरीमध्ये जमा होऊ शकली नाही. अर्थात यावाबतचा काही दोष फ्रान्सकडेही येतो.

शांतता कराराचा तपशील ठरविताना फ्रान्सला एवढी हाव सुटली होती की जर्मनीकडून किती भरपाई मागणे उचित ठरेल, किती भरपाई करणे जर्मनीला शक्य होईल याचा विचार करायला फ्रेंच नेत्यांची तयारी नव्हती. जर्मनीला स्वत:चा विकास करता येण्याजोगी सवड ठेवल्याशिवाय तो एवढी प्रचंड नुकसान–भरपाई देऊ शकणार नाही ही साधी गोष्टही फ्रान्सने त्यावेळी ध्यानात घेतली नाही. नुकसान–भरपाई देण्याइतका जर्मनी समृद्ध झाला तर लागलीच तो १९१८ मधल्या पराभवाचा सूड घ्यायला उद्युक्त होईल या भीतीपायीच जर्मनीकडून जास्तीत जास्त खंडणी वसूल करण्याचा फ्रान्सने तगादा लावला होता.

हा दुहेरी पेच होता.

जर्मनी आर्थिक दृष्ट्या निरंतर दुबळा रहावा आणि तरीही त्याने आपण मागू तेवढी खंडणी दिली पाहिजे अशी या प्रश्नासबंधी फ्रान्सची अव्यवहार्य अपेक्षा होती. त्याचा परिणाम असा झाला की या दोन्हीपैकी एकदेखील उद्दिष्ट साध्य झाले नाही.

नुकसान-भरपाईसंबंधीची फ्रान्सची भूक, वाटाघाटी रेंगाळू लागल्या तशी वाढू लागली. एरवी सुरुवातीला फ्रान्सची अपेक्षा वाजवी होती. या युद्धामध्ये बेल्जमचे

आणि उत्तर फ्रान्सचे जे नुकसान झाले आहे ते जर्मनीने भरून द्यावे असे युद्धविराम झाला तेव्हा फ्रान्सने म्हटले होते. ही मागणी रास्त आहे अशी जर्मनीनेही कबुली दिली होती. परंतु पुढे पॅरिसला शांतता-करारासबधीच्या 'बड्या चौघां'मधील वाटाघाटी सुरू झाल्या तेव्हा फ्रान्सने आणि त्याच्याबरोबर ब्रिटननेही नुकसान-भरपाईचा आकडा फुगवायचे तंत्र अवलवले. युद्धाचा सारा खर्च जर्मनीने भरून द्यायला पाहिजे असा फ्रान्स आणि ब्रिटन यानी ठेका धरला. वुड्रो विल्सन यानी ही मागणी भरमसाट आहे असे मत व्यक्त केल्यानंतर तडजोड म्हणून असे ठरले की ब्रिटन आणि फ्रान्स याचे युद्धामुळे जे नुकसान झाले आहे तेवढे जर्मनीने भरून दिले पाहिजे.

युद्धात आपले नेमके किती नुकसान झाले हे सांगायला कोणीच तयार होईना. कित्येक महिने त्यासबंधी घोळ चालू होता. शेवटी, त्यासाठी वेगळी समिती नेमण्याचे ठरले. ब्रिटन आणि फ्रान्स यांचे या युद्धामुळे किती नुकसान झालेले आहे आणि या नुकसानीची भरपाई जर्मनीने कोणत्या पद्धतीने करावी हे या समितीने ठरवावयाचे होते. १९२१ च्या मेमध्ये या समितीचा अहवाल तयार झाला. त्यानुसार जर्मनीने एकूण तेहेतीसशे कोटी डॉलर्स नुकसानभरपाई द्यावी असे ठरले. यापैकी वावन्न टक्के रक्कम एकट्या फ्रान्सला मिळणार होती आणि त्यासाठी वार्षिक पन्नास कोटी डॉलर्सचा हप्ता मुक्रर करण्यात आला. याशिवाय निर्यात-व्यापारातून जर्मनीला जे उत्पन्न मिळेल त्यापैकी सव्वीस टक्के रक्कम जर्मनीने फ्रान्सला सोन्याच्या वा निर्यात-वस्तूच्या स्वरूपात द्यावी असेही समितीने सुचविले.

जर्मनीची त्यावेळची आर्थिक परिस्थिती अशी होती की त्याला एवढा बोजा सहन करणे सर्वस्वी अशक्य होते. शिवाय शक्य तेवढी नुकसानभरपाई चुकवायची असा जर्मन नेत्यांचा प्रारभापासूनच प्रयत्न होता. त्यासाठी वाटेल तेवढ्या सबबी त्याच्या हाताशी होत्या. शिवाय या काळात जर्मनीविषयक धोरणाबाबत फ्रान्स आणि ब्रिटन याचे मतभेद उग्र रूप धारण करू लागले होते. त्याचाही जर्मनीने फायदा घेतला.

विजेत्या राष्ट्रांपैकी कोणीही जर्मनीला मालपुरवठा करता कामा नये असा फ्रान्सने ब्रिटनकडे तगादा लावला होता. ब्रिटनला तसे करणे परवडण्यासारखे नव्हते. आपली खालावलेली आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी जर्मन बाजारपेठेत आपला माल विकणे ब्रिटनच्या फायद्याचे होते. चाणाक्ष अमेरिकन उद्योगपतींचाही जर्मन बाजारपेठेवर डोळा होता. ही बाजारपेठ वाढावी यासाठी त्यांनी जर्मनीला कर्ज द्यायला प्रारंभ केला. आपल्या स्वतःच्या गरजेपायी महायुद्धाच्या तडाख्यानी खचलेल्या फ्रान्सच्या मागणीकडे लक्ष द्यायला अँग्लो-अमेरिकनांना आता फुरसत नव्हती.

जर्मनीकडून पुरेशी नुकसानभरपाई येत नसल्यामुळे फ्रान्सची बरीच पंचाईत

झाली. आपल्या उद्योगधंद्यांच्या उभारणीसाठी त्याला स्वतःच्या तिजोरीतून पैसा खर्च करावा लागत होता. युद्धातील खर्चापेक्षा हा खर्च कितीतरी अधिक होता.

जर्मनी नुकसान-भरपाई देण्याबाबत टाळाटाळ करू लागल्यानंतर त्याच्यावर याबाबतीत दडपण आणणे एकट्या फ्रान्सला शक्य नव्हते. कोणाच्या छुप्या पाठिंब्यामुळे जर्मनी हे उद्दाम वर्तन करीत आहे हे सगळ्यांनाच ठाऊक होते. तरीही आपला आव रहावा म्हणून फ्रान्सने नुकसानभरपाईचा हप्ता धाडण्याची मुदत दोन वर्षांनी वाढवून दिली. तरीही जर्मनीचे धोरण बदलेना. म्हणून फ्रान्सने एकदा त्याबाबत ब्रिटन-अमेरिकेकडे तक्रार केली तेव्हा अँग्लो-अमेरिकन नेत्यानी फ्रान्सलाच दम भरला–'तुम्हाला जर्मनीचं दिवाळं काढायचं आहे काय ?'

पुअँकरे यानी निराळाच उपाय योजण्याचे ठरविले.

जर्मनीने नुकसान-भरपाई देण्याच्या बाबतीत टाळाटाळ केली तर फ्रान्सने आवश्यक ती उपाययोजना करावी असे शांतता-करारामध्ये एक कलम होते. या कलमाचा आधार घेऊन जर्मनीला जरब बसवायची असे पुअँकरे यांच्या मनाने घेतले. फ्रान्सलगतचा ऱ्हुर प्रांत जर्मनीच्या औद्योगिक जीवनाचा एकमात्र आधार होता. लोखंड आणि कोळसा यांच्या खाणीचे ऱ्हुरमध्ये आगर होते. शांतता-करारानुसार ऱ्हाईनलँडमध्ये लष्कर ठेवायला जर्मनीला बंदी करण्यात आली होती. त्यामुळे ऱ्हुरमध्ये जर्मनीचा लष्करी बंदोबस्त काहीही नव्हता.

११ जानेवारी १९२३ रोजी फ्रेंच फौजा ऱ्हुरमध्ये शिरल्या.

आश्चर्याची गोष्ट अशी की या लष्करी कारवाईबाबत ब्रिटन-अमेरिकेने फ्रान्सवरच टीका केली. हे उघडउघड आक्रमण आहे असे ब्रिटिश परराष्ट्रखाते म्हणू लागले, परंतु पुअँकरे यानी आपल्या मित्रांच्या टीकेची पर्वा न करता ऱ्हुरचा कबजा घेतला. यावेळी लष्करी सामर्थ्य वापरण्याची शक्यता नसल्यामुळे जर्मनीने निःशस्त्र प्रतिकाराचा मार्ग अवलंबला.

जर्मन नेत्यांनी ऱ्हुरमधल्या खाण-कामगारांना संपावर जायला सांगितले. खाणी आणि कारखाने बंद ठेवण्याबाबत मालकाना आवाहन केले. रेल्वे-वाहतूक बंद ठेवली. ऱ्हुरमधले सारे उत्पादन थंडावले. तरीही पुअँकरे भांबावून गेले नाहीत. त्यांनी फ्रेंच कामगार पाठवून, खाणीमधून कोळसा उपसायला प्रारंभ केला, पोलादाचे कारखाने सुरू केले. या कार्यात जर्मनीकडून व्यत्यय येऊ नये म्हणून ऱ्हुरच्या सीमेवर त्यांनी आपल्या पलटणी उभ्या केल्या.

ही मात्रा अचूक लागू पडली.

ऱ्हुरमधला कोळसा आणि लोखंड येईनासे झाल्यामुळे जर्मनीचा प्राण कासाविस होऊ लागला. नमते घेण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता. म्हणून 'नुकसान-भरपाईसंबधी आम्ही वाटाघाटी करायला तयार आहोत' असा जर्मन नेत्यानी पुअँकरे यांच्याकडे निरोप धाडला.


जर्मनी नमला आहे या घटनेचा आपण पुरेपूर फायदा घेतला पाहिजे असे मार्शल फॉश याचे मत होते. तो उद्गारला, 'युद्धसमाप्तीनंतरचा अतीव आनंदाचा हा पहिलाच क्षण आहे. शातता-करार करताना आपण फसवले गेलो. आता तरी तसं घडता कामा नये.'

न्हुरमधल्या कोळसा-खाणीमध्ये आणि पोलाद-कारखान्यांमध्ये फ्रेंच उद्योगपतीची भागीदारी स्वीकारायला जर्मनीला भाग पडले तर पुन्हा आपल्याला उपद्रव द्यायची जर्मनीला हिंमत होणार नाही अशी फॉशची कल्पना होती. ती त्याने पुअँकरे यांना सांगितली. परंतु पुअँकरे इतके पुढे जायला तयार नव्हते. नुकसान-भरपाईची टाळाटाळ करणाऱ्या जर्मनीला अद्दल घडविण्याच्या हेतूनेच आपण हे पाऊल उचलले असल्यामुळे जर्मनीकडून तेवढे आश्वासन मिळाल्यावर उगाच ताणण्यात अर्थ नाही असे त्यांचे मत पडले. शिवाय ब्रिटनला फार दुखवणे आपल्याला परवडणार नाही हेही ते जाणून होते.

पुअँकरे यांची ही मर्यादित लष्करी कृतीदेखील यशस्वी ठरली असती. परंतु त्यासाठी जर्मन राजकारणासंबंधी जागरूक असणारे नेते ब्रिटनमध्ये हवे होते. रॅम्से मॅकडोनाल्ड, स्टॅन्ले बाल्डविन, नेव्हिल चेंबरलेन आदी तत्कालिन ब्रिटिश प्रधानमंत्र्यांमध्ये, युरोपीय भूमीवर वारे कोणत्या दिशेने वाहू लागले आहेत याचा मागोवा घ्यायची मुळीच कुवत नव्हती.

ब्रिटनची पर्वा न करता आपण आपले स्वतंत्र धोरण आखावे असे म्हणणारा एक वर्ग त्यावेळी फ्रान्समध्ये होता. दुसऱ्यावर अवलंबून राहणाऱ्याला, आपल्या मनाप्रमाणे आपले भवितव्य घडविता येत नाही हा इतिहासाचा धडा फ्रान्सने आता तरी ध्यानात घ्यावा अशी या गटाची भूमिका होती. परंतु जर्मनीशी एकट्याने दोन हात करण्याची आपल्या अगात हिंमत नसल्यामुळे ब्रिटनशी मिळतेजुळते घेऊनच आपण वागले पाहिजे असे बहुसंख्य फ्रेंच नागरिकांना वाटत होते. जर्मनीने नुकसान-भरपाईसंबंधी बोलणी करायला मान्यता दिल्यानंतर पुअँकरे यांनी न्हुरमधून आपले सैन्य मागे घ्यायचे ठरविले ते याच सावध धोरणापायी.

नुकसान-भरपाईबाबतचे यावेळचे आश्वासनही जर्मनीने पाळले नाही. तरीही अमेरिकेची जर्मनीबद्दलची सहानुभूती कमी झाली नाही. उलट वाढली. १९२४ मध्ये अमेरिकेच्या पुढाकाराने 'डावेस योजना' पुढे आली. नुकसानभरपाईच्या वार्षिक हप्त्याची रक्कम आणखी कमी करणे हेच या योजनेचे उद्दिष्ट होते. अमेरिकेने आपल्यासंबंधी उदार धोरण स्वीकारले आहे व म्हणूनच नुकसान-भरपाईच्या जोखडातून आपली मान सैल होत आहे या जाणीवेमुळे पुढल्या पाच वर्षांत जर्मनीने फ्रान्सकडे फक्त शंभर कोटी डॉलर्सचा भरणा केला. १९२९ मधल्या 'यंग योजने'ने भरपाईच्या हप्त्याबाबत जर्मनीला आणखी सवलत मिळाली. त्यामुळे जर्मनीने आणखी दोन वर्षे हप्ते कसेबसे भरले.


प्रमाणे आपणही
आपला पैसा
स्वर्च करा
हयातभर
निश्चिंत व्हा!
एसीसी
आपल्या
पुढीलपैकी
स्वरूपाची
करू शकाल
सहा गव्हाणीसह गुरांसाठी
५ मीटर × ३ मीटर
सभोवताली ५ मीटरचा चौरस
ओटा असलेला ३ मीटर × १
पाण्याचा हौद
खतासाठी ३ मीटर × २.५
चार खड्डे
आणि गटारासह
मीटरचा गोठा
प्रीकास्ट
सिमेंटची बांधकामे अधिक टिकाऊ,
आरोग्यप्रद असतात, ती सहज स्वच्छ
येतात. आपली बांधकामे एसीसी सिमेंटने
करा. गेल्या ५० हून अधिक वर्षांपासून एसी
सर्वोत्कृष्ट दर्जाचे सिमेंट तयार करीत आली
तुम्हाला लागणारे सिमेंट तुमच्या नजीकच्या
स्टॉकिस्टकडून किंवा दि सिमेंट मार्केटिंग
ऑफ इंडिया लिमिटेड, १२१, महर्षि
रोड, मुंबई-२०, यांच्याकडून खरेदी
दि कॉंक्रीट असोसिएशन ऑफ इंडिया,
महर्षि कर्वे रोड, मुंबई-२० यांच्याकडून
तांत्रिक विनामूल्य
दि असोसिएटेड सिमेंट कंपनीज
दि सिमेंट मार्केटिंग कंपनी ऑफ इंडिया
ACC

१९३१ साल उजाडले तेव्हा सारे जग मंदीच्या चक्रात सापडले होते हे अरिष्ट दूर होईपर्यंत जर्मनीने हप्ते भरू नयेत असे त्यावेळचे अमेरिकेचे अध्यक्ष हूवर यानी सुचविले आणि तेव्हापासून नुकसान-भरपाईचा प्रश्न इतिहासजमा झाला. या प्रश्नाचा विचार करण्यासाठी १९३२ च्या जुलैमध्ये लुसान येथे ब्रिटन, फ्रान्स आणि जर्मनी या तीन राष्ट्रांच्या प्रतिनिधींची बैठक भरली होती. परंतु या बैठकीतून काहीही निष्पन्न झाले नाही.

१९२१ ते १९३१ या दहा वर्षांच्या कालखंडामध्ये जर्मनीने मूळच्या तेहेतीसशे कोटी डॉलर्सच्या नुकसानभरपाईपैकी फक्त पाचशेपन्नास कोटी डॉलर्सचा भरणा केला. त्यातून लक्षात ठेवण्याजोगी गोष्ट ही की जर्मनीने ही रक्कम देखील आपल्या स्वताच्या तिजोरीतून भरली नव्हती. अमेरिकन उद्योगपतीकडून घेतलेल्या कर्जातूनच ही रक्कम देण्यात आली आणि पुढे जर्मनीने या कर्जाचीही फेड केली नाही. म्हणजे प्रत्यक्षात असे घडले की जर्मनीने द्यावयाच्या भरपाईची जबाबदारी अमेरिकन उद्योगपतीनीच पार पाडली. इतकेच नव्हे तर या साऱ्या प्रकरणात जर्मनीचाच फायदा झाला. कारण अमेरिकन उद्योगपतीकडून घेतलेल्या कर्जाची रक्कम, भरपाईदाखल परत केलेल्या साडेपाचशे कोटी डॉलर्सपेक्षा अधिक होती.

या काळातील अमेरिकेचे धोरण कमालीचे चमत्कारिक होते.

ब्रिटन आणि फ्रान्स याना द्यावयाच्या भरपाईबाबत जर्मनीला अधिकाधिक सवलती मिळाल्या पाहिजेत यासाठी अमेरिका सतत धडपडत होती. शिवाय स्वतः जर्मनीकडून एक सेंटदेखील नुकसान भरपाई घ्यायची नाही अशीही तिची प्रतिज्ञा होती. परंतु ब्रिटन आणि फ्रान्स या आपल्या मित्रांबाबत हे औदार्य दाखवायची तिची मुळीच तयारी नव्हती. उलट, एखाद्या जागरूक सावकाराप्रमाणे तिने युद्धकाळात घेत-लेल्या कर्जाची सव्याज आणि संपूर्ण फेड करण्याबाबत ब्रिटन-फ्रान्सकडे तगादा लावला.

जर्मनीचा पराभव करायचा या समान उद्दिष्टापायी आपण सर्वजण या युद्धा-मध्ये उतरलेले असल्यामुळे, या युद्धासाठी अमेरिकेने जे अर्थसहाय्य केले त्याच्या परतफेडीची तिने मागणी करण्याचे वस्तुतः कारण नाही असे शांतता-परिषदेच्या वेळी ब्रिटन आणि फ्रान्स यानी सुचविले होते. परंतु 'आमचे कर्ज आम्हाला परत मिळालेच पाहिजे' असे सांगून वुड्रो विल्सन यानी ती सूचना फेटाळून लावली.

युद्धकाळात ब्रिटनने अमेरिकेकडून चारशे कोटी डॉलर्सचे कर्ज घेतले होते आणि त्यात स्वतःच्या चारशे कोटी डॉलर्सची भर घालून ते फ्रान्सला दिले होते. स्वतः फ्रान्सने अमेरिकेकडून साडेतीनशे कोटी डॉलर्सचे कर्ज घेतले होते तर याउलट फ्रान्सने युरोपमधील आपल्या लहानमोठ्या मित्रराष्ट्रांना पाचशे कोटी डॉलर्सचे कर्ज दिले होते. यापैकी निम्मी रक्कम तर एकट्या रशियाला दिली होती. मध्यंतरी रशियामध्ये क्रांती होऊन तेथे बोल्शेव्हिक राजवट प्रस्थापित झाल्यानंतर या राजवटीने 'आपण फ्रान्सला एक रूबलदेखील परत करणार नाही' असे जाहीर केले होते.

म्हणजे ब्रिटन आणि फ्रान्स यांनी दिलेली कर्जे वसूल होण्याची सुतराम शक्यता नव्हती.

या युद्धाचा मुख्य भार फ्रान्स आणि ब्रिटन यांच्यावरच पडला होता आणि तरीही ब्रिटन-फ्रान्सला युद्ध-कर्जाबाबत सवलत द्यायला अमेरिकेची तयारी नव्हती. या प्रश्नाबाबत अमेरिकेची समजूत घालायचा ब्रिटन आणि फ्रान्स यांनी खूप प्रयत्न केला, परंतु त्यात यश येत नाही असे आढळून आल्यानंतर १९२९ मध्ये या दोन्ही राष्ट्रांनी कर्ज-फेडीला मान्यता दिली. तरीही अमेरिका व्याजाबाबत हटून बसली. शेवटी असे ठरले की येत्या बासष्ट वर्षांमध्ये ब्रिटनने मुद्दलाचे चारशे कोटी डॉलर्स आणि व्याजाचे सातशे कोटी डॉलर्स असे एकूण अकराशे डॉलर्स व फ्रान्सने मुद्दलाचे साडेतीनशे कोटी डॉलर्स आणि व्याजाचे सव्वा तीनेशे कोटी डॉलर्स असे एकूण पावणेसातशे कोटी डॉलर्स अमेरिकेला परत करावेत. हा करार पाहिला तेव्हा ब्रिटन-फ्रान्समधील वृत्तपत्रे म्हणू लागली–'अमेरिका म्हणजे शायलॉकचा नवा अवतार आहे.'

पण अमेरिकेला या टीकेची फिकीर नव्हती.

जर्मनीकडून मिळणारा नुकसान-भरपाईचा हप्ता हाच ब्रिटन आणि फ्रान्स यांच्या कर्जफेडीचा मुख्य आधार होता. त्यामुळे १९३२ मधल्या लुसान परिषदेमध्ये जर्मनीला नुकसान-भरपाई माफ करण्यात आल्यानंतर अमेरिकेकडे कर्जफेडीचा हप्ता धाडणे ब्रिटन आणि फ्रान्स यांना अशक्य झाले. तरीदेखील १९३३ मध्ये ब्रिटनने एक हप्ता धाडून दिला. १९३२ च्या डिसेंबरमध्ये फ्रान्सलाही अमेरिकेकडे एक कोटी नव्वद लाख डॉलर्सचा हप्ता धाडायचा होता. 'कराराप्रमाणे आपण हा हप्ता धाडला पाहिजे' असे प्रधानमंत्री हेरिओ याने जाहीर करताच सारा फ्रान्स खवळला. इतका की त्यागपत्र देऊन हेरिओ याला दूर व्हावे लागले. फ्रान्सने कर्जफेडीबाबत हे धोरण स्वीकारताच अमेरिकेने खूप जळफळाट केला. 'ज्या राष्ट्रांनी आपली कर्जे बुडविली आहेत त्यांना पुन्हा येथे कर्ज उभारण्याची परवानगी देता कामा नये' असा अमेरिकन काँग्रेसने आपल्या सरकारला इशारा दिला. परंतु १९३३ नंतर युरोपमधील वातावरण इतक्या झपाट्याने बदलू लागले की नुकसान-भरपाईबरोबरच कर्जफेडीचा प्रश्नही त्या साऱ्या गडबडीमध्ये विरून गेला.

अमेरिकेने कर्जवसुली धोरण दहा वर्षे इतके कठोर स्वीकारले होते की त्यामुळे ब्रिटन आणि फ्रान्स या देशामध्ये अमेरिकेसंबंधी अप्रीती निर्माण झाली. १९१८ मध्ये निर्माण झालेली या तीन पाश्चिमात्य राष्ट्रांची आघाडी १९३३ मध्ये पार कोसळली होती. परिस्थितीच्या रेट्यामुळे या तीन राष्ट्रांना काही वर्षांनंतर पुन्हा एकदा एकत्र यावे लागले. परंतु मध्यंतरीच्या काळात बरेच काही घडणार होते.

साऱ्या जगाचीच त्यावेळी फसगत झाली होती.

१९१९ मध्ये पहिले महायुद्ध संपले तेव्हा जर्मनीतील राजसत्ता उन्मळून पडली होती आणि तिची जागा वायमार प्रजासत्ताकाने घेतली होती. हे प्रजासत्ताक

आपल्या नियंत्रणाखाली यावे यासाठी उजवे आणि डावे गट यांच्यात रस्सीखेच सुरू झाली होती. त्यामुळे या प्रजासत्ताकाला स्थिरता लाभत नव्हती. त्यातून या प्रजासत्ताकाने व्हर्सायच्या करारावर स्वाक्षरी केल्यामुळे आम जनतेलाही या नव्या राजवटीबद्दल ममत्व वाटत नव्हते. या अशा गोंधळात हें वायमार प्रजासत्ताक कसेबसे टिकाव धरून होते इतकेच.

या प्रजासत्ताकाचे नेते पाश्चिमात्य राष्ट्रांना सांगत होते – 'जर्मनीवर बेसुमार खंडणी लादल्यामुळे जर्मन जनमानस असंतोषाने खदखदत आहे. त्यामुळे तुम्ही जर त्याबाबतीत उदार धोरण स्वीकारले तर लोकांचा प्रजासत्ताकावरचा राग दूर होईल.'

वायमार प्रजासत्ताकाचा हा युक्तिवाद केवळ ब्रिटन-अमेरिकेलाच नव्हे तर फ्रान्सलाही पटला.

एकदा का ऱ्हाईनलँडमधून उरलेसुरले फ्रेंच सैनिक काढून घेतले आणि नुकसान-भरपाईतून जर्मनीची मान मोकळी केली की जर्मनीतील नवजात लोकसत्ताक राजवट स्थिरपद होईल आणि १९१८ मधल्या पराभवाचा बदला घेण्याची भाषा जर्मनी-मध्ये ऐकू येणार नाही अशी सर्वांची कल्पना झाली. १९३२ मधल्या लुसान-परिषदेने नुकसान-भरपाईच्या प्रश्नावर पडदा टाकला तो याच आशेपायी.

परंतु प्रत्यक्षात घडले ते अगदी वेगळेच.

३० जून १९३० रोजी शेवटचा फ्रेंच सैनिक ऱ्हाईनलँडमधून बाहेर पडला आणि त्यानंतर अवघ्या तीन महिन्यांच्या आत म्हणजे १४ सप्टेंबरला झालेल्या निवडणुकीमध्ये अॅडॉल्फ हिटलरच्या नाझी पक्षाने बरीच मोठी मजल मारली. १९२८ च्या निवडणुकीमध्ये या पक्षाला अवघी आठ लाख मते आणि बारा जागा मिळाल्या होत्या. १९३० मध्ये नाझी पक्षाला मिळालेल्या मतांची संख्या चौसष्ट लाखांवर गेली होती आणि राईशस्टागमधल्या एकशेसात खुर्च्यांवर त्या पक्षाचे उमेदवार विराजमान झाले होते.

९ जुलै १९३२ रोजी अँग्लो-फ्रेंचांनी जर्मनीला 'अपमानकारक वाटणारी' नुकसानभरपाई रद्द केली आणि त्यानतर तीन आठवड्यांच्या आत जर्मनीमध्ये जी सार्वत्रिक निवडणूक झाली त्यावेळी नाझी पक्ष सर्वांत लोकप्रिय पक्ष म्हणून निवडून आला. एक कोटी सदतीस लाख पंचेचाळीस हजार मते मिळवून या पक्षाने दोनशे तीस जागा जिंकल्या होत्या.

अवघ्या चार वर्षांमध्ये हिटलर कोठल्या कोठे जाऊन पोचला होता. हिटलर म्हणजे जर्मनी हे समीकरण सिद्ध करण्याची त्याची महत्त्वाकांक्षा साकार झाली होती.

–आणि इकडे फ्रान्स वेगळ्याच कोलाहलात गुरफटून गेला होता.

(क्रमशः)



सुधाकर राजे

## चोरी एवढी करू नये

चोरी कशाकशाची होते ? एखाद्या शेटजीला विचारले तर तो म्हणेल पैशाची. एखाद्या प्रेमवीराला विचारले तर तो म्हणेल, ' हाय ! दिलकी. ' त्याचप्रमाणे हातरुमाल, फाऊंटनपेन, सरकारी गुप्त कागदपत्र इत्यादी किरकोळ गोष्टींचीही चोरी होते. मागे एकदा दिल्लीत एका साधूचा हत्ती चोरीला गेल्याची बातमी छापून आली तेव्हा चोरीला जाणाऱ्या मालात जरा वजनदार वस्तूची भर पडली असे वाटले होते. पण ती बातमी तितकीशी खरी नव्हती. कारण देवदर्शनाला देवळात गेलेल्या साधूने बाहेर पार्क केलेला हत्ती जरा फिरायला नेला होता व गिचमीड अक्षरात लिहिलेली रस्त्यांची नावे नीट न वाचता आल्याने वाट चुकला होता असे समजले. पण आता मात्र पैशाचे पाकीट किंवा हातरुमालाच्या जोडीला एका नवीन वस्तूची भर पडली आहे. परवा वर्तमानपत्रात वाचले की इंग्लंडमध्ये एका माणसावर चार मैल लांब रेल्वेचे रूळ चोरल्याबद्दल खटला भरण्यात आला. आता बोला ! दरवर्षी वाढत जाणारी रेल्वेची भाडी पाहून मला अनेकदा वाटते की निदान दिल्ली-मुंबईपुरती तरी स्वतःची रेल्वे असावी. पण त्यासाठी सरकारी रेल्वेचे रूळ उचलण्याची उचलेगिरी मात्र सुचली नव्हती. प्रस्तुत चोराने फक्त चारच मैल लांबीचे रूळ चोरले त्याअर्थी त्याची समस्या अक्षरशः ' लोकल ' स्वरूपाची असावी. म्हणजे दादरला राहून गिरगावात नोकरी करणाऱ्या माणसाचा लोकलमध्ये जसा घाम निघतो तसा त्रास वाचविण्यासाठी त्याने हा (रेल्वेचा) मार्ग शोधून काढला असावा. आता शंका एकच – चार मैल लांबीचा रूळ कोणाच्या नकळत झटकन खिशात टाकता येण्यासाठी त्याने कोठल्या मापाचा कोट शिवला होता ?

### ◘ प्रेमाचा पर्फ्यूम

प्रेमपत्रे सुगंधी नोटपेपरवर लिहिली जातात (असे मला सांगण्यात आले आहे.) पण पॅसिफिक महासागरातील एका छोटेखानी बेटावरच्या राज्याने सुवासिक पोस्टाची तिकिटे काढली आहेत अशी बातमी आहे. म्हणजे आता मुंबईचा मनू अन् पुण्याची पमी यांच्या प्रेमाचा सुवास पोस्टखात्याच्या मार्फत अक्षरशः मुंबईपासून

पुण्यापर्यंत दरवळणार म्हणायचा ! नाहीतरी हल्ली कारखान्यांच्या धुरामुळे वातावरण इतके दूषित होऊ लागले आहे की हवेत चिमूटभर प्रेमाचा पर्फ्यूम मिसळला तर बरेच होईल. पण एकदा सुगंधी स्टँप म्हटला की त्यात गुलाब, चमेली, बकुळी अशी व्हरायटी पाहिजे. कारण सेट हा मूडचा निदर्शक असतो म्हणतात, तेव्हा स्टँपला कुठला वास येतोय् यावरून पत्राचा मूड काय आहे याची प्राणप्रियेला किंवा हृदयेश्वराला कल्पना आणून देणारे रेडीमेड कोष्टक पाहिजे, नाही का ? उदाहरणार्थ, तिच्या आठवणीने व्याकूळ होऊन लिहिलेले त्याचे पत्र : सेट चमेली. त्याच्या भेटीची हुरहूर लागून लिहिलेले तिचे पत्र : सेट गुलाब. बरेच दिवस तिचे पत्र न आल्याने रागावून लिहिलेले त्याचे पत्र : सेट हेना. अन् शेवटी 'आईनं किनई, बाबांचं मन वळवलं अन् त्यांनी शेवटी हो म्हटलं' अशी अफलातून बातमी कळविणारे तिचे पत्र : सेट रॉयल नंबर फाइव !

## ▫ लिपस्टिक लावणारी मुंगी

हल्लीच्या वैज्ञानिकांचा एक आवडता उद्योग म्हणजे पूर्वीच्या वैज्ञानिकांनी माडलेले सिद्धात खोटे ठरवणे. आता मुंग्यांचीच गोष्ट घ्या. मुंग्या म्हणजे साक्षात उद्योगीपणा असे शाळेत असताना मास्तरानी आमच्या बालमनावर (व छडीच्या सहाय्याने हातावर) ठसवले होते. पण आता अमेरिकेतील दोन शास्त्रज्ञांनी एका वारूळाचे बरेच दिवस निरीक्षण करून असा सिद्धांत माडला आहे की बऱ्याचशा मुंग्या काम न करता उगीचच इकडे तिकडे भटकत असतात, अन् याहून वाईट गोष्ट म्हणजे काम करणाऱ्या मादी मुंग्या बराचसा वेळ नखरा करण्यात वाया घालवतात. म्हणजे आता आहे की नाही कमाल ? रोज रोज ऑफिसात जायचा मला मनस्वी कंटाळा येतो, तेव्हा नर हा जात्याच आळशी असतो हे मला कबूल आहे. पण–भटकणाऱ्या या मुंग्या कुठल्या कनॉट प्लेसमध्ये विंडो शॉपिंग करीत वेळ काढतात हे मला समजत नाही. रांगेत शिस्तीत लेफ्ट-राइट करणाऱ्या मुंग्या मी नेहमी पाहतो, पण तो सिनेमाचा क्यू असतो हे बेटे आताच कळले. अन् मादी मुंग्या काम करण्यापेक्षा ब्यूटी पार्लरमध्ये जास्त वेळ काढतात हे वाचून तर आपण सर्दच झालो. साखरेच्या कणाचे ओझे वाहता वाहता एखादी मुंगी मध्येच बोजा जमिनीवर ठेऊन अन् पर्स उघडून लिपस्टिक-पावडर लावीत असेल तर ते खरोखरीच अक्षम्य आहे.

▫ ▫ ▫

# हा प्रश्न वर्षभरात सोडवणे शक्य आहे!

वरुण भिडे

एकंदरीत आपल्या शासनाचा किंवा कदाचित घटनेने घालून दिलेला एक अलिखित नियम असला पाहिजे की कोणत्याही प्रश्नाला अत्यंत भेसूर स्वरूप येईपर्यंत त्याच्याकडे पहायचेच नाही. अत्यत आणीबाणीचा प्रसंग आलाच तर फक्त त्या प्रश्नाकडे पहायचे. सोडवण्याचा भानगडीत मात्र बिलकूल पडायचे नाही...आणि बाकी काहीही असले तरी हा नियम दिल्लीपासून ग्रामपंचायतीपर्यंत मोठया निष्ठेने पाळला जातो.

पुणे शहरातदेखील वरील नियम अतिशय काटेकोरपणे पाळला जातो. पुणे शहराचे औद्योगीकरण व्हावे असा निर्णय घेतला गेला त्यावेळी त्याच्या फायद्या-बरोबर दूषित हवा आणि झोपडपट्टी हे प्रश्न उद्‌भवणार हे गृहीत धरायला हवे होते. पण तसे गृहीत धरणे सोडाच पण या प्रश्नाचा भस्मासूर जागा झाला असला तरी महापालिका आरामातच आहे. या भस्मासुराला गाडण्याचा प्रयत्न कोणीही करण्याच्या विचारात नाही. महापालिकेचे गलिच्छ वस्ती निर्मूलनाबाबत एकच धोरण आहे ते म्हणजे 'झोपड्या पाडणे'...या मार्गाने हा प्रश्न सुटेल असे लहान मूलदेखील म्हणणार नाही. गलिच्छ वस्ती निर्मूलनाची महापालिकेकडे कोणतीही योजना नाही. अर्थातच त्यामुळे या कामासाठी मंजूर झालेल्या रकमांपैकी सात टक्के रक्कमदेखील खर्च झाली नाही.

कल्पना करता येणार नाही इतका हा प्रश्न मोठा आहे. पुण्यामध्ये एक लाख लोक झोपडपट्टीत रहातात. एकूण वीस हजार झोपड्या, अडीचशे वस्त्या पुणे महा-पालिकेच्या हद्दीत ३५ ठिकाणी विखुरल्या आहेत. त्यापैकी तीन वस्त्या इतक्या मोठया आहेत की त्यांचीच एक नगरपालिका होईल. या वस्त्या म्हणजे शुक्रवार

पेठ, गाडितळ आणि सोनावणे हॉस्पिटल. या वस्त्यात सुमारे ६००, ६०० आणि १००० झोपडया आहेत. आणि ११००० पेक्षा अधिक वस्ती आहे. याचा अर्थ असा की पुण्यातील गलिच्छ वस्त्याच्या मताच्या जोरावर एक आमदार आणि नऊ नगरसेवक निवडून जाणे शक्य आहे. असे असूनही ही मोठी लोकसंख्या संपूर्णपणे दुर्लक्षित आहे. या एक लाख लोकाना संडास, पाणी आणि वीज यापैकी काहीही मिळत नाही. कशीतरी सोय लावली जाते या शिवाय इतर काही म्हणता येणे अशक्य आहे.

झोपडपट्टीत रहाणाऱ्यांविषयी अशी एक समजूत असते की हे लोक फुकट रहातात आणि बेकायदेशीर व्यवसाय करतात. परंतु प्रत्यक्ष परिस्थिती फार भिन्न आहे. ६०% लोक झोपडयांचे अथवा जागेचे भाडे भरतात आणि ४२% लोकापैकी बरेच लोक वहिवाटीमुळे जागा मोफत वापरतात. यातल्या अनेकांच्या पूर्वजांना पेशवाईपासून जागा वापरण्यास मिळाल्या आहेत. त्याचप्रमाणे एकूण अडीचशे झोपडवस्त्यापैकी फक्त वडारवाडी, ताडीवाला रोड आणि प्रायव्हेट रोड रेल्वे क्वाटर्स या झोपडपट्ट्यातून मोठ्या प्रमाणात सर्व तऱ्हेचे बेकायदेशीर व्यवसाय चालतात. याचा अर्थ असा नाही की इतरत्र सर्व कानात तुळशीपत्र घालून बसले आहेत. इतर वस्त्यातही हे प्रकार आहेतच, पण प्रमाण अतिशय कमी. शनिवार, बुधवार, कसबा, गंज इ. पेठात जितके बेकायदेशीर प्रकार चालतात तितकेच. झोपडपट्ट्यातच गुन्हेगारी जास्त आहे असे नाही. येथे राहणाऱ्या लोकापैकी ४१% लोक विविध ठिकाणी नोकऱ्या करतात, ४५% लोक मजुरी करतात. ही मजुरी प्रामुख्याने वीट भट्ट्या आणि बांधकामे या ठिकाणी केली जाते. राहिलेले १४% लोक फळे विकणे, हातगाड्या, चांभारकाम अशाप्रकारची कामे करतात. त्याचप्रमाणे बहुतेक लोक भाडे देऊन रहाणारे आहेत. ४५,००० लोक भाडे देत नाहीत, ४५,००० लोक १० रु. पर्यंत भाडे भरतात, १०,००० लोक १० रु. पासून २५ रु. पर्यंत भाडे देतात आणि सुमारे ३०० लोक २५ रु. हून अधिक भाडे देतात.

या गलिच्छ वस्त्या ज्या जागावर आहेत त्या जागांच्या मालकांची माहिती करून घेणे मोठे मनोरंजक आहे. बऱ्याचशा वस्त्या सरकारी जागा, रेल्वे अथवा म. न. पा. च्या जागावर आहेत. इतरांपैकी म्हणजे खाजगी जागा मोठमोठे अनेक उद्योगपती, आमदार, नगरसेवक, महापौर इ. लोकांच्या मालकीच्या आहेत. याशिवाय इतर कित्येक जणांच्या खाजगी जमिनीत गलिच्छ वस्त्या उभ्या राहिलेल्या आहेत. या जागांचे भाडे दिले जाते आणि भाड्याच्या पावत्या मिळत नाहीत असेही म्हणतात.

या एक लाख लोकाचे कोणत्याही तऱ्हेचे हित–अहित पाहिले जात नाही. यांना पिण्याला आणि वापराला पाणी कुठून मिळते याबद्दल कोणीही विचार करीत नाही. स्वच्छतेची आणि नियोजनाची तर बिलकूल सोय नाही. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा घटनेने मान्य केलेल्या आहे। त्यामुळे या झोपडवासियांना बेघर करण्याची धोरणे म्हणजे केवळ पुंडपाळेगारी म्हणता येईल. संडास ही सर्वात

हंसाबाईंच्याजवळ विद्वत्ता नाही.
आपल्या जीवनकथेला गोंडस रूप देण्यासाठी
आवश्यक असलेली वाङ्मयकलाही नाही.
त्यांच्याजवळ आहे ते
जे जाणतेपणे, अजाणतेपणे
डोळे उघडे ठेवून व आंधळेपणाने
अनुभवले, उपभोगले, सोसले ते ते.
त्याची ही कहाणी आहे

—वा. ल. कुलकर्णी

हंसा वाडकर

# सांगत्ये ऐका

किंमत : आठ रुपये

राजहंस प्रकाशन

प्राथमिक सुधारणा, परंतु तीदेखील झालेली नाही. काही वस्त्यांमध्ये स्त्री–पुरुषांना एकाच उघडया माळावर जावे लागते. शेवटी लाजायचे तरी कोणाला? काही काही वस्त्यात मात्र स्त्रियाना अंधारात अथवा एकदम रात्री अंधारात जावे लागते...जय समाजवाद.

स्वच्छता नाही, स्वच्छ रहाण्याचा प्रयत्न केला तरी जमणे शक्य नाही, त्यामुळे अतिशय दूषित वातावरण. स्वाभाविकपणे आरोग्य चागले रहाण्याची शक्यता शून्य. त्यामुळे या वस्त्यातून वाढणारी नवी पिढी कशी निपजणार आहे याची कल्पनाच करवत नाही. याच वातावरणातले लोक आपल्यावरोबर कार्यालयात, कामावर, हॉटेलात असणार. त्यांनीच विकलेली फळे, आइस्क्रीम खाणार, याचा परिणाम आपल्याही आरोग्यावर होईल याचाही कोणी विचार केला नसावा. या गलिच्छ वस्त्या वाढणे हे किती हानिकारक आहे याची दखल आरोग्य खात्याने घेतली आहे की नाही ही शंकाच आहे.

समग्रपणे पाहिले असता असे आढळून येईल की महानगरपालिका या प्रश्नाचा पाहिजे तितका तर राहोच पण बिलकूल विचार करीत नाही. पुणे शहरातील १/८ लोकवस्ती पूर्ण दुर्लक्षित आहे. कोणत्याही जबाबदार अधिकाऱ्याला याची माहिती नसावी अशी शंका येते. नुकत्याच झालेल्या झोपडया पाडण्याच्या प्रकरणाची कोणालाही माहिती नसल्याचे आढळले. कोणाला माहीत नाही, कोणी सांगू शकत नाही, तर अशी माहिती असणे अपेक्षित असणाऱ्या अधिकाऱ्याना याबाबत काहीच कल्पना नव्हती.

हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न कोणीही करीत नाही. उलट उच्च, अति उच्च अशा पातळयांवर अधिकाधिक चिघळवला जातो आहे. दि. २६ जून रोजी पर्वतीच्या पायथ्याशी असणाऱ्या झोपडया पाडल्या. हा निर्णय आयुक्तांनी संपूर्णतया स्वतःच्या अखत्यारीत घेतला, इतकेच नव्हे तर समन्वय समितीच्या सभेपुढे हा विषय चर्चेला काही दिवस घेतला होता आणि निर्णय घेतला नव्हता, तरीही रंग-मंदिराच्या वर्धापनदिनी झोपडया तोडल्या. नव्याने झाल्या होत्या त्या पाडल्याच पण जुन्याही पाडून टाकल्या. या प्रश्नाला विकृत वळण देण्याचा हा प्रकार आहे. आणि याची जबाबदारी अधिकाऱ्यांवर येते.

या सर्वात विनोदी गोष्ट म्हणजे आमचे नगरस्थापत्य अधिकारी 'स्लम प्रॉब्लेम'च्या अभ्यासासाठी इंग्लंडला गेले होते. नुकतेच मुंबईत जाऊन आले पण पुण्यात मात्र हा प्रश्न सुटेल अशी चिन्हे नाहीत. त्याच्या योजना नाही आणि अनुदानांच्या रकमा पडून आहेत. या सर्व प्रकारामुळे एक शंका मनात आली की अभ्यासक्रम 'प्रश्न सोडवण्याचा' नसून 'वाढवण्याचा' होता.

गलिच्छ वस्ती निर्मूलन हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे याची शासनाला कल्पना नाही इतकेच नव्हे तर एकूण जनतेला, पुढाऱ्यांना देखील कल्पना नाही. जो तो

आपल्या जगात मश्गुल आहे. असेच सर्वजण वागतील तर एके दिवशी झोपड-पट्टीचा राक्षस सर्वांना खायला उठेल. या वस्त्यातील जन्मप्रमाण इतर वस्त्यांपेक्षा अधिक आहे आणि मृत्यु प्रमाणही जास्त आहे. वैद्यकीय सोयी नाहीत. अन्न, वस्त्र, निवारा या गरजा कशाबशा भागवल्या जात आहेत; असे असुन देखील येथील रहिवाशाचे प्रमाण सारखे वाढत चालले आहे.

हा प्रश्न सोडविला जाण्यासाठी खाजगी रीतीने योजना पुढे आल्या आहेत परतु त्याकडे दुर्लक्ष केले जाते. काही वर्षांपूर्वी पुण्यातील उत्साही मंडळींनी स्वस्त घराची योजना,तयार करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी स्वस्त घरे आणि गलिच्छ वस्ती निर्मूलन या दोन्हीत अनुभवी असणारे तज्ञ स्थापत्यशास्त्रज्ञ श्री. खोडक याना बोलावले गेले. त्यांच्या व्याख्यानाच्याच वेळी नतर चर्चा होऊन निश्चित योजना व्हावी अशी कल्पना होती. या चर्चासत्राचे आमंत्रण पुण्यातल्या अनेकांना होते, शिवाय महापालिकेला आणि इन्स्टिट्यूट ऑफ एजिनियर्स या संस्थांनाही बोलवणे होते. सत्राच्या आयोजकांना असे वाटले की अनेक एंजिनियर्स आपल्या योजना घेऊन येतील. परतु प्रत्यक्षात फक्त चार-पाच एजिनियर्स आले. त्यापैकी फक्त श्री. ग. स. ठोसर यानीच ' गवताच्या छपराच्या घरांची योजना आणली. एकूण सर्वांच्या अनास्थेमुळे हा प्रश्न सोडवला जाण्याची सुसंधी टळली. या चर्चा-सत्राला महापालिकेचे सिटी एंजिनियर आले नाहीत.

या गलिच्छ वस्त्यामध्ये रहाणाऱ्याची पहाणी केली असता असे आढळले की येथे सर्व प्रकारचे श्रमजीवी रहातात. नोकऱ्या करणारे बोपोडी भागात असणारे लोक कारखान्यात कामगार आहेत. प्रामुख्याने किर्लोस्कर ऑईल एजिन्स आणि स्वस्तिक रबर. इतरत्र नोकऱ्या करणारे शिपाई, वेटर, अशा प्रकारची किंवा दुकानातील नोकरांची कामे करतात. आर्थिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागासलेले असल्याने त्याना या वस्त्यात रहाण्याचे काहीही वाटत नाही. उलट ज्यांची आर्थिक परि-स्थिती चागली आहे असे लोकदेखील येथे खुशीने रहातात कारण कोणतेही कर वगैरे देण्याची जरुरी नसते.

पुढारी वगैरे लोकांबद्दल यांच्या मनात अत्यंत अनादराची भावना आहे. त्यांच्या मते ...' ये लीडर लोग सबसे बदमास होते. है '...पुढारी फक्त वर्गणी अथवा मते या साठीच येतात. त्यांना हा प्रश्न मुळीच सुटावासा वाटत नाही. हा प्रश्न जोवर अस्तित्वात आहे तोवर पुढाऱ्याची चलती आहे. जर खरोखरी हा प्रश्न सुटला तर या पुढाऱ्याच्या पोटाचे काय ? वस्त्यांच्या जागांचे मालक आमदार, महापौर, नगरपिते असताना वास्तविक हा प्रश्न त्यांनी सोडवण्याचे मनावर घेतले पाहिजे. परंतु ते मनावर घेत नाहीत आणि घेणारही नाहीत. चोपून भाडे वसूल होते आहे, पुन्हा कागदोपत्री काही नाही. खाजगी जागांवर आक्रमणे वगैरे काही नाहीत. उलट या खाजगी जागांमध्ये भरपूर भाडे मिळते. आठ चौरस फुटाच्या

तुकड्याला दहा रुपये असे दहा पंधरा भाडेकरू एका मालकाच्या जागेत सहज असतात. असंस्कारित जागेवर (undeveloped) इतके भाडे स्वप्नातदेखील मिळणार नाही. पुढारी लोकांबद्दल एक भीतीची भावना मनात बाळगली जाते कारण वस्तीचा दादा हा तेवढ्यापुरताच दादा असतो. या वस्त्यांचे दादा म्हणजे तिथले राजे असतात, पण पुढारी म्हणजे king of kings असतात. न घाबरून चालणार तरी कसे ?

या झोपड्यात रहाणारे लोक प्रामुख्याने कारखाने, बांधकामे आणि वीटभट्टयां-वर कामे करतात. कारखानदार, बांधकामाचे कंत्राटदार, भट्टीवाले यांची काहीच जबाबदारी नसते का ? त्यांच्यावरही थोड्याफार प्रमाणात हा प्रश्न सोडवण्याची जबाबदारी टाकली गेली पाहिजे. बालगंधर्व रंगमंदिर, मंडई, नेहेरू स्टेडियम यासारखी भव्य वास्तुशिल्पे तयार करणारा कामगार मात्र तट्टयाच्या झोपड्यात असतो हे किती लांच्छनास्पद आहे. देशाच्या प्रगतीला हातभार लावणाऱ्या कार-खान्यातील मजुराची अधोगती होत आहे.

वृत्तपत्रांतून आणि इतरही अनेक मार्गांनी या प्रश्नाला इतके विकृत स्वरूप दिले गेलेले आहे की हाताच्या बोटावर मोजण्याइतके लोकही खरी परिस्थिती काय आहे हे पहात नाहीत. समाजातील श्रीमंत वर्ग आपल्याखेरीज कुठेही पहात नाही. उच्च मध्यमवर्गीय स्वतःला श्रीमंत समजून आतल्या आत कुढतो आणि श्रीमंतांकडे पहातो. गरिबांना इतरत्र पहाणे शक्य होत नाही. म्हणजे रहाता राहिला कनिष्ठ मध्यमवर्ग. तोदेखील या विकृत प्रचाराचा बळी झालेला. या मध्यम-वर्गियांचे एक नेहेमीचे वाक्य म्हणजे ...'अहो यांच्याकडे ट्रँझिस्टर्स असतात.'... खरी गोष्ट आहे. पण यांच्याकडे फक्त ट्रँझिस्टर्सच आहेत. पंखा, पलंग, कपाट, गॅस इ. पैकी काही नाही हा विचार केला गेला नाही.



या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी अशी योजना मांडली जाते...सुमारे ३०० एकर जागा राखून ठेवली जावी. या जागात कच्ची घरे जवळजवळ बांधली जावीत. त्याला भाडे ५ रु. ते १५ रु. असावे. सर्वांच्या पाण्याची, संडासाची आणि वीज-बत्त्यांची सोय केली जावी. यासाठी लोकांकडूनच पुष्कळ पैसा उभा राहणे शक्य आहे. महापालिकेचे पैसे पडून आहेत. याशिवाय कारखानदारांचीही मदत घेतली जावी. एक लाख लोकांचा प्रश्न सोडवणे सोपे नसले तरी अवघड खास नाही. सेनादत्त पेठ जशी त्वरेने बांधली गेली तसेच हे काम होणे आवश्यक आहे.

या योजनेत बहुतेक गलिच्छ वस्तीतील रहिवासी सामील होतील. भाडे भरण्याचीदेखील त्यांची तयारी आहे. यामुळे हा प्रश्न सुटण्याची सुलभता वाढेल. परंतु या योजना समजावून घेतल्या जात नाहीत. महापालिकेचे अधिकारी काहीही शंका काढतात ..उदाहरणार्थ: अशा जागा निर्माण केल्या तर आणखी लोक येऊन राहतील...असे कोण येणार आहे? कामधंदा असेल तरच लोक येतील ना? उगीच येणार नाहीत किंवा चांगली घरे सोडून कोणी जाणार नाही. ही योजना मुख्यमंत्र्यांच्या कानावरही घालण्यात आली आहे. परंतु तेही काही बोलत नाहीत. पुण्यातील गलिच्छ वस्ती निर्मूलन ही योजना मुंबईसारखी अवघड नाही. पुण्यात जागा भरपूर आहे, तरीही या एक लाखांची सोय होत नाही. कारण हे दरिद्री आहेत आणि समाजातील उत्त्युच्च वर्गातील लोकांपैकी १०–१५ जणांसाठी अत्यल्प भाड्याने गोल्फचे मैदान राखून ठेवले आहे. हा कुठला समाजवाद?

महापालिकेने मनावर घेतले तर हा प्रश्न सुटणे अवघड नाही. महापालिकेने एक घरबांधणी खाते काढावे अथवा गृहनिर्माण मंडळ स्थापन करावे. यासाठी अडचणी कशाच्याच नाहीत. अडचण फक्त काम न करण्याची आहे. हा प्रश्न वर्षभरात सोडवणे शक्य आहे. तसेच नवीन व्यवसायांना परवानगी देण्यापूर्वी जर घरांचा प्रश्न सोडवला जाण्याची व्यवस्था केली तर हा प्रश्न कायमचा टाळून टाकणे शक्य होईल...



विद्वत्ता, वैराग्य, तारुण्यांतही अनिश वेदान्तचिंता, प्रौढशास्त्रपथानुगा पण मनो-मोहिनी वाणी. हरिपदाम्बुजावर निस्सीम भक्ति. असे एक ना अनेक विस्मयजनक गुण आपल्या पुत्राजवळ आहेत. पण आम्ही फक्त त्याचं यशगानच करूं शकतो. 'ब्रूमो यशः केवलम्।' सन्मानपत्राबरोबरच महावस्त्र देऊन मुरलीधरबुवांचा सत्कार केला. महावस्त्राच्या रूपानं साऱ्या पंडितांच्या सद्भावनांचं शालीन भरजरी वस्त्र होतं ते !

ह्याच पंडित–सभेत एक सश्रद्ध गरीब श्रोताही होता. थंडीच्या दिवसात त्याचं अंगावर एक काबळ पांघरलेलं होतं. उत्स्फूर्त होऊन तो बुवांपाशी आला आणि त्यानं अंगावरलंच ते कांबळं काढून बुवांच्या अंगावर घातलं. आणि आर्ततेनं म्हणाला, "माझ्याजवळ द्यायला ह्या क्षणी हेंच आहे." सात्विक अंतःकरणाचा आविष्कृत पुरस्कार होता तो !

त्यानंतर सन्मान होतच राहिले. कुर्तकोटींचे गुरु पित्रेस्वामी, करवीरपीठ ह्यांच्या मठांत 'हरिकीर्तनवाचस्पति' पदवीपत्र झाले. सकेश्वर सठाधीश श्रीमत् शंकराचार्य शिरोळकर स्वामी ह्यांच्या अध्यक्षतेखाली गायकवाड वाड्यात पुण्यास सत्कार झाला. तात्यासाहेब केळकर, श्रीकृष्ण नीळकंठ चाफेकर आदींच्या स्वाक्षरीसहित मानपत्र झाले.

मुंबईच्या ब्राह्मणसभेमध्ये म. म. श्री. काणे ह्यांच्या अध्यक्षतेखाली, तसेच पुन्हा काशीस माधवशास्त्री वझे ह्यांच्या अध्यक्षतेखाली 'कीर्तनाचार्य' पदवी मिळाली; असे सत्कार होत राहिले, मानपत्रे मिळत गेली, विद्वन्मान्यता आणि लोकमान्यता मिळतच गेली.

ह्याच सुमारास मठाची जबाबदारी घरांतील कर्ता पुरुष ह्या नात्यानं शिरावर येऊन पडली. बुवा मठपति झाले ! 'मुरलीधरमहाराज' झाले !! अमळनेरच्या गादीवर, प्रथमविवाहाची पत्नी निवर्तल्यावर, बसविण्याचा बाळकृष्णमहाराजांनी आग्रह केला. केवळ वडिलांच्या आज्ञेवरून आणि स्वतःच्या मठपरंपरेत व्यत्यय येऊं नये म्हणून ! शंकराचार्यांच्या गादीवर बसण्याचा आग्रहही झाला. तोही पित्राज्ञेनं नाकारला. महाराजाना अन्य बंधने नको होती. केवळ स्वतःच्या मठाची सेवा करण्याचं सामर्थ्य हवं होतं. वंशपरंपरेनं चालत आलेलं मंदिर जीर्ण झालं होतं. संस्थानातील देवतेच्या मस्तकावर गळत होतं. महाराजांना सारं पुन्हा उभं करायचं होतं, वैभवसंपन्न करायचं होतं, ती महाराजांची महत्त्वाकांक्षा होती. रोहिणीच्या तीरावर मूळपुरुषांची समाधि उघड्यावर होती. महाराजाना तिथं समाधिमंदिर उभं करायचं होतं. प्रवासांत निरनिराळ्या देवस्थानांचं वैभव महाराजांनी पाहिलं

होतं, ते सारं निजामपूर संस्थानात निर्माण करायचं होतं. महाराजांचा झंझावाती प्रवास चालू होता. हरिकीर्तनातून, तत्वज्ञानाच्या सखोल सागरातून अनंत रत्नें महाराज उधळीत होते.. ज्ञानदान करीत होते. जनता विद्वत्तेचा सन्मान करीत होती, राजदरबारातून महाराजाचे सन्मान होत होते.

इंदोरला होळकराच्या दरबारात सायकाळी कीर्तन ठरलं होतं. राजांनी आमंत्रण केलं होतं. मृदंगाचार्य गोविंदराव बऱ्हाणपूरकर साथीला होते. महाराजाना नृत्याची आवड होती, म्हणून काही दिवस त्यानी बऱ्हाणपूरकरांना मृदंगाच्या साथीसाठी जवळ ठेवलं होतं. महाराजाचे बधु भानुदासबुवा पेटीची व श्रीरामबुवा टाळाची साथ करीत.

दरबारात राजांचं आगमन झाल्यावर त्यांना उत्थापन देऊन मुजरा करण्याची दरबारची रीत होती. महाराजाजवळ हे कुणीतरी बोललं.

महाराज म्हणाले, "हे शक्य नाही. नारदाच्या गादीवर उभा राहून मी पृथ्वीपतीला मुजरा करणार नाही. इथून फक्त वैकुंठपीठाधीशासच मुजरा होईल."

प्रसंग बांका होता. राजदरबारी राजाचा अपमान होऊन चालणार नव्हता. आणि नारदीय पीठाचा अवमान तर मुळीच सहन होणार नव्हता.

पण महाराज चतुर होते.

वेळ सायंकाळची होती. महाराजाची सायंसंध्या व्हावयाची होती. महाराजांनी श्रीरामबुवाना बरोबर वेळेवर नमन सुरू करण्यास सागितले. आणि लक्ष्मणबुवांना संध्येची तयारी करण्यास.

वेळ झाल्याबरोबर राजे आले. नमन सुरू झाले होते. महाराजांची सायंसंध्या आटोपल्यावर त्यांनी पोषाख केला. महाराजांनी वीणा उचलल्यावर राजांनी आपल्या आसनावरून महाराजाना त्रिवार मुजरा केला. राजानं विद्वानाचा केलेला सन्मान होता तो. महाराजानी नारदीय गादीवरून आशीर्वाद दिला.

कीर्तन आटोपल्यावर राजानी स्वहस्ते महावस्त्र आणि राजदरबारची महा-दक्षिणा अर्पण केली.

ग्वाल्हेरच्या जिवाजीराव शिंद्यांच्या राज्याभिषेकानंतर आशीर्वादपर कीर्तना-साठी राजदरबारचे निमंत्रण सरदार आंग्र्यांतर्फे आले होते. चार घोड्यांची दरबारी गाडी महाराजाच्या मुक्कामी पाठविली होती. पलिते घेतलेल्या राज-सेवकांसहित सन्मानानं महाराजाना दरबारी नेण्यात आलं.

सरदार आंग्र्यांनी महाराजाच स्वागत केलं. कीर्तनाला थोडा अवकाश होता. म्हणून बाहेरील उद्यानात महाराजाशी ते काही बोलत बसले. महाराजांसमोर त्यांनी सिगरेट शिलगावली.

महाराजांच्या कपाळावर आठी चढली; महाराजाचा आवाज चढला "आंग्रे, कुणासमोर बसला आहांत? दरबारचे सरदार म्हणवतां, विद्वानांची ही मर्यादा

ठेवतां ? सरदार असाल दरबारचे. आम्ही इथं निमंत्रित आहोत. आपण होऊन निमंत्रण लावलेलं नाही. आम्हाला ही अमर्यादा सहन होणार नाही."

आंग्र्याना घाम फुटला. रुमालानं ते कपाळावरील घाम टिपू लागले. महाराजांची अजीजीनं क्षमा मागूं लागले, "महाराज, क्षमा करा; चूक झाली." खालच्या आवाजांत म्हणाले, "महाराज, बिदागी वाढवितो, कीर्तनात बोलूं नका."

महाराजाचा स्वर आणखी वर चढला; "मृदंगाला कणीक तिंबूं पाहतो, मग तर हें मी जगजाहीर करीन. काय समजलांत तुम्ही आम्हाला ? सत्तेचे आणि सपत्तीचे गुलाम ?

महाराजाना शांत करणं कठीण होतं. आग्र्यानीं पायावर मस्तक ठेवलं. 'महाराज, माझ्या अब्रूचा प्रश्न आहे." महाराजानी सारासार विचार केला.

कीर्तन वेळेवर सुरू झालं. आग्र्यांचा ऊर धपापत होता. महाराजानी काहीच उल्लेख केला नाही.

कीर्तन संपल्यावर राजदरबारातर्फे सत्कार झाला, आणि मेण्यातून महाराजांची मिरवणूक काढण्याचं ठरविलं. महाराजानी नकार दिला. मंगलवाद्यांच्या निनादात भागवत ग्रंथाची, नाथप्रसाद पाडुरंग मूर्तीची मिरवणूक काढण्यात आली. विद्वन्मान्यता मिळालीच होती. राजदरबारीही सत्कार झाले.

आणि जनतेनं तर महाराजांना अक्षरशः डोक्यावर घेतलं. महाराजांच्या कीर्तनाचं अखिल महाराष्ट्राला वेड लागलं.

महाराजांचं कीर्तन म्हणजे एक अनुभूती असे. वक्त्यासहित दहादहा हजार श्रोत्यांची भावसमाधि असे. तुकाराम महाराजांच्या प्रमाण अभंगांचे चरण आणि ज्ञानदेवाच्या हरिपाठाचे स्वर गगनाला चुंबीत असत. कुठंही, कुठल्याही गावी कीर्तन असो, महाराजानी आपल्या गंभीर आवाजात अभंगाचा चरण म्हणावा, आणि सहस्र कंठांतून स्वर निनादावा. हरिनामाच्या उद्घोषान वैकुंठ पृथ्वीवर उतरावा.

कहीं एकाचेनि वैकुंठा जावें। तें तिहीं वैकुंठचि केलें आघवें।
ऐसे नामघोष गौरवें। धवळले विश्व ॥

सरल नासिका, विशाल भाल, गोपीचदनाचा ऊर्ध्वपुंड्र रेखिलेला, दुधाच्या फेसाप्रमाणे पांढरा स्वच्छ फेटा बांधलेला, भिकबाळीचा एक कान उघडा, मोत्याची भिकबाळी कानात डुलतेय; अगात स्वच्छ अगरखा, जरीकाठी उपरण्याची पट्टी, धोतराचा एक सोगा गुडघ्यावर गेलेला, गळ्यात ब्रह्मवीणा. तिच्या तारा छेडल्या जाव्यात. चिपळीनं ताल धरावी. घुगरु मृदगाशी समरस व्हावेत आणि महाराजानी नाचू लागावं.

"नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावूं जगीं।"

महाराजांचं हे रूप बघावयालाच कित्येक श्रोते उत्सुक असत ! शाकर तत्त्वज्ञानाची लयलूट होई. ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव, तुकाराम, रामदास इत्यादि

महाराष्ट्रीय संतांच्या अमृतवाणीचं पान श्रोत्यांना महाराजांनी यथेच्छ करवावं; मीराबाई, कबीर, तुलसीदास, सूरदासाच्या भक्तिवाङ्मयानं मराठी माणसांना वेडावून टाकाव. पूर्वरंगाचा हा थाट तर उत्तररंगात संताची भक्तिरसपूर्ण चरित्रे आणि ईश्वर चरित्रे साभिनय महाराजानी उभी करावीत. महाराज कुशल अभिनेतेपण होते. ह्याची कबुली बालगंधर्वांनीही दिली होती.

बालगंधर्वांचीही महाराजावर फार प्रेम. एकदा बडोद्यास कीर्तनं असताना नारायणरावांच्या गंधर्व नाटकमंडळीचा मुक्कामही तिथेच होता...एक दिवस महाराजांकडे सकाळीच नारायणराव आले. म्हणाले, ' महाराज, कीर्तनाची वेळ बदला. आपल्या कीर्तनाला समाज येतो आणि आमच्या कंपनीचे खेळ चालत नाहीत.'

मनोरंजनापेक्षाही महाराजाच्या कीर्तनाचं वेड लोकाना अधिक होतं. महाराजांना कीर्तनात हार घालण्यासाठी तर फुलांची दुकानं लागत असत.

पुढे पुढे तर गंधर्व कीर्तनात येऊन भजनं म्हणत असत. मुरलीधर महाराजांचे कीर्तन तर, कीर्तन म्हणजे काय ह्याचा आदर्श नमुना होता.

नानामहाराज तर म्हणत, ' माझे अनेक शिष्य आहेत, सगळे अधिकारी आहेत, पण मुरलीधरबुवा ह्या विषयात एम्. ए. आहेत.'

" श्रीकृष्ण विष्णु गोविंद। ह्या नामाचे निखिल प्रबंध।
माझी आत्मचर्चा विशद। उदड गाती."

हा त्यांच्या कीर्तनाचा थाट होता.

सुगुणचरित्रें परमपवित्रे हरिची वर्णावी।
सज्जनवृंदें मनोभावे आधी वदावी॥
सतसगे अतरगे नाम बोलावें।
कीर्तनरंगे देवासंनिध सुखेचि डोलावे॥
भक्तिज्ञानविरहित गोष्टी इतरां न कराव्या।
प्रेमभरें वैराग्याच्या युक्ति विवराव्या॥
जेणेकरूनि मूर्ति ठसावी अंतरिं श्रीहरिची,।
ऐशी कीर्तनमर्यादा ही देवाचे घरची।
अद्वयभजनें अखंड स्मरणे वाजवि करताळी।
एकाजनार्दनी मुक्ती होये तत्काळी॥

ही महाराजांची कीर्तनमर्यादा होती. महाराज राजकारण, समाजव्यवस्था, अर्थनीति, धर्म ह्या विषयावरही बोलत, पण कीर्तनाचा प्रतिपाद्य विषय तो कधीच नसे. विषय असे–' माजी आत्मचर्चा विशद ' विशय असे–' श्रीकृष्णविष्णुगोविंद.'

महाराजांना मिळालेल्या ह्या लोकप्रीतीचा, लोकांनी त्याच्या केलेल्या सत्काराचा, सन्मानपूर्वक अर्पिलेल्या संभावनाचा विनियोग महाराजांनी निजामपुरी केला.

एका पडक्या देवळामधून एक सुदर देवालय आकाराला आलं. महाराजांच्या

घयाणं त्याची वीट न् वीट भिजली होती महाराजांचे, संस्थानचे देव भरजरी कपडे ल्याले. सोन्यामोत्यांच्या अलकारांनी नखशिखान्त भरले. महाराजांनी खास उत्तम कारागिरांना बोलावून त्यांच्या राहण्याची, अन्नवस्त्राची व्यवस्था स्वखर्चानं लावून त्यांचयाकडून एक उत्कृष्ट कलाकुसरतीनं परिपूर्ण 'रथ' करवून घेतला. आषाढी एकादशीच्या उत्सवाला गावात 'रथयात्रा' चालू केली. नदीकाठी वसलेल्या पूर्वजांच्या समाधीवर मंदिर उभ केलं. खास जयपूरहून श्रीकृष्णमूर्ति बोलावून स्थापन करून घेतली. (पुढे ह्याच ठिकाणी महाराजाच्या तीर्थरूपांची, नानाची अर्थात नित्यानंद सरस्वती स्वामी महाराजाची समाधि बांधण्यात आली.) गावातील सर्व लोकांना महाराजांनी दूरदृष्टीनं निरनिराळे मान देऊन सस्थानच्या उत्सवात गोवलं. उपासनीचा पांडुरंग आता निजामपूरचा झाला. पंधरा दिवसाच्या उत्सवाला गावोगावहून दिंडया येऊ लागल्या. निजामपूर पश्चिम खानदेशातलं पंढरपूर झालं. अनेकांचं श्रद्धास्थान!

महाराजांच्या कीर्तनाकडे समाज आकृष्ट होत होताच. धुळे, चाळिसगाव, जळगाव, अंमळनेर ह्या खानदेशातील शहराच्या बाहेर महाराज कधीच आले होते. त्यांनी मुंबई, पुणे, बडोदा, इंदोर, ग्वाल्हेर, झाशी, अकोला, अमरावती, नागपूर, जबलपूर, रायपूर ह्या शहरांनाही वेड लावलं होतं.

महाराजांच्या स्वभावाचा एक विशेष असे–ते कधीही जनसंपर्कात सापडत नसत. 'अरतिर्जनसंसृतिः' असं ते नेहमी म्हणत.'

त्यांची दिनचर्याही विलक्षण होती. वास्तविक गुणातीत पथावर संचार करणाऱ्या ब्रह्मनिष्ठाला विधिनिषेध ही उपाधि होते; पण महाराजाचा तो स्वभावच झाला होता. लोकाभिमुख जीवन व्यतीत करणाऱ्या, लोकनेतृत्व करणाऱ्या, जनतेला नीतितत्त्व शिकविणाऱ्या व्यक्तीला लोकसग्रहास्तव विधिनिषेध पाळावे लागतात.

'यद्यदाचरति श्रेष्ठास्तत्तदेवेतरो जना:।
स यत् प्रमाण कुरुते लोकास्तदनुवर्तते।'

ह्या हेतुने महाराजांनी आपली दिनचर्या आखली हेती.

प्रात:स्नान, त्रिकालसंध्या, ब्रह्मयज्ञ, पितृतर्पण, १२०० गायत्री जप (अर्चननैवद्य–वैश्वदेव) भागवताच्या बारा अध्यायाचे दररोज पारायण (अशी साडेतीनशे पारायणे झाली.) दुपारी २०,००० 'हरिरामकृष्णहरि' नामाचा जप आणि प्रतिपाद्य विषयाचं पूर्वावलोकन, इतर ग्रंथवाचन आणि रात्री कीर्तनं ह्यात त्यांचा दिवस जात असे. त्यांच्या बैठकीत फारशी माणसं नसत. कुणी असलीच तर अध्यात्मचर्चाच चाले.

मुरलीधरमहाराज आत्मनिष्ठ होते; तरीही सगुणभक्तीचा परमोत्कर्ष त्यांचे ठायी होता. मूर्तीकडे पाहता पाहता त्यांचे डोळे ओलावत. अभंग म्हणता म्हणता कंठ सद्‌गदित होई. आपल्या जवळच्या श्रीकृष्णाच्या आणि रुक्मिणीच्या मूर्तींचा

विवाह तर त्यांनी आपल्या पुत्राच्या विवाहासारखा थाटानं लावला होता.

एकदा महाराजांचा मुक्काम प्रयागात होता. महाराजांना गंगेला कीर्तन ऐकविण्याची इच्छा झाली. महाराजांनी साथीदार घेतले. घाटावरील तक्तकोषावर रात्री ९ वाजता कीर्तनास आरंभ केला. त्यादिवशीचे कीर्तन हे महाराजांच्या जीवनातलं एक अलौकिक कीर्तन होतं. ते कुणाच्याही निमंत्रणावरून नव्हतं. कुठल्या मोठ्या समाजापुढं नव्हतं. गंगेपुढं होत. मराठी भाषेशी सर्वथैव अपरिचित असे शेपन्नास साधु वैरागी बसले होते.

मुख्य श्रोता भगवती गंगा होती; खळखळ आणि अखंड वाहणारी परमपावनी गंगा, पतितोद्धारासाठी पतित झालेली गंगा !

महाराज तन्मय झाले. श्रोतावक्ता हे अंतरच तुटलं. गंगेच्या अखंड प्रवाहाप्रमाणं महाराजांची वाणी अखंड ओघवती झाली होती. महाराजांना जणू मातेपुढंच कीर्तन करीत असल्याची जाणीव होत होती. हिच्या कुशीवरच माधुकरी मागून महाराजांनी मोठ्या कष्टानं हे ज्ञानवैभव संपादन केलं होतं. महाराज रंगले होते. संपादिलेल्या ज्ञानसिंधूतील अजोड रत्ने मातेच्या पायाशी अर्पिण्यास सुरुवात केली. महाराज बोलत राहिले. श्रुतिस्मृतिशास्त्र-पुराणांतील मोहक, अमूल्य वेचे महाराज गंगेसमोर बोलत होते. त्यादिवशी महाराजांनी, भक्तराज तुलसीदासांचा कथाभाग मातेला ऐकवला. तिच्याच तटावर जीवन व्यतीत करणारा भक्तश्रेष्ठ. चरित्र रंगत गेले. महाराज परमोच्च बिंदूला आले.

'तुलसीदासांच्या कुटीत त्याच्या पत्नीनं आपल्या पतीच्या तपश्चर्येत आपलं हे शरीर व्यत्यय आणीत आहे या जाणिवेन 'श्रीरामतुलसी' अशी उच्चरवानं गर्जना करून उरात खंजीर खुपसून घेतला.'

ललताचे सूर पेटीवर लहरत होते. महाराजांची एकतानता झाली होती, आणि...

...आणि गंगेच्या खळखळाट थांबला. भगवती गंगा शांत झाली. स्थिर झाली.

'तुलसीदास धावत कुटीत आले. पत्नीच्या विदीर्ण देहाकडे त्यांनी पाहिलं; आणि तिच्या हृदयांतल्या रक्तानं तुलसीरामायणाचा अखेरचा अध्याय लिहिला.'

महाराज सांगत होते आणि गंगा ऐकत होती...शांत होऊन ऐकत होती. तिचा प्रवाह थांबला होता. खळखळाट थांबला होता.

'श्रीरामचंद्र सीतेसह प्रकट झाले. हस्तस्पर्शानं तुलसीदासांच्या पत्नीला त्यांनी पुनर्जीवन दिलं. तुलसीदासांच्या हातात हात दिला.'

...आणि गगा परत वाहूं लागली. तोच निखळ खळखळाट करीत ! अखंडपणे !!

महाराज तर अनुभूतीच्या पलीकडील अवस्थेत होते. कीर्तन संपलं. सारे आश्चर्यचकित वैरागी जवळ आले आणि म्हणाले, " आप कौन हैं सो तो पता नहीं।

लेकिन आपके शब्दोंमे अजीब शक्ति है। आपके शब्द सुननेके लिए तो गंगामैया भी अविचल हो गयी। यह अनहोनी बात पहले तो कभी देखी नही थी।"

सांधीदारांनाही ही गोष्ट जाणवल्याचे ते बोलले. महाराज म्हणाले, "हा एकतानतेचा प्रभाव आहे."

असाच तन्मयतेचा प्रभाव आणखी एका ठिकाणी पहावयास मिळाला.

बडोद्याच्या सरकारी विठ्ठलमंदिरात मुरलीधर महाराजाची कीर्तने चालली होती. एक दिवस भक्त दामाजीचे चरित्र महाराज सांगत होते, "सरकारी कोठार लुटविल्यावर बेदरच्या बादशहानं पंतांना अटक करण्याचा हुकूम दिला. बादशहाचे सेवक त्यांना घेऊन जात असता वाट पंढरपुरावरून जात होती. दामाजीपंतांना पांडुरंगाचं दर्शन घेण्याची तीव्र तळमळ लागली होती."

सरकारी रीतीप्रमाणं ठराविक वेळीच शेजारती करून देवाला निजविण्याची पद्धत त्या विठ्ठलमंदिरात होती. कीर्तन रंगात आलं होतं. महाराजांना वेळेचं भान उरलं नाही. पुजाऱ्यानं घंटा न वाजवतांच शेजारती ओवाळून दाराला कुलूप लावलं अन् तो निघून गेला.

"दामाजीपंत पांडुरंगाच्या दर्शनासाठी मंदिरात आले."

महाराजांचं चित्त इतकं तादात्म्य झालं होतं की सहज महाराज बोलून गेले, भगवंता, दामाजीपंत आपल्या दर्शनाला येताहेत अन् आपलं दार बंद! भक्तासाठी दार बंद?" महाराजांच्या भावना इतक्या आर्त झाल्या की काय घडतं आहे हे कळायच्या आतच खळकन आवाज झाला, कुलूप निखळून पडलं अन् गाभाऱ्याचे दार उघडलं गेलं. देवानं भक्ताला दर्शन दिल.

श्रोतृवृंद चकित झाला.

"पंतांनी देवाला न्याहाळलं अन् स्तुति केली—

"अभिनव घनरंग रूपिणी हृत्तरंगम्।
नयनजित तुरङ्गं सात्त्वतामंतरंगम्।
गिरीशहृदयरंगं वरगरुड तुरंगम्।
प्रार्थयेत् पाडुरंग, अभिनव घनरंगम्।"

कीर्तन आटोपलं. ह्या महाराजाच्या कीर्तनातील तादात्म्याच्या दिव्यत्वाची प्रचीती बघितलेले लोक अजूनही बडोद्यांत आहेत. ही गोष्ट दरबारी कळल्यावर दुसऱ्या दिवसापासून कीर्तन संपेपर्यंत शेजारती न करण्याचा हुकूम देण्यात आला.

महाराजांचं परिभ्रमण चालूच होत. नानाच्या आकांक्षा महाराजांनी पूर्ण केल्या होत्या. ते विद्वान् झाले, कुलपरपरा समर्थपणे चालवू लागले, संस्थानचे वैभवही त्यांनी वाढविले, नवीन मंदिर बाधले, रथयात्रा सुरू केली, उत्सवाचं स्वरूप अधिक उत्साहपूर्ण आणि विशाल केल. कुटुंबाचा भार उचलला आणि नानाच्याच इच्छेनं स्वकष्टार्जित सारी संपत्ती आपल्या बधूना वाटून दिली. बधु विभक्त झाले.

पित्राज्ञेचं पालन करूनही महाराज कष्टी झाले. एकीकडे आज्ञापालनाचं समाधान आणि एकीकडे बंधु विभक्त झाल्याचं दुःख. दुःख संपत्तीचं नव्हतं, पण सर्व बंधूंनी मिळून आसेतु हिमाचल दिग्विजय करण्याचा इच्छा ते बाळगून होते. पण, दैवगती वेगळी होती.

चाळिशी उलटून गेल्यावर महाराजांना स्वतःच्या संसारांत लक्ष घालावं लागलं; त्यातच पितृवियोगही झाला. परिश्रम चालूच होते. तळमळ होती ज्ञानदानाची! बुद्धी निरपेक्षच होती. अशातच पत्नीला अर्धांग झाला. संकटकाळी कुणीही पुढे आले नाही. सारं महाराजाना स्वतःच करावं लागलं. तीन वर्षांच्या दीर्घ कालावधीनंतर संसार पुनर्जीवित झाला. अकोला, पुणे व नतर माहीम इथं महाराजांनी वास्तव्य केलं. उत्साह दुर्दम्य. अतिपरिश्रमान शरीर थकत चाललं होतं. मधुमेहानं उचल खाल्ली होती. पण विश्राती ठाऊकच नव्हती. ती त्यांना पूर्वीही कधी ठाऊक नव्हती. एकदा खानदेशातील फैजपूर गावी कीर्तने चालू असताना महाराजांना कॉलरा झाला होता. अशक्तता फार होती. वैद्यानी कार्यक्रमास मनाई केली होती. पण उपासनेत खंड महाराजाना रुचणारा नव्हता. 'देह जावो अथवा राहो। पांडुरंगी दृढ भावो' तशाही स्थितीत महाराज रात्री कीर्तनास उभे राहिले आणि अधिकच तन्मयतेनं कीर्तनात रंगले.

आयुष्यभर मिळविलेलं ज्ञान ते देतच राहिले. विद्यादानमतःपरम्।'

दिल्ली, ग्वाल्हेर, जबलपूर, गोवा; महाराजाचे दौरे चालूच होते. निमंत्रणे येतच होती. मंदिराच्या कायमच्या व्यवस्थेसाठी निधी जमविण्याची त्यांची तीव्र तळमळ होती.

१९६५ साली जुलै महिन्यात लंडनच्या महाराष्ट्र मंडळानं महाराजांना बोलावलं. महाराष्ट्रांतील सर्व सनातनी लोकानी समुद्रपर्यटणाला विरोध दर्शविला. प्रत्यक्ष सुद्गुरु नानामहाराज बडोदेकरानीही विरोध प्रकट केला. पण त्यांचं हे पत्र महाराज विमानात बसल्यावर आलं.

महाराज लंडनला गेले! सातासमुद्रापलीकडे भारतीय कीर्तनपरंपरेची, उज्ज्वल ध्वजा खांद्यावर घेऊन! त्यामागेही एक उद्दिष्ट होतं.

लंडनमध्ये महाराजानी तिथल्या भारतीयाना, विशेषतः महाराष्ट्रीयांना भारतीयत्वानं, वैदिक तत्त्वज्ञानाला आणि विचारसरणीला अनुसरून तशाही परिस्थितीत आपद् धर्माचा स्वीकार करून स्वत्व टिकवून कस राहता येईल ह्याचा संदेश दिला. रामकृष्णहरीची गर्जना लंडनमध्ये घुमली. महाराजानी लंडनला पंधरा दिवस वास्तव्य केले तेही आपल्याच पद्धतीन आणि तेजस्वी बाण्यानं. पधरा दिवस त्यानी धर्म, वेदात, प्रारब्धोद्योग इ. विषयावर प्रवचने केली.

महाराज मराठी दुसरी इयत्ता नापास होते. त्याना लिहिता. येत नसे. साऱ्या परीक्षा त्यांनी मौखिक दिल्या होत्या तीव्र स्मरणशक्तीच्या जोरावर! त्याचे

मातृभाषेशिवाय संस्कृत, गुजराती आणि हिंदी भाषांवर अत्युत्तम प्रभुत्त्व असे. या भाषामध्येही ते कीर्तन करीत असत. पण त्याना इंग्रजी भाषेचा गंधही नव्हता. काही इंग्रज, तत्वज्ञानाचे अभ्यासक, त्याच्या तेथील वास्तव्यात त्याना शंका विचारण्यास आले असता, महाराजानी केलेल्या शकासमाधानाचे भाषांतर करून केसरीचे वार्ताहर ताह्मणकर सागत. त्यावेळी महाराजाना ह्या भाषेची विशेष अडचण भासली. " इंग्रजी येत असते तर भारतीय तत्त्वज्ञानाची पाश्चिमात्त्यांना आंग्ल-भाषेतून ओळख करून देऊ शकलो असतो " ह्या जाणिवेनं ते किंचित व्यथित झाले.

पंधरा दिवसांच्यावर महाराज तिथ राहू शकले नाहीत. तेथल्या सस्कारात आणि वातावरणात महाराजांचे मन रमेना.

महाराज थकले तरी त्याचा उत्साह दुर्दम्य होता. इंदोरला महाराजांना बोलाविले होते. शरीर असमर्थ होत चालल होत तरीही इदोरला महाराजांनी कीर्तनाची बहार उडविली. महाराज शरीरानं थकले तरी मनानं थकले नव्हते. कीर्तनास उभे राहिले म्हणजे थकवा कुठल्याकुठं पळत असे. तारुण्य सळसळे आणि त्याच प्रभावी वाणीने हजारो माणसं मंत्रमुग्ध करीत. तेथल्या वास्तव्यात महा-राजांना एकाएकी अर्धांगाचा त्रास झाला. अर्धं शरीर शिथिल झालं. नाईलाजानंच कीर्तनं बद ठेवावी लागली. पण आठच दिवसात तज्ज्ञाच्या खटपटीनं महाराज ठीक झाले, आणि नवव्या दिवशी सान्याच्या मनाई करण्यानंतर महाराज कीर्तनास उभे राहिले. कुणाचेही न ऐकता !

कीर्तन ही त्यांची आवड होती, जीवित होतं, जीवनाचं सार होतं. महाराज म्हणत, " कीर्तन हीच माझी विश्रांती. "

भोरच्या नगरसेठ देवीचा आणि महाराजांचा पूर्वीपासूनचा परिचय. त्यांनी महाराजाना भोरला बोलावलं. अधिकमासाचे निमित्त साधून प्रकृतिस्वास्थ्य अजिबात ठीक नसतांनाही महाराजानी भोरला येण्याचं कबूल केलं. पत्नीस बरोबर घेऊन महाराज भोरला गेले. भोरला महाराजानी स्वत:ला सपूर्ण कार्यमग्न करून घेतले होते. प्रात संध्या आटोपल्यावर श्रीमद्भागवताच्या संहितेला ते बसत. दोन-अडीच तास संहितावाचन झाल्यानंतर भोजन, की पुन्हा दुपारच्या अर्थाचे पूर्वावलोकन. दोन अडीच तास दुपारी अर्थ, सायंसंध्या व रात्री ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्याया-वर प्रवचन. महाराजांनी आयुष्यात तीन ग्रंथांवर जिवापाड प्रेम केल. श्रीमद्भा-गवत, श्रीमद्भवद्गीता आणि ज्ञानेश्वरी. ज्ञानेश्वरी हा तर विशेष आवडीचा आणि खास संशोधनाचा ग्रंथ !

दर गुरुवारी रात्री वारकरी सप्रदायाचं कीर्तन. आसपासच्या सर्व गावांवरून माणसे येत. श्रवणासाठी. महाराजांमागून त्यांचा सूर उचलीत–' तो हा विठ्ठल बरवा । तो हा माधव बरवा । '

हरिदास आणि वारकरी या दोन संप्रदायांचा ते दुवा होते.

महाराजांचे कष्ट शरीर-सामर्थ्यापलीकडे होऊ लागले. भोर-मुक्कामातच दोन वेळा हृदयविकाराचे आघात त्यांना जाणवले. पण तरीही नेटाने ते कार्यप्रवण राहिले. त्यांनी मुलांना भेटीस बोलाविले महाराजांच्या प्रकृतीची अस्वस्थता बघून त्यांनी डोंबिवलीस परत चलण्याविषयी मुलानी आग्रह धरला. महाराजानी साफ नकार दिला, "हे माझ अनुष्ठान मी अर्धं सोडणार नाही. मग शरीराचं काहीही होवो." नाईलाज म्हणून मुलं परत निघाली. त्यांनीच निरोप दिला.

श्रीमद्‌भागवताच्या श्रीरामचरित्राचा भाग त्याच दिवशी संपला होता. दुसऱ्या दिवसापासून महाराजांच्या परमप्रिय आराध्य दैवताच्या—श्रीकृष्णचरित्राला सुरुवात होणार होती.

आषाढ वद्य द्वितीयेसह तृतीया होती ती. पाऊस कोसळतच होता. दुपारचा अर्थ सांगून परतण्यास आठ वाजले होते. मुलांना महाराजांनी निरोप दिला. सायंसंध्या आटोपून गोविंदसेठजीशी काही आध्यात्मिक चर्चा करीत काही वेळ महाराज बसले. संध्यावंदनाबाबतच्या त्यांच्या काही शकांच निरसन केलं, अन् जपमाळ घेऊन बसले. 'हरिरामकृष्णहरी' नामाची दुपारी अपूर्ण राहिलेली जपसंख्या पूर्ण केली. रात्रीचे साडेदहा वाजले असतील.

'प्रल्हादनारदपराशरपुंडरीक ।
व्यासाबरीशशुकशौनकभीष्मदाल्भ्यान् ।
रुक्मांगदार्जुनवसिष्ठबिभीषणादीन् ।
पुण्यानिमान् परमभागवतान् स्मरामि ।'

नित्याप्रमाण ह्या महाभागवतान परमभागवताचं स्मरण केलं. वृत्ती तदाकार झाली. चित्त चिन्मय होऊ लागलं. प्राणाना ब्रह्मरंध्राचे वेध लागले. किंचितसा ठसका आला. आणि महाराजानी आपल्या प्रियपत्नीच्या, जिनं साउलीसारखी सोबत केली तिच्या मांडीवरच इहलोकीचा अखेरचा निरोप घेतला. भूनारदांनी भूलोक सोडला.

आयुष्याच्या अंतिम क्षणापर्यंत ते कार्यव्यग्र राहिले. 'बीज वाढवावे नाम । हेचि असे आम्हा काम' ह्याच कार्यात 'कुर्वन्नेवेह कर्माणि' शेवटचा श्वास घेतला. ब्रह्मरंध्राचा भेद करून प्राण सर्वव्यापी झाले. आराध्यात आराधक समरस झाला. आत्मत्वानं ते सर्वव्यापी झाले.

हा गतः कीर्तनवाचस्पति !!

□ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

सवलतीची मुदत १५ ऑगस्टपर्यंत ॥

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

किंमत : प्रसिद्धीनंतर रुपये पंचवीस सुमारे
प्रसिद्धीपूर्व सवलतीची किंमत रुपये चौदा

रजिस्टर पोस्टाने ग्रंथ हवा असल्यास रुपये दोन अधिक.

सवलतीची मुदत १५ ऑगस्टपर्यंत ॥

# अग्निपुत्र

वसंत पोतदार

किंमत : प्रसिद्धीनंतर रुपये पंधरा सुमारे
प्रसिद्धीपूर्व सवलतीची किंमत रुपये आठ

रजिस्टर पोस्टाने ग्रंथ हवा असल्यास एक रुपया अधिक.

रक्कम मनिऑर्डरने पाठवावी. कार्यालयातही स्वीकारली जाईल.

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०